भारतीय स्वातंत्र्य ६० साधना साप्ताहिक हीरकमहोत्सव

संस्थापक : साने गुरुजी

# साधना

शनिवार २३ फेब्रुवारी २००८ मूल्य रु. ८/-



व्यासपीठ

संजय जोशी

३

**आयुष्यात काही गाड्या चुकल्या की ते योग्य वळणावर मान्य करून दुसरी गाडी पकडावी असे माझे मत आहे. कारण उत्सवहीन निराश जगणे ही जीवनाशी केलेली कृतघ्नता असते. सामाजिक कार्यकर्त्याची कृतिशीलता ही अशीच एक माझी चुकलेली गाडी. आयुष्यात कशाचीच कमतरता दुसऱ्या कशाने भरून निघत नाही हे तर खरेच; पण हृदय आणि आयुष्य यांना अनंत विस्ताराच्या शक्यता असतात. त्यामुळे जगण्यात, लेखनात आणि प्रेमात अधिकाधिक सर्जनशील असणे मी पसंत करतो.**

# थोडासा रूमानी हो जाये...

वय, व्यासंग किंवा विद्वत्ता यातले काहीच मजपाशी नसूनही, मला 'साधना'चे व्यासपीठ मुक्त अभिव्यक्तीसाठी मिळाले तेव्हा 'इदं न मम' हे कळण्याइतकी परिपक्वता अंगी नसल्याने सुरुवातीला मी मोहरून गेलो. हा तिसरा लेख लिहिताना मात्र मला जबाबदारीची जाणीव अधिक आहे, कारण 'साधना'चे वाचक फुटकळ लालित्याने भारावणारे नव्हेत हे मला उमजते. चटकदार किंवा चमकदार शैलीने साधण्यासारखी ही साधना नव्हे. या निमित्ताने काही प्रांजळ मते मांडता आली तर पाहणार आहे.

माझ्यापुरती जगण्याची व्याख्या मी 'सोहळे आणि उत्सव करण्याची संधी' अशी केली आहे. 'लाईफ इज ॲन ऑपॉर्च्युनिटी टू सेलिब्रेट.' उत्सवाची निमित्ये म्हणून ठराविक अंतरावर यशाचे 'माइलस्टोन्स' निर्माण करावे अशी माझी विचारसरणी आहे. हे काही जगण्याच्या जटिलतेचे अतिसुलभीकरण नव्हे; पण जीवनाची महातत्त्वे सोपी आणि सूत्रबद्ध असतात असा माझा अनुभव आहे. मध्यंतरी, वेध परिवाराच्या महासंमेलनांत पाच हजार प्रेक्षकांसमारे डॉ. आनंद नाडकर्णीने माझी मुलाखत घेतली. त्यात त्याने मला विचारले, 'तुझी आवडती आणि खास अशी कोटेशन्स (सुभाषिते) कोणती?' मी अगदी चटकन् उत्तर दिले. जी कोटेशन्स माझ्या जगण्यातून निर्माण होतात आणि जी मीच तयार करतो, तीच मला मोलाची वाटतात. कारण ती माझी असतात. मी मला स्वतःच्या जगण्यातून उमजलेली अशी माझी स्वतःची कोटेशन्स सहज लिहून पाहिली. समजण्याच्या तीस-



पस्तीस वर्षांत अशी फक्त पंधरा-सोळा कोटेशन्स मी निर्माण केली. पण ती माझ्या स्वतःच्या जगण्यातून स्फुरलेली असल्याने, मला ती मोलाची वाटतात. मघाशी म्हटले ना, 'उत्सव करण्याची निमित्ये म्हणून ठराविक अंतरावर यशाचे माइलस्टोन्स निर्माण करणे महत्त्वाचे असते.' ते त्यांपैकीच एक आहे. ऑफिसमध्ये चारशे लोकांचा बॉस म्हणून काम करताना सुद्धा मी हे आवर्जून पाळत. इतरांना सांगत आलो आणि माझ्या घरात सुद्धा हे आवर्जून करत आलो. पण उत्सव काही फक्त सुखांचेच नसतात; दुःखांचे सुद्धा असतात. सांगायचा मुद्दा जगण्यात उत्कटता असली की अशी क्षणांची स्मारके करायची सवय जडते. या बाबतीत महात्मा गांधी आणि बाबा आमटे हे माझे हिरो. यदुनाथ थत्ते यांचे 'साने गुरुजी' हे पुस्तक, गं.दे. खानोलकर यांनी लिहिलेले 'रवींद्रनाथ' हे चरित्र आणि सॉक्रेटिसाचे तुळपुळ्यांनी लिहिलेले चरित्र यांनी मला विलक्षण प्रभावित केले होते. पुढे प्लेटोचे 'डायलॉग्ज' वाचले तेव्हा आणि खलिल जिब्रानचे 'प्रॉफेट' वाचले तेव्हा असाच भारावलो होतो.

नेहमीच वाचन हे माझे पहिले प्रेम. नेमाडे, जी.ए. आणि आरती प्रभू हे पहिल्या फळीतले आवडते लेखक. दुसऱ्या फळीत दळवी, उद्धव शेळके, सानिया, भाऊ पाध्ये, श्याम मनोहर, नारायण सुर्वे, व्यंकटेश माडगुळकर, गौरी देशपांडे, कमल देसाई वगैरे अनेक श्रेष्ठ लेखक-लेखिका आणि तिसऱ्या आवडत्या फळीत अर्थातच पुलं, शन्ना, मोनिका, नीरजा, कविता, मेघना, विश्वास पाटील, सुबोध जावडेकर, आनंद यादव असे अनेक. हे पहिली फळी, दुसरी फळी म्हटले ते श्रेष्ठतेच्या अन दर्जाच्या अर्थाने मुळीच नाही. पहिल्या फळीबद्दल विलक्षण आदर, दुसऱ्या फळीबद्दल निखळ लेखकीय हेवा आणि तिसऱ्या फळीतल्या लेखकांच्या पुस्तकांबद्दल विलक्षण प्रेम असा क्रमहीन प्रकार आहे. आणि नावे केवळ उदाहरणादाखल घेतली इतकेच. इंग्रजी वाचन अगदीच मर्यादित असले तरी ऑर्वेल, मॉम, वाइल्ड आणि हेमिंग्वे खास आवडीचे. इंग्रजी वाचनाबाबत उमा नावाची मैत्रीण आणि आनंद जोशी नावाचा मित्र यांचा हेवा करण्यात आयुष्य गेलं. वाचनाबाबत आणखी एक खास निरीक्षण. सुबोध जावडेकर हा एकच महान मित्र असा आढळला की जो अत्यंत आवडीने इतरांचे वाचतो आणि आवर्जून सर्वांना प्रतिक्रिया कळवत राहतो. स्वतः अगदी यशस्वी लेखक असूनही. हा दुर्मिळ गुण त्याच्याकडून शिकायचा मी मनःपूर्वक प्रयत्न करत आलो. (फरक

[पृष्ठ २९ वर

# डार्विनचा वारसा, तुकोबांचा आरसा

''बीगल'ने प्रशांत महासागरात प्रवेश केला आणि डार्विनने इंग्लंडला परतल्यावर चर्चमध्ये पाद्री होण्याची कल्पना सोडून दिली. आता आपण आयुष्यात काय करायचे आहे, ते त्याला उमगले होते. तो परतणार होता निसर्गशास्त्रज्ञ म्हणूनच!... दक्षिण अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरून उत्तरेकडे प्रवास करत असता, निसर्गाचे सामर्थ्य आणि निसर्ग काय करू शकतो, याविषयी डार्विनला अधिकाधिक शिकता आले.''

''संसारसागर तरून पार करण्याच्या सफरीच्या प्रवासवृत्ताची विस्तृत रोजनिशी (इंग्रजीत 'लॉग बुक' म्हणतात ती) तुकारामाने आपल्या अभंगात लिहून ठेविली आहे. किंबहुना तुकारामाचे समग्र अभंग त्याच्या अध्यात्मसिद्धीचे आत्मवृत्त होत, असे म्हटले तरी चालेल. ही सफर कमीअधिक सायासांनी पूर्ण करून अनेकांनी पूर्वी पार गाठला होता. पण भक्तीचे साधे होकायंत्र बाळगणाऱ्या सामान्य नाविकाला तुकारामाच्या अभंग रोजनिशीइतका दुसऱ्या कशाचाही उपयोग होत नाही.''

वरीलपैकी पहिला परिच्छेद आहे ॲना स्प्राउल यांच्या 'चार्ल्स डार्विन' या पुस्तकातील तर दुसरा परिच्छेद घेतला आहे पु.म.लाड यांनी लिहिलेल्या 'तुकारामाचे चरित्र' या पुस्तकातून.

इंग्लंडमधील निसर्गशास्त्रज्ञ चार्ल्स डार्विन व महाराष्ट्रातील संत-कवी तुकाराम यांची तुलना कोणत्याही प्रकारे करताच येणार नाही, पण सोमवार १२ फेब्रुवारी २००८ रोजी डार्विनचे २०० वे आणि तुकोबांचे ४०० वे जयंतीवर्ष सुरू झाले आहे. डार्विनच्या द्विजन्मशताब्दीनिमित्त पुढील वर्षभरासाठी जगभरात आणि विशेषत: युरोपात संस्थात्मक व शासकीय स्तरावर अनेक कार्यक्रमांचे व उपक्रमांचे आयोजन केले आहे; त्यात प्रामुख्याने विज्ञान प्रदर्शने, माहितीपट, चर्चासत्रे, शिबिरे यांचा समावेश आहे. तुकोबांच्या चतु:जन्मशताब्दीनिमित्तही पुढील वर्षभरासाठी महाराष्ट्रात आणि विशेषत: पश्चिम महाराष्ट्रात संस्थात्मक व शासकीय स्तरावर विविध कार्यक्रमांचे व उपक्रमांचे आयोजन केले आहे; त्यात प्रामुख्याने कीर्तन, प्रवचन, यात्रा, सप्ताह, दिंडी-सोहळे यांचा समावेश आहे. म्हणूनच डार्विन व तुकोबा यांच्या कार्यावर ओझरता दृष्टिक्षेप टाकून, त्यांचे नेमके मोठेपण कशात आहे, याचा शोध घेतला पाहिजे.

१८३१ मध्ये ब्रिटिश सरकारने जीवशास्त्रीय सर्वेक्षणासाठी 'बीगल' हे जहाज ७० लोकांसह जगाच्या सफरीवर पाठवले, तब्बल पाच वर्षांनंतर ते जहाज इंग्लंडला परतले. त्या जहाजावर जाण्याची संधी चार्ल्स डार्विन या तरुण विद्यार्थ्याला मिळाली. त्याने आपल्या वयाची २२ ते २७ ही पाच वर्षे जहाजासोबत जगभ्रमण केले. या काळात त्याने जगातील वेगवेगळ्या प्रदेशातील वनस्पती, प्राणी, यांची निरीक्षणे नोंदवली. अनेक महाकाय मृत प्राण्यांचे अवशेष जमा करून इंग्लंडला पाठवले आणि जगभ्रमण करून जहाजावर इंग्लंडला परतल्यानंतर, त्या सर्वांचा अभ्यास करून मानवी उत्क्रांतीचा सिद्धांत मांडला. त्या सिद्धांताची मूलभूत मांडणी

स्थापण्या
समता शांती
ठेवुनी शुद्ध
**साधनां ।**
करिती साधना
त्यांना ठेवो
उत्स्फूर्त
**साधना**

**२३ फेब्रुवारी २००८**
वर्ष ६० / अंक २७

- संपादक : **नरेंद्र दाभोलकर**
- युवा संपादक : **विनोद शिरसाठ**

- हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक नरेंद्र दाभोलकर यांनी महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे ४ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रकाशित केले.
- दूरध्वनी : **वर्गणी, पत्ता व अंकासंबंधी, (०२०) २४४५१७२४.** संपादक : टेलिफॅक्स :– २४४३२४०२
E-mail : ssadhana@vsnl.net साधना मीडिया सेंटर :- (०२०) २४४५५९६३५ / ४१
web : www.sadhanatrust.com
- वार्षिक वर्गणी : व्यक्तिगत रु. ३००/-, संस्थांसाठी रु. ४००/-
- (अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)
- मुखपृष्ठ : शेखर गोडबोले : Mob. 9822503398.

करणारी ‘ओरिजिन ऑफ स्पेसिज’ आणि ‘डिसेंट ऑफ मॅन’ ही दोन पुस्तके प्रसिद्ध झाली तेव्हा युरोपात खळबळ माजली. कारण डार्विनचा उत्क्रांतीवाद हा ख्रिश्चन धर्मशास्त्र मोडीत काढत होता. जगनियंत्या परमेश्वराने चार हजार वर्षांपूर्वी एका दिवसात पृथ्वी आणि सहा दिवसांत सजीव सृष्टी निर्माण केली, अशी शिकवण बायबलमध्ये होती. त्यावेळचे शास्त्रज्ञही यावर विश्वास ठेवत नव्हतेच, पण शास्त्रीय संशोधन करून ते खोडून काढण्याचा प्रयत्न मात्र तोपर्यंत झालेला नव्हता. त्यामुळे सर्वसामान्य सश्रद्ध लोक ‘बायबल’ हेच अंतिम सत्य मानून चालत होते. पण डार्विनच्या सिद्धांताने त्या मांडणीला म्हणजे थेट धर्मसंस्थेलाच आव्हान दिले सर्वसामान्यांच्या मनातील श्रद्धा खिळखिळी झाली, परिणामी ‘आजचे सर्व सजीव लाखो, करोडो वर्षानंतर उत्क्रांत होत या अवस्थेला आले आहेत, मानव प्राणीही त्याला अपवाद नाही आणि जे सजीव परिस्थितीनुसार स्वत:मध्ये बदल करून घेत नाहीत, (सर्व्हाइवल ऑफ द फिटेस्ट) ते नष्ट होतात.’ हा डार्विनच्या उत्क्रांतिवादाचा गाभा होता. ‘माणसाची निर्मिती चतुष्पाद प्राण्यापासून झाली आणि माकडाचा व माणसाचा पूर्वज एकच असावा’, या मांडणीमुळे ॲडम आणि इव्हची कथा तर निकालात निघालीच, पण परमेश्वराच्या अस्तित्वापुढेच प्रश्नचिन्ह निर्माण झाले. पाश्चात्त्य समाजाला त्यातही ख्रिस्ती धर्मसंस्थेला हा फार मोठा धक्का होता. ‘पृथ्वी सपाट नसून गोल आहे’ हा गॅलिलिओचा सिद्धांत आणि ‘सूर्य पृथ्वीभोवती फिरत नसून, पृथ्वी सूर्याभोवती फिरत आहे’ हा कोपर्निकसचा सिद्धांत यांनी या धर्मसंस्थेला डळमळीत केले होते, त्यावर जोराचा प्रहार डार्विनच्या सिद्धांताने केला. तो धक्का इतका जोराचा होता की, एकोणिसाव्या शतकातील पन्नास-साठ वर्षे डार्विनच्या या सिद्धांताला कोणीही आव्हान देऊ शकले नाही, त्या काळातील बहुतांश शास्त्रज्ञांनी तो उचलून धरला होता. त्यामुळेच डार्विनच्या सिद्धांताने केवळ मानवी उत्क्रांतीची मांडणी केली नाही तर समाजाच्या सांस्कृतिक मूल्यातही मूलभूत बदल झाला. अर्थात, सजीव सृष्टीच्या उत्क्रांतीचा कालावधी काही लाख किंवा काही कोटी वर्षांचा असल्याने, त्या सिद्धांताचे निश्चित व ठोस असे पुरावे देणे अवघड होते. त्यामुळे पुढे विज्ञानाचा विकास होत गेल्यावर उत्क्रांतीवादाच्या मर्यादा उघड होत गेल्या. परंतु या सिद्धांतामुळे सजीवांचा अभ्यास करण्यासाठी संशोधनाची नवी दालने खुली झाली आणि मानवजातीचा उद्‌गम आणि इतिहास यांवर अधिक प्रकाश पडू लागला.

इ.स.१६०८ ते १६५० (४२ वर्षे) हा तुकारामाचा जीवनकाळ. या काळातील महाराष्ट्रात आदिलशाही, निजामशाही व मोघल बादशाही यांची सत्ता होती. एका राजाची सत्ता जाऊन दुसऱ्या राजाची येत होती. त्या त्या ठिकाणचे जहागिरदार– सुभेदारच वर्चस्व गाजवत होते. शिवाजीराजांचे स्वराज्य स्थापनेसाठी प्रयत्न चालू होते, पण एकंदरीत विचार केला तर येथे स्थिर अशी राज्यसंस्था नव्हती. म्हणजे समाजाची जी काही व्यवस्था होती तिच्यावर शासनसत्तेचा कमी आणि धर्मसत्तेचा अधिक प्रभाव होता, त्यामुळे राज्यसत्तेच्या कायद्यांपेक्षा धर्मसत्तेचे नीती-नियम समाजाला बांधून ठेवत होते. तत्कालीन संत नामदेव, ज्ञानदेव, एकनाथ यांचा वारसा सांगत समाजाच्या मनाची मशागत करत होते, पण मानवी दु:खं ही नशिबाचे भोग असतात, ती पूर्वजन्मीच्या भल्या-बुऱ्या कृत्यावर अवलंबून असतात, त्यातून मुक्त व्हायचे असेल तर सन्यासधर्म स्वीकारणे– संसाराचा त्याग करणे, या शिकवणुकीचा पगडा जनसामान्यावर होता. त्यामुळेच कर्मकांड वाढीस लागले होते आणि समाजातील दंभाकडे, जीवनव्यवहाराकडे विश्लेषक वृत्तीने पाहिले जात नव्हते. अशा काळात बहुजन समाजातून, वारकरी कुटुंबातून आलेल्या तुकारांमानी समाजातील दंभावर, जीवनव्यवहारावर भेदक भाष्य करणारे अभंग रचले. ऐन तारुण्यातच जीवलगांचे मृत्यू आणि व्यापार व सावकारीत आलेली खोट, त्यामुळे निघालेले आर्थिक दिवाळे, महाभयानक दुष्काळ आणि परकीय आक्रमणामुळे अस्थिर समाजव्यवस्था, अशा पार्श्वभूमीवर तुकारामांनी अभंगरचना ४०० वर्षांपूर्वी लिहिलेले ते अभंग आजच्या समाजातील मानवाच्या मनोवृत्तीलाही चपखल लागू पडतात हे विशेष आहे यातून हेच लक्षात येते की, तुकोबा मानवी मनाच्या किती खोलवर पोहोचले होते. देहू परिसरातील डोंगरात तासन्‌तास चिंतनात मग्न राहिलेल्या तुकोबांना मानवी मनाचा तळ गाठायचा होता, तोच त्यांचा विठोबा होता. असा विठोबा त्यांना सापडला की नाही, हा भाग वेगळा, त्यांच्या नावावर जमा केलेले चमत्कार, वैकुंठगमन वगैरे भाग बाजूला ठेवला आणि आजच्या समाजाचे प्रश्न व त्यांची उत्तरे तुकोबांच्या गाथेत सापडत नसली तरी तुकोबांनी मानवी मनाची व समाजातील जीवनव्यवहाराची गुंतागुंत उकलण्यात बरेच यश मिळवले होते, एवढे मात्र खरे!

सारांश, २०० वर्षानंतरही डार्विनचे जयंती वर्ष जगभर सारे केले जात आहे, कारण मानवाचा उद्‌गम व विकास यावर पुढील संशोधन चालू आहे ते त्याचा भक्कम वारसा आहे म्हणून आणि ४०० वर्षांनंतरही महाराष्ट्रात तुकोबांचे जयंतीवर्ष साजरे केले जात आहे, ते त्यांच्या अभंगात (आरशात) आजच्या मानवालाही आपले प्रतिबिंब दिसते म्हणून!

परामर्श

# मॅकेन व ओबामा यांची चढती कमान

गोविंद तळवलकर

**सध्या हवा अशी आहे की, ओबामा यांना डेमॉक्रॅटिक पक्षाची उमेदवारी मिळेल. प्रसारमाध्यमांनी त्यांना मार्ग मोकळा ठेवण्याचे धोरण अवलंबिले आहे. त्यांच्या कोणत्याही वक्तव्याबद्दल प्रश्न**

**जॉन केनेडी इतकेच नव्हे तर चर्चिल इत्यादींचे गुण त्यांच्या जागी पाहिले जात आहेत. काहींना वाटते अमेरिकेला असा नेताच आतापर्यंत मिळाला नाही. म्हणजे जॉर्ज वॉशिंग्टन, जेफर्सन, मॅडिसन, हॅमिल्टन इत्यादी संस्थापक हे सर्व बाराच्या भावात गेले. तथापि, अमेरिकन प्रसारमाध्यमांच्या इतकी उथळ माध्यमे जगात कोठे असण्याचा संभव नसल्यामुळे हे असेच चालणार.**

व्हर्जिनिया, मेरिलँड व डिस्ट्रिक्ट ऑफ कोलंबिया यांत रिपब्लिकन व डेमॉक्रॅटिक पक्षांच्या सदस्यांनी येत्या अध्यक्षीय निवडणुकीसाठी त्या त्या पक्षाचा उमेदवार निवडण्यासाठी १२ फेब्रुवारी रोजी मतदान केले. त्यात रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ सेनेटर जॉन मॅकेन व डेमॉक्रॅटिक पक्षाचे बराक ओबामा यांना यश मिळाले आणि त्यांची चढती कमान असल्याचे स्पष्ट झाले.

जॉन मॅकेन यांना उमेदवारी मिळवण्यासाठी ११९१ प्रतिनिधी मिळवावे लागतील. त्यांपैकी त्यांना ८०० हून अधिक प्रतिनिधी मिळाले आहेत आणि ४ मार्च रोजी टेक्सास इत्यादी काही राज्यांत उमेदवार निवडीसाठी दोन्ही पक्षांच्या सदस्यांचे मतदान असल्यामुळे तेव्हा वा त्या आधी मॅकेन यांना उमेदवारी मिळेल हे निश्चित.

त्यातच त्यांचे प्रतिस्पर्धी मिट रॉमनी यांनी या पूर्वी माघार घेतली होतीच व आता त्यांनी मॅकेन यांना पाठिंबा जाहीर केला आहे. तसेच आपल्याला मिळालेल्या प्रतिनिधींनी मॅकेन यांना मत द्यावे, असे त्यांनी आवाहन केले आहे. या सर्वांनीच तसे केले नाही तरी बरेच करतील आणि यामुळे मॅकेन यांचे पारडे चांगलेच जड झाले आहे.

अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीसाठी डेमॉक्रॅटिक व रिपब्लिकन पक्षांचे उमेदवार ठरवण्यासाठी ५ फेब्रुवारी रोजी २२ राज्यांत त्या-त्या पक्षांच्या सभासदांनी केलेले मतदान निर्णायक नव्हते व त्यामुळे दोन्ही पक्षांना उमेदवार निश्चित करता आला नाही. आपल्याकडे वा ब्रिटनमध्ये प्रत्येक पक्षाची जी वरिष्ठ यंत्रणा असते ती उमेदवार ठरवते. अमेरिकेत अध्यक्षाची निवडणूक असो वा राज्यपातळीवरील राज्यपाल तसेच राज्य व केन्द्र पातळीवरील प्रतिनिधी सभा व सेनेट यांसाठीची. उमेदवारी जाहीर करून पक्षाच्या सभासदांचा कौल घ्यावा लागतो. यात बराच वेळ व पैसा खर्च होतो.

या वेळेस अध्यक्षपदासाठी दोन्ही पक्षांच्या इच्छुकांनी बरीच अगोदर प्रचारमोहीम सुरू केली. यामुळे प्रारंभीच्या काळात तिला वेग आला नव्हता व उमेदवार तीच-तीच भाषणे करत होता. पण गेल्या तीनेक महिन्यांत ही मोहीम जोर धरू लागली आणि शेवटच्या महिन्यात तर ती तापली. ५ फेब्रुवारीस २२ राज्यांत उमेदवार निवडण्यासाठी मतदान झाले व त्यापूर्वी ५-६ राज्यांत ते झाले होते.

लक्षात घेण्यासारखा एक मुद्दा असा की, उमेदवारास पक्षाच्या सभासदांचे मतदान किती झाले हे महत्त्वाचे असले तरी त्यामुळे उमेदवारी आपोआप मिळत नाही. उमेदवार निवडीवर शिक्कामोर्तब करण्यासाठी पक्षाचे अधिवेशन होते, तेव्हा त्याकरिता किती प्रतिनिधी उमेदवाराने जिंकले आहेत हे महत्त्वाचे असते. यासंबंधात दोन्ही पक्षांची निवडणूक पद्धती भिन्न आहे. रिपब्लिकन पक्षाची पद्धत बरीच सोपी आहे, तर डेमॉक्रॅटिक पक्षाची गुंतागुंतीची आहे. बहुतेक राज्यांत रिपब्लिकन पक्षाच्या नोंद केलेल्या मतदारांनाच मतदान करता येते. यास अगदी थोडे अपवाद असल्यामुळे आयत्या वेळेस कोणा डेमॉक्रॅटिक वा स्वतंत्र पक्षवाल्याने आपले नाव नोंदले तर त्यालाही मतदानाचा अधिकार प्राप्त होतो. पण हे अगदी मोजक्या राज्यांत. डेमॉक्रॅटिक पक्षाच्या पद्धतीत अनेक राज्यांत पक्षसभासद नसलेल्यांना आयत्या वेळी नोंद करून मतदान करण्याचा अधिकार मिळतो.

तीच स्थिती अधिवेशनासाठी प्रतिनिधी निवडण्याबाबत. रिपब्लिकन पक्षाच्या पद्धतीप्रमाणे बहुसंख्य राज्यांत ज्या उमेदवारास सर्वांत अधिक मते मिळतील त्याच्या नावे त्या

राज्याच्या प्रतिनिधींची जी ठराविक संख्या असते ते सर्व प्रतिनिधी नोंदले जातात. ('विनर टेक्स ऑल' असे या पद्धतीचे स्वरूप आहे.) डेमॉक्रॅटिक पक्षाची पद्धती गुंतागुंतीची असून प्रमाणशीर प्रतिनिधित्व तिच्यात अंतर्भूत केले आहे. तेही सर्व राज्यांत सारखेच असते असे नाही. यामुळे यंदा नेवाडा या राज्यात हिलरी क्लिंटन यांना अधिक मते मिळाली असली, तरी ओबामा यांना त्यांच्यापेक्षा एक प्रतिनिधी जास्तच मिळाला. डेमॉक्रॅटिक पक्षाच्या या पद्धतीमुळे न्यूयॉर्क, मॅसॅच्युसेटस, न्यू जर्सी व कॅलिफोर्निया अशी विशेष मोठी राज्ये जिंकूनही हिलरी क्लिंटन यांच्या व ओबामा यांच्या मतांत फार थोडी तफावत दिसेल.

आपल्याकडे जात, धर्म इत्यादी घटक उमेदवार ठरवताना प्रभावी ठरतात. अमेरिकेत जात नाही आणि बहुसंख्य लोक ख्रिश्चन असल्यामुळे धर्माची कसोटी लावण्याचा प्रश्न नाही; पण हे सर्वार्थाने खरे नाही. धर्म जरी ख्रिश्चन असला तरी बहुसंख्य प्रोटेस्टंट आहेत व कॅथलिकांबद्दल त्यांना आत्मीयता नाही. कॅथलिक अध्यक्ष झाला तर त्या पंथाप्रमाणे पोप हा धर्मगुरू असून त्याच्या आज्ञा प्रमाण मानाव्या लागतात. अमेरिकेत घटना प्रमाण असून तिच्या बाहेर सत्ताकेन्द्र असून चालत नाही. याचमुळे जॉन केनेडी अध्यक्षपदासाठी उभे राहिले तेव्हा आपण कॅथलिक पंथाचे असलो तरी घटनाच प्रधान मानणार. पोपची वा इतर कोणाचीही आज्ञा राज्यकारभार करताना प्रमाण मानणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली व मतदारांनी ती मानली.




यंदा मिट रॉमनी हे रिपब्लिकन उमेदवार ख्रिश्चन असले तरी त्यांचा पंथ मॉर्मन हा आहे. त्याचे धर्मगुरू वेगळे असतात आणि त्याच्या रीतीभाती वेगळ्या असतात. यामुळे रॉमनी यांना केनेडी यांच्या आश्वासनाचा पुनरुच्चार करावा लागला. पण पहिल्या काही दिवसांत अमेरिकेत वाढत्या संख्येने असलेले कट्टरपंथीय ख्रिश्चन इत्यादींनी त्यांना पाठिंबा दिला नाही. रूडी ज्युलियानी व नंतर फ्रेड थॉम्पसन हे दोन उमेदवार त्यांना विशेष जवळचे वाटत होते. यांपैकी ज्युलियानी हे न्यूयॉर्कचे महापौर होते व न्यूयॉर्कवर दहशतवाद्यांनी हल्ला केला, तेव्हा ज्युलियानी यांनी केलेल्या कामगिरीमुळे त्यांचे नाव झाले. अमेरिकेचे महापौर असा त्यांचा गौरव होऊ लागला. थॉम्पसन हे अती उजवे. त्यांनी उमेदवारी जाहीर करण्यास विलंब लावला, तेव्हा उजव्या विचारसरणीच्या भाष्यकारांचा जीव खालीवर होत होता.

ज्युलियानी यांच्यावर अमेरिकेतील सर्वसाधारण लोक निहायत खूष होतेच; पण आपल्याकडे एक धनिकवणिक कुटुंबातील प्रसिद्धीवाटपात वाकबगार असलेली महिलाही अतिखूष झाली होती. म्हणून मुंबईमध्ये आगगाडीत बॉम्बस्फोट झाल्यावर ज्युलियानींसारखा नेता भारतात हवा अशी हाक तिने दिली होती. वरवरच्या प्रसिद्धीला भाळल्याचा व गुलामी मनोवृत्तीचा हा परिणाम होता. आपले लोक दहशतवादास नेहमी धैर्याने तोंड देत आले आहेत. अमेरिकन लोकांसारखे अनेक दिवस वा वर्षे ११ सप्टेंबरच्या भीतीच्या छायेत कधी दबून राहिले नाहीत. अमेरिकनांनीच याबाबतीत भारतीयांचा आदर्श ठेवायला हवा. आपल्याला कोणा ज्युलियानीची गरज नाही. ज्युलियानी यांची अनेक कुलंगडी होती ती या वेळी बाहेर आली आणि त्यांच्या निर्णयशक्तीसंबंधातच संशय निर्माण झाला. ११ सप्टेंबर २००१ रोजी न्यूयॉर्कच्या ज्या इमारतींवर दहशतवादी हल्ला झाला होता त्यांच्यावर पूर्वीही झाला होता. तरीही ज्युलियानी यांनी पोलिसांचे एक नियंत्रण केन्द्र तिथेच ठेवले होते. शिवाय अग्निशामक दलाच्या लोकांना दळणवळणाची जी आवश्यक यंत्रसामग्री लागते ती पुरवली नव्हती. यामुळे या दलाचे अनेक कर्मचारी मरण पावले. ज्युलियानी यांचे आर्थिक व्यवहार नेहमीच संशयित होते. निवडणूक प्रचाराच्या काळात याची चर्चा होऊ लागली व ज्युलियानी यांची घसरगुंडी झाली. थॉम्पसन यांनी आळशीपणामुळे जन्मात कधी मन लावून काम केले नाही. तेही मागे पडले. तेव्हा उजव्या, कडव्या ख्रिश्चनाच्या मुखंडांना रॉमनी जवळचे वाटू लागले; पण तोपर्यंत उशीर झाला होता.

या कडव्या लोकांना जॉन मॅकेन हे रिपब्लिकन असूनही मान्य नव्हते, कारण ते २००० साली बुश

यांच्याविरुद्ध उभे होते. शिवाय बुश यांनी जेव्हा मोठ्या प्रमाणात करकपात करण्याचे (ही कपात श्रीमंतांना झुकते माप देणारी होती) जाहीर केले, तेव्हा मॅकेन यांनी विरोध केला. तसेच इराकमधील युद्ध योग्य रीतीने चालले नसल्याची ते टीका करत आणि पकडलेल्या संशयितांना अमानुषपणे वागवण्यास त्यांनी विरोध केला. यामुळे मॅकेन हे रिपब्लिकन असले तरी ते कडव्या ख्रिश्चन पंथीयांना जवळचे वाटत नव्हते व नाहीत. यामुळे निवडणूक मोहीम सुरू झाली तेव्हा मॅकेन अगदीच मागे होते. पण या कडव्यांची लाडकी व्यक्तित्वे घसरणीला लागली व त्यांनी माघार घेतल्यावर रॉमनी यांना पाठिंबा देऊनही ते यशस्वी होत नव्हते, कारण त्यांच्यापेक्षा जहाल धर्मवादी म्हणून माइक हकबी हे एकेकाळचे आरकान्साचे गव्हर्नर व बाप्टिस्ट धर्मगुरू सरसावले. त्यांनी आतापर्यंत रॉमनी यांची मते खाल्ली व मॅकेन यांचे पारडे आणखीच जड केले. पुढारलेल्या अमेरिकेत धर्माचा पगडा किती व कसा आहे हे यामुळे स्पष्ट होते.




१२ फेब्रुवारी रोजी ज्या तीन ठिकाणी मतदान झाले त्या तिन्ही ठिकाणी मॅकेन व ओबामा यांनी त्यांच्या पक्षीय विरोधकांवर मात केली. ओबामा यांची विजयाची घोडदौड चालूच आहे. त्यांनी एकापाठोपाठ सात ठिकाणी श्रीमती हिलरी क्लिंटन यांचा पराभव केला. त्यांचा ताजा विजय हा मॅकेन यांच्या विजयाइतकाच किंबहुना अधिक महत्त्वाचा आहे. याचे कारण असे की त्यांनी हिलरी यांच्यापेक्षा दुपटीहून अधिक मते मिळवली.

तसेच त्यांनी हिलरी क्लिंटन यांना मते देणाऱ्यांतील अनेकांची मते खेचून घेतली. तरुण व तरुणी, साठीच्या पलीकडील गोरे पुरुष, कमी उत्पन्न मिळवणारे गोरे स्त्रीपुरुष आणि लॅटिन अमेरिकन देशांतून आलेले (यांना लॅटिनो म्हणतात) यांचा पाठिंबा हिलरी क्लिंटन यांना आतापर्यंत मिळत आला. व्हर्जिनिया व मेरिलँडमध्ये झालेल्या मतदानाच्या वेळी ओबामा यांनी यातले असंख्य मतदार त्यांच्याकडे वळवण्यात यश मिळवले.

हे यश मिळवूनही ओबामा यांना पक्षाची उमेदवारी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला नाही. हिलरी यांनी विजय मिळवला असता तरी ते हेच दृष्य दिसले असते. कारण डेमॉक्रॅटिक पक्षाची गुंतागुंतीची निवडणूक पद्धती. आता ओबामा यांनी मिळवलेल्या यशामुळे त्यांना हिलरी यांच्यापेक्षा २५ ते ३० प्रतिनिधी जास्त मिळतील. त्या पक्षाची उमेदवारी मिळवण्यास २०२५ प्रतिनिधी मिळवावे लागतात. डेमॉक्रॅटिक पक्षाचे ओबामा व हिलरी क्लिंटन हे दोन्ही तुल्यबळ उमेदवार असल्यामुळे व प्रमाणशीर प्रतिनिधित्वामुळे या दोघांपैकी कोणासच ही संख्या प्राप्त करून घेणे अवघड आहे.

या उलट रिपब्लिकन पक्षाची अवस्था आहे. मॅकेन व हकबी या दोन उमेदवारांत हकबी अगदीच मागे असून ११९१ ही प्रतिनिधींची कमाल संख्या मिळवणे हे मॅकेन यांना अगदी सुलभ आहे. यामुळे ओबामा व हिलरी हे जाहीररीत्या एकमेकांवर टीकाप्रहार करत असताना मॅकेन यांची उमेदवारी ४ मार्चपर्यंत वा त्या अगोदर जाहीर होईल.

मॅकेन यांच्या यशामुळे कडवे धर्मवादी नाराज झाले असून उपराष्ट्राध्यक्षपदासाठी मॅकेन यांनी कडवा धर्मवादी उमेदवार निवडल्यास त्यावर समाधान मानण्याची त्यांची तयारी दिसते. मॅकेन यास विरोध करणार नाहीत. आताच दोन-तीन उमेदवारांची नावे घेतली जात आहेत. तसे झाल्यास रिपब्लिकन पक्षातील दुही बरीच कमी होण्याचा संभव आहे. तसेच कडवे धर्मवादी मॅकेन यांच्यावर नाराज असले, तरी ओबामा वा हिलरी यांपैकी कोणालाच अध्यक्षपद मिळू नये याबद्दल त्यांचे एकमत असल्यामुळे राष्ट्रीय निवडणुकीच्या वेळी त्यांचा मॅकेन यांना पाठिंबा राहील. या धर्मवाद्यांना एक स्त्री वा एक आफ्रो-अमेरिकन पुरुष अमेरिकेचा अध्यक्ष होणे मान्यच नाही.

यापुढे ज्या राज्यांत उमेदवार निवडण्यासाठी डेमॉक्रॅटिक पक्षाचे सभासद मतदान करतील, त्यातूनही ओबामा व क्लिंटन यांना कमाल प्रतिनिधी मिळवण्याची मर्यादा गाठता येणार नाही. यावर एक उपाय त्या पक्षाच्या निवडपद्धतीत आहे. तो म्हणजे खास प्रतिनिधींचा कौल घेण्याचा. त्यांची

संख्या ७०० पर्यंत आहे. यात माजी अध्यक्ष, पक्षाच्या वरिष्ठ वर्तुळातील सदस्य, प्रतिनिधी सभा व सेनेटचे अनेक सभासद इत्यादींचा समावेश होतो. यांपैकी काहींनी अगोदरच आपला पाठिंबा दोहोंपैकी एका उमेदवारास जाहीर केला आहे. त्यांनी व उरलेल्यांनी ओबामा वा क्लिंटन यांनाच मत देण्याबाबतचे दडपण वाढत आहे. उलट बहुसंख्य सभासदांनी दिलेला कौल अल्पसंख्य अशा खास प्रतिनिधींनी डावलता कामा नये, अशी ओबामा यांची भूमिका असून ती अगदीच बिनबुडाची नाही. अर्थात पूर्वी हा उपाय वापरला गेला होता हेही खरे; पण वातावरण तापले असल्यामुळे कोणीही शांतपणे विचार करण्यास तयार नाही.

एक गोष्ट मात्र स्पष्ट आहे की, ओबामा यांनी समाजातला फार मोठा वर्ग आकर्षित केला आहे. या वेळेला सभा व मतदान यांसाठी मोठी गर्दी जमत आली आहे आणि रिपब्लिकन पक्षापेक्षा डेमॉक्रॅटिक पक्षाला सर्वांत अधिक प्रतिसाद आहे. याचे एक कारण स्पष्ट दिसते ते हे की, लोक बुश प्रशासनास विटले आहेत. त्यांना हे सर्व बदलायला हवे आहे.

**या कडव्या लोकांना जॉन मॅकेन हे रिपब्लिकन असूनही मान्य नव्हते, कारण ते २००० साली बुश यांच्याविरुद्ध उभे होते. शिवाय बुश यांनी जेव्हा मोठ्या प्रमाणात करकपात करण्याचे (ही कपात श्रीमंतांना झुकते माप देणारी होती) जाहीर केले, तेव्हा मॅकेन यांनी विरोध केला. तसेच इराकमधील युद्ध योग्य रीतीने चालले नसल्याची ते टीका करत आणि पकडलेल्या संशयितांना अमानुषपणे वागवण्यास त्यांनी विरोध केला. यामुळे मॅकेन हे रिपब्लिकन असले तरी ते कडव्या ख्रिश्चन पंथीयांना जवळचे वाटत नव्हते व नाहीत.**

डेमॉक्रॅटिक पक्ष जेव्हा केव्हा आपला उमेदवार ठरवील तेव्हा त्या उमेदवारास जॉन मॅकेन यांना तोंड द्यावे लागेलच. पण रिपब्लिकन पक्षाच्या प्रचाराच्या तोफखान्यासही द्यावे लागेल. सध्या हवा अशी आहे की, ओबामा यांना डेमॉक्रॅटिक पक्षाची उमेदवारी मिळेल. प्रसारमाध्यमांनी त्यांना मार्ग मोकळा ठेवण्याचे धोरण अवलंबिले आहे. त्यांच्या कोणत्याही वक्तव्याबद्दल प्रश्न विचारला जात नसून निव्वळ कौतुकाचा वर्षाव चालला आहे. लिंकन, रूझवेल्ट, जॉन केनेडी इतकेच नव्हे तर चर्चिल इत्यादींचे गुण त्यांच्या जागी पाहिले जात आहेत. काहींना वाटते अमेरिकेला असा नेताच आतापर्यंत मिळाला नाही. म्हणजे जॉर्ज वॉशिंग्टन, जेफर्सन, मॅडिसन, हॅमिल्टन इत्यादी संस्थापक हे सर्व बाराच्या भावात गेले. तथापि, अमेरिकन प्रसारमाध्यमांच्या इतकी उथळ माध्यमे जगात कोठे असण्याचा संभव नसल्यामुळे हे असेच चालणार.

आतापर्यंत डेमॉक्रॅटिक पक्षात अंतर्गत वाद होत आला असला, तरी ओबामा यांना उमेदवारी मिळाली की हा वाद ते व रिपब्लिकन पक्ष यांच्यात सुरू होईल. मग ओबामा यांना केवळ कौतुकच वाट्याला येणार नाही. आज ओबामा यांना प्रश्न विचारणे म्हणजे आफ्रो-अमेरिकन लोकांनाच प्रश्न विचारण्यासारखे होऊन बसले आहे. पुढे जेव्हा प्रचारमोहीम सुरू होईल तेव्हा यात बदल होईल. ओबामा यांना प्रश्न विचारले जातीलच. निवडणूक प्रक्रियेत ते अनिवार्य आहे. यामुळे आजच्यासारखी नुसती तत्त्वचर्चा करून भागणार नाही. प्रत्यक्ष योजना काय याचा खुलासा मागितला जाईल.

आपण खास हितसंबंधांच्या विरुद्ध असून त्यांच्या प्रतिनिधींना मज्जाव करू, अशा घोषणा करून आज ओबामा यांचे भागते. पण नंतर त्यांना मदत करणाऱ्यांत कोणते खास हितसंबंध, कंपन्या इत्यादी गुंतले आहेत याची यादीच बाहेर येईल. आरोग्य, शिक्षण, घरबांधणी इत्यादी संबंधांतील योजना द्यावी लागेल. तसेच परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत केवळ युद्ध नको इतके सांगून भागणार नाही. पाकिस्तानातील अल कायदाचा बंदोबस्त मुशर्रफ सरकारने केला नाही तर आपण अध्यक्ष या नात्याने पाकिस्तानात अमेरिकन सैन्य पाठवून बंदोबस्त करू, अशी घोषणा मध्यंतरी ओबामा यांनी केली होती व वादळच निर्माण केले. यात त्यांचे अज्ञान प्रगट झाले.

अर्थात तेही बदलतील. त्यांनी वरवरचे बोलणे बंद करून ठोस उपाय स्पष्ट करण्यास सुरुवात केली तर मॅकेन यांना उत्तर देणे त्यांना शक्य होईल. ओबामा यशस्वी झाले तर अमेरिकेच्या अध्यक्षपदी एका आफ्रो-अमेरिकनाची प्रथमच निवड होऊन अमेरिकेच्या इतिहासातील तो एक अतिशय महत्त्वाचा टप्पा ठरेल. पण ओबामा यांना हे सहजासहजी प्राप्त होणार नाही. आज जी स्तुतिपाठक प्रसारमाध्यमे त्यांना भूल देत आहेत, तीच नंतर त्यांच्यावर उलटतील. अल गोर यांना प्रथमपासून प्रसारमाध्यमांचा विरोध होता. आज हिलरी नको म्हणून त्यांना ओबामा हवे आहेत; पण नंतर मॅकेन की ओबामा असा विकल्प उभा राहील आणि मग या माध्यमांचा व स्तंभलेखकांचा उदारमतवादाचा बुरखा दूर होऊन मुळचा वंशवाद उघड होण्याची शक्यता आहे. तेव्हा आजच्या प्रचाराच्या वावटळीने आपण दिशाभूल करून न घेता एप्रिल व नंतर काय दिसेल त्याची वाट पाहणे योग्य.

govindtalwalkar@hotmail.com

■

# राजको गुस्सा क्यूं आता है?

## हेमंत देसाई

मुंबई व उर्वरित महाराष्ट्रास सलग तीन दिवस पूर्णवेळ आणि आणखी नऊ दिवस अंशत: वेठीस धरले गेल्यावर, अखेर १३ फेब्रुवारीस 'महाराष्ट्र नवनिर्माण सेने'चे अध्यक्ष राज ठाकरे यांना अटक करण्यात आली. त्यांच्याप्रमाणेच अबू आझमी यांनाही अटक करून उभयतांची लगेच जामीनावर सुटका केली गेली. अटकेच्या अफवा पसरलेल्या असतानाच, आझमी यांनी पोलीस मुख्यालयात जाऊन आपण स्वत: केव्हाही पोलिसांच्या स्वाधीन होण्यास तयार आहोत, असे सांगितले. आपण शांततेचे पाईक असून नेहमीच कायद्याची बूज राखत आहोत, अशी शेखी त्यांनी मिरविली. आझमींचे गुंडांशी आणि मुस्लिम मूलतत्त्ववाद्यांशी संबंध आहेत, गेल्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. समाजवादी पार्टीचे राज्यात अस्तित्व नाही, गेल्या निवडणुकीत तर पक्षाची अब्रूच गेली. उत्तर प्रदेशात मायावतींनी मुलायमसिंगांची पळता भुई थोडी केली, त्यामुळे राज ठाकरेंनी अमिताभ बच्चनला लक्ष्य बनवून सपाला एक मुद्दा मिळवून दिला.

मुंबईतील 'भय्यां'चे आपण तारणहार आहोत, असा आभास सपाने निर्माण केला आहे. सपाचा मुंबईतील पाया मुसलमानांमध्येच आहे. आता येथील उत्तर प्रदेशी हिंदूंची मतेही मिळतील, असे सपाला वाटत असावे. त्यामुळे अबू आझमी हे राज ठाकरेंचे आभारच मानत असतील!

सुटकेनंतर हात उंचावून 'व्ही फॉर व्हिक्टरी'ची खूण करणाऱ्या आझमींसमोर प्रत्यक्षात मुळीच गर्दी नव्हती. तरीही आपण फार मोठा नेता आहोत, असा आव त्यांनी आणला. तत्पूर्वी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी भेट नाकारल्यामुळे अकांडतांडव करणारे आझमी, तसेच सपाचे अमरसिंग यांनी 'नाकाम देशमुख सरकार'वर तोंडसुख घेतले होते. उत्तर प्रदेशमध्ये मुलायम वा मायावती राजवटीत तेथे एखाद्या मराठी नेत्याने अशी टीका केली असती, तर बनारसच्या घाटावर अंगमर्दन करून त्याला थेट गंगेत डुबविण्यात आले असते!

'अटक करून नेण्यात आल्यावर राजना १२ दिवसांची शिक्षा होणार,' असे वृत्त एका हिंदी चॅनेलने दिले. अटकेचे दृश्य कव्हर करणारे मराठी पत्रकार राजना चढवत असल्याचे तारेही, दिल्लीमध्ये स्टुडिओत बसलेल्या एका वृत्तनिवेदकाने केले. बातमीत फार मतप्रदर्शन नसावे असा संकेत धाब्यावर बसवत, 'मनसेची गुंडागर्दी', 'मुंबई पेटली', 'महाराष्ट्रभर उत्तर भारतीयांविरुद्ध दंगे' अशा बातम्या हिंदी चॅनेल्सनी दिल्या. या काळात सर्वात तटस्थ वृत्ते एनडीटीव्ही व सीएनएन आयबीएनने दिली. 'आज तक'वर मनसेचे नेते शिरीश पारकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी जणू मुंबईत नाझीवाद आणला असावा, अशा थाटात आरोपीच्या पिंजऱ्यात बसवून त्यांची उलटतपासणी सुरू होती. त्यांना बोलूही दिले जात नव्हते. एका टॅक्सीवाल्यास मारहाण झाल्याचे दृश्य चार-चार दिवस दाखवण्यात आले. नाशिकमध्ये दगडफेक झाली; परंतु 'गावातले सारे हिंदी भाषिक मूळ गावी जाऊ लागले' असे वृत्त देण्यात आले. त्याच दिवशी सायंकाळी 'परगावी निघालेले वा गेलेले लोक पुन्हा नाशिकला परतू लागले', अशी बातमी दाखविण्यात आली! हिंदी वाहिन्या बेफाम झाल्या असून, फॅशन टीव्हीपेक्षा असल्या वाहिन्या या समाजाच्या दृष्टीने धोकादायक बनलेल्या आहेत.

राजना ताब्यात घेऊन विक्रोळीला नेण्यात येत असताना, त्यांच्या हातावर म्हणे दही-साखर देऊन त्यांना निरोप देण्यात आला! जणू काही समरांगणावर निघालेला वीरच तो... राजचे सासरे मोहन वाघ यांनीच ही माहिती चॅनेलवाल्यांना दिली. कदाचित ते 'शूरा मी वंदिले' असे गायलेही असतील... थोड्याच वेळात राज घरी परतले, तेव्हा झिंदाबादच्या घोषणा देत त्यांची मिरवणूक काढण्यात आली.

राजची राजकीय शक्ती मर्यादित असून, मीडियाने त्याला अवास्तव महत्त्व देऊ नये, असे मत केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी व्यक्त केले. बाळासाहेब ठाकरेंवरील राजकृत फोटोबायोग्राफीच्या प्रकाशन सोहळ्यात हजर असलेल्या पवारांनी, तेव्हा मात्र राजचे कौतुक केले होते. अर्थात नंतर मात्र 'राजकारणात काम करताना रामप्रहरी उठावे लागते व त्याकरिता रात्री-बेरात्रीचे कार्यक्रम करून चालत नाही', असा वडिलकीचा सल्लाही दिला होता, तो राजने मानला की नाही हे त्याचे जवळचे (बद)सल्लागार आणि राजदरबारातील मनसबदारच सांगू शकतील. परंतु सरकार राजच्या अटकेचा घोळ घालत असताना, शरद पवार काय करत होते? ते त्यांचे पट्टशिष्य व गृहमंत्री आर.आर.पाटील यांना आदेश देऊ शकले नाहीत का? राजला बेड्या घालायच्याच होत्या, तर त्या लवकर घालणे गरजेचे होते. तसे न घडल्यामुळे राज मोठा झाला....

> **मुंबईत चेपल्या जाणाऱ्या मराठी माणसांचे दु:खही समजावून घेतले पाहिजे. आज मराठी माणसात कसलेही न्यूनत्व नाही. तो कुठेही कमी नाही. कला, क्रीडा, उद्योग, तंत्रज्ञानात पुढे आहे. राज्यातील गरीब जिल्ह्यातील लोकांना मुंबईत येऊन प्रगती करण्याचा अधिकार आहे. मुंबईचा विकास होऊन करांचा मुख्य वाटा केंद्राकडे व बराच पैसा उत्तर भारतीयांकडे रवाना होणार असेल, तर काय फायदा? परप्रांतीयांविरुद्ध हिंसक कारवाया करणे निषेधार्ह आहे; परंतु हा उद्रेक का झाला याची पार्श्वभूमीही लक्षात घेतली पाहिजे.**

मुंबई-ठाणे महानगरपालिकांच्या निवडणुका जवळ आल्या की शिवसेना मराठीचा मुद्दा रेटते व विधानसभा निवडणुकांच्या वेळी हिंदुत्वाच्या डरकाळ्या फोडते. विधानसभा निवडणुका फार दूर नाहीत, शिवसेना कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी मोर्चे, निदर्शने, आंदोलनांचा धूमधडाका लावला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात पुन्हा युतीचा चमत्कार होईल, अशी शक्यता वर्तविली जात आहे. अशावेळी मराठी-अमराठीवरून मराठी माणसांची मते विभागली जावी, हा काँग्रेस-राष्ट्रवादीचा डाव असू शकतो. पुढील विधानसभेत विजय मिळवण्याचे मनसेचे स्वप्न नाही, कारण तेवढी त्यांची शक्तीच नाही. पण मग शिवसेनेचे पाय खेचून त्यांना सत्ता मिळू न देण्याचे 'थोर' स्वप्न तर उराशी बाळगता येईल...

राज शिवसेनेत असताना उद्धवने 'मी मुंबईकर' म्हटल्याबरोबर, राजच्या चेल्यांनी रेल्वे भरतीच्या परीक्षेसाठी आलेल्या तरुणांना बदडून काढले. आता

उद्धवने उत्तर भारतीयांची संमेलने, छट पूजा वगैरेंना हजेरी लावण्यास आरंभ करताच राजने या समाजास लक्ष्य बनविले.

मनसेचा ध्वज पाहता त्यात दलित, मुस्लिमांचे रंग मिसळलेले आहेत. आम्ही विकासाचे कार्यक्रम राबवू, कोणाला मारून प्रश्न सुटणार नाहीत, असे बोधामृत पक्षस्थापनेच्या वेळी राजने पाजले होते. पक्ष परप्रांतीयांविरुद्ध नसल्याचे स्पष्ट संकेत त्यांनी दिले होते. दलित, मुस्लिम व बाहेरच्यांच्या विरोधी ही सेनेची परंपरागत लाईन त्यांनी सोडून दिली आहे, असे वाटत होते. परंतु तसे घडलेले नाही. उलट अबू आझमीने खोड काढल्यानंतर का होईना, राजने तलवारींची भाषा केली. अबूसारख्या फालतू व नादान व्यक्तीच्या तोंडाला लागायचे कारण नव्हते.

राजने अमिताभवरही टीका केली. मागे रमेश किणी प्रकरण सीबीआयकडे सुपूर्द करण्यात आल्यानंतर, राज हादरले होते. तेव्हा केंद्रात देवेगौडा सरकार होते. मुलायमसिंग संरक्षणमंत्री होते. त्यावेळी अमिताभने मध्यस्थी केली. देवेगौडा मुंबई-दौऱ्यात अमिताभकडे आले. तेथे ही चौकशी सौम्य करावी अशी विनंती राजने देवेगौडांकडे केली, असे म्हणतात. 'शहेनशहा' चित्रपटाचे प्रदर्शन रोखण्यात आले असताना बाळासाहेबांनी अमिताभला मदत केली होती. चित्रपट संप, 'सरकार'चे प्रदर्शन अशा संकटात अमिताभला बाळासाहेबांची मैत्री फायद्याची ठरली. शिवसेना हा सपाचा शत्रू, तरीही सपाच्या खासदार जया बच्चन म्हणतात की, बाळासाहेब आम्हाला पित्यासमान आहेत. अमिताभचे परप्रांतीयपण बाळासाहेबांना खुपत नाही.

'जिगर २०००' या उपक्रमात राजने अमिताभला वक्ता म्हणून आमंत्रित केले होते. शिवसेनेत असताना व नंतरही अमिताभचा 'महाराष्ट्र द्रोह' राजला खुपला नव्हता. अमिताभचे उत्तर प्रदेशवर तरी प्रेम आहे. पण राजने महाराष्ट्रासाठी काय केले आहे?

रमेश किणी मराठीच होता आणि ज्या जागेच्या वादातून सर्व महाभारत घडले, त्यात एक गुजराती गुंतला होता. गुजरात्यासाठी मराठी माणसाने दुसऱ्या मराठी व्यक्तीचा घात केला! 'शिवउद्योग सेना' काढून राजने नॉन-रिफंडेबल ठेवी गोळा केल्या. हजारो तरुणांना नोकरीचे आश्वासन देण्यात आले. नोकऱ्या मिळाल्या नाहीत व ठेवींचे पैसेही बुडाले...

चित्रपट उद्योगात अनिल अंबानीने प्रचंड गुंतवणुकीस आरंभ केला आहे. अनिल-अमिताभ हा एक कंपू असून, त्याला शह देण्याकरिता मुकेश अंबानीही सज्ज आहे. राजचे दोस्त मुकेशमागे आहेत.

कोहिनूर मिलच्या जमीन खरेदी-विक्री व्यवसायात उन्मेष जोशी व राज ठाकरे यांनी करोडो कमावले. तेथे एकाही मराठी माणसाचा उद्धार झालेला नाही. वास्तविक मिळालेल्या पैशातला काही हिस्सा गिरणी कामगार कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी वा प्रशिक्षणासाठी राखून ठेवणे त्यांना शक्य होते.

मुंबईतील मराठी माणूस ५०% वरून ३०% वर आला आहे. उत्तर भारतीयांची लोकसंख्या ३०-४० लाख आहे. १ कोटी २० लाखात ४० लाख परप्रांतीय आहेत. २०११ पर्यंत लोकसंख्या २ कोटींवर जाईल, तेव्हा त्यांचे प्रमाण आणखी वाढेल. गिरणीधंदा साफ झाल्याने देशावरून मुंबईत येणाऱ्यांचे प्रमाण कमी झाले आहे. परप्रांतीयांमुळेच हे महानगर अस्ताव्यस्तपणे वाढत आहे. खाजगी मोटारीत बसून सिगरेटचा पुरोगामी धूर सोडणारे लोक दुसरीच आकडेवारी फेकतील. पण लोकल वा बसमधून हिंडताना, रस्त्यावरून चालताना जागोजागी फक्त भय्येच नव्हे, तर बिगरभय्ये परप्रांतीयही दिसतील...

मराठी मतांवर निवडून येणे अशक्य असल्याने उद्धवने 'खईके पान बनारस'वाला म्हणत भय्यागिरी सुरू केली आहे. या महानगरातील मजूर वर्ग संपुष्टात आला असून रिटेल, बँकिंग, विमानसेवा, सॉफ्टवेअरमधला पांढरपेशा वर्ग उरला आहे. शॉपिंग मॉल्स, हवाई या सेवाक्षेत्रात मराठी माणसाला काम द्या म्हणून शिवसेना लढे देत आहे. कारण याच क्षेत्रात मराठी माणूस आहे. असंघटित व फुटकळ क्षेत्रात परप्रांतीय आहेत. त्यांच्यासाठी काही न करता, फक्त त्यांना जगू दिले, तरी मते मिळतील, असा सेनेचा हिशेब आहे. राज व राणेंमुळे खचलेल्या सेनेला मराठी व भोजपुरी मिक्चर टॉनिकची गरज वाटते. उद्धवच्या नेतृत्वाखाली सेनेचे प्रभावक्षेत्र वाढत आहे. उलट यापूर्वीच्या निवडणुकांतील मर्यादित यश व शिवसेनेची घोडदौड यामुळे राजला काय करावे हे सुचत नव्हते. उद्धवने उत्तरभारतीय संघाच्या मेळाव्यात भाग घेताच राजने मोका साधला. वास्तविक युपी दिवस साजरा करतानाच महाराष्ट्र दिवसही साजरा करा, असे आवाहन उद्धवने तेव्हाच केले होते. उद्धववर हल्ला होताच त्याने लोकांना असली माल आवडतो, नकली नव्हे, असे उत्तर दिले. मला हिंदुत्वाचे काहीएक पडलेले नाही, मला महाराष्ट्राची काळजी आहे. असे राजने स्पष्ट केले आहे. पण त्याने राज्यासाठी काय केले आहे? मनसेने वेगवेगळ्या विकास प्रश्नांवर अभ्यासगट नेमले होते. ते या प्रश्नावर किती वर्षे अभ्यास करणार आहेत? अहोरात्र नाटक-सिनेमावाल्यांच्या गोतावळ्यात राहणारा राज तरी त्यांचा अभ्यास घेत आहे का? फक्त मीडियातल्या टोळक्यांबरोबर फड रंगवून विकासाचे प्रश्न सुटणार नाहीत.

शिवाजी पार्कवर सपाची सभा मोठी झाली, परंतु तेथे जमलेले लोक मते सपाला नव्हे, तर काँग्रेसला देणार आहेत. सेनेची मराठी मते फिरविण्यात राज यशस्वी झाला, तर ती मनसेला न मिळता राष्ट्रवादीकडे जाण्याची शक्यता आहे. कारण काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीच निवडणूक जिंकू शकेल. तेव्हा आपली मते वाया का घालवा, असा विचार सुज्ञ जनता कदाचित करील.

अर्थात हे झाले राजकारण. मुंबईत एकीकडे करोडो रुपयांची गुंतवणूक करून इन्फ्रास्ट्रक्चरच्या विकासाची कामे घेतली जात आहेत. युती सरकारने मोफत घरांची घोषणा केल्यानंतर, म्हणजे १९९५च्या पुढे या महानगरीत भय्या हातपाय पसरू लागले. लोकलने प्रवास करताना अनेकदा आपण वाराणसी, पाटणा वा अलाहाबाद एक्स्प्रेसमध्ये बसलो आहोत की काय, असे वाटते. फक्त मुंबईतच नव्हे, तर कोकण व पश्चिम महाराष्ट्रातदेखील (रत्नागिरीत तर खूपच) परप्रांतीय आहेत. अनेक गुन्ह्यांमध्ये त्यांचा हात असल्याचे उघड झाले आहे. कुठेही नैसर्गिक विधी करणे, पान खाऊन पचापचा थुंकणे, शिंकरणे, वाट्टेल तसा रस्ता क्रॉस करणे, कुठेही स्टॉल उभारणे, बेकायदा बांधकाम करणे यात परप्रांतीयांचा हात मोठा आहे.

गुंडगिरी, भ्रष्टाचार, गैरव्यवहार यात सर्वच सहभागी आहेत, अगदी मराठीदेखील. पण यासंबंधीच्या वाढत्या प्रकरणात अधिक सहभाग कोणाचा आहे याचा ट्रेंडही पहायला हवा. आपल्याकडे 'गरीब', 'सामान्य माणूस' म्हणायचे व काय वाट्टेल ते केले तरी त्याला माफ करायचे, ही रीत आहे. हा शुद्ध भंपकपणा आहे. परप्रांतीय मुंबईवर प्रेम करीत नाहीत, हा राज ठाकरे यांचा आक्षेप योग्यच आहे.

जागतिकीकरणात स्थलांतर वाढते. हंगेरी, चेचन्या, जॉर्जिया, पोलंड येथून हजारो लोक बाहेर निघून इतरत्र स्थायिक झाली. ब्रिटन-अमेरिकेत रशियन लोक कनिष्ठ कामे करत असल्याचे दिसते. फ्रान्समध्ये अल्जेरिया, मोरोक्को, तुर्कस्तानातून स्थलांतर झाले आहे. हजारो मराठी लोक युरोप-अमेरिकेत राहतात. इंदूर, बडोदा येथील संस्थानांनी मराठी कवी, कलावंतांना उदार आश्रय दिला.

भारतीय बीपीओंना कामे आऊटसोअर्स केल्याबद्दल ब्रिटन-अमेरिकेत असंतोष आहे. मलेशियात भारतीयांना, ब्रिटनमध्ये शिखांना चटके बसले आहेत. तेव्हा स्थलांतरण एकतर्फी होत नाही.

हे सर्व खरे आहे, परंतु मुंबई बेट आहे. ते एका मर्यादेपलीकडे वाढू शकत नाही. इथल्या पायाभूत सोयी वाढल्या तर गर्दी वाढणार. यावर उपाय काय?

बिहार-उत्तर प्रदेशचा विकास झाला तर ओघ घटेल. राज ठाकरेंवर बरसणाऱ्या तेथील नेत्यांनी आपल्या राज्याच्या उद्धाराकडे जरा लक्ष द्यायला हवे. शिवसेना-मनसेविरुद्ध बोलणाऱ्या पुरोगामी/प्रतिगामी हिंदी भाषी नेत्यांना हे पक्ष म्हणजेच मराठी माणूस वाटते. मराठीजनांचा तिरस्कार करण्यात इंग्रजी मीडिया पुढे असतो. त्याला बिहारी, बंगाली, मद्रासी अस्मिता चालते; पण मराठी अस्मिता खपत नाही. मराठीत न बोलता मुंबईत सुखाने राहता येते. मराठी माणूस म्हणजे हमाल, घरगडी वा सैनिक अशी त्यांची समजूत असते. सेनेला विरोध करणाऱ्यांचे कौतुक ही मंडळी करतात, त्यामध्ये मराठीद्वेष हा मुख्य घटक असतो.

सेना-मनसेने मराठीजनांसाठी काही केले नाही असे म्हणण्याचा काँग्रेसवाल्यांना अधिकार नाही. अनधिकृत बांधकामे व झोपड्या वाढविण्यात काँग्रेसचा मोठा वाटा आहे. दिल्लीत जाऊन श्रेष्ठींचे पाय चेपणाऱ्यांचा अस्मितेशी संबंध नाही.

मात्र मुंबईत चेपल्या जाणाऱ्या मराठी माणसांचे दु:खही समजावून घेतले पाहिजे. आज मराठी माणसात कसलेही न्यूनत्व नाही. तो कुठेही कमी नाही. कला, क्रीडा, उद्योग, तंत्रज्ञानात पुढे आहे. राज्यातील गरीब जिल्ह्यातील लोकांना मुंबईत येऊन प्रगती करण्याचा अधिकार आहे. मुंबईचा विकास होऊन करांचा मुख्य वाटा केंद्राकडे व बराच पैसा उत्तर भारतीयांकडे रवाना होणार असेल, तर काय फायदा?

परप्रांतीयांविरुद्ध हिंसक कारवाया करणे निषेधार्ह आहे; परंतु हा उद्रेक का झाला त्याची पार्श्वभूमीही लक्षात घेतली पाहिजे.

**– हेमंत देसाई**
सी-३, गुलमोहोर, रा.ग. महाजनी पथ,
म्युनि. बिल्डिंग, शिवडी (प.), मुंबई ४०० ०१५.

■

## नोंद ‘छोटे-मोठे राज आणि अबू’ निर्माण होऊ नयेत यासाठी ‘आरोग्य सेने’च्या तीन मागण्या

‘छोटे-मोठे राज आणि अबू सर्वत्र निर्माण होणार’ हे १६ फेब्रुवारीच्या ‘साधना’ अंकातील संपादकीय अतिशय सडेतोड आहे. कोणतीही शेरेबाजी न करता ‘राज’कारणाचे विश्लेषण यात अतिशय समर्पक शब्दांत केलेले आहे. कोणत्याही राज्यात या प्रकारच्या अशांततेच्या काळात सत्ताधारी पक्ष, प्रशासकीय अधिकारी, विविध पक्षनेते, लोकप्रतिनिधी, संस्था-संघटना यांनी त्या प्रवृत्तीविरुद्ध तातडीने हस्तक्षेप करण्याची गरज असते. ‘महाराष्ट्र नवनिर्माण सेने’ने परप्रांतीयांविरुद्ध जे आंदोलन उभे केले ते सर्वथैव निषेधार्हच आहे; परंतु वर उल्लेख केलेल्या घटकांचाही यात गाफिलपणा दिसून येतो.

कोणत्याही राज्यांत ‘छोटे-मोठे राज आणि अबू’ पुढील काळात निर्माण होऊ नयेत यासाठी –

**१)** महाराष्ट्रात विविध ठिकाणी कामधंदे करून उदरनिर्वाहासाठी राहणाऱ्या उत्तरप्रदेशवासीयांना त्यांच्या घरी जाऊन मनसेच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी हुसकावले. त्यांच्या घरातील रोख पैसे आणि मौल्यवान वस्तूही या कार्यकर्त्यांनी पळवल्याच्या अनेक घटना घडल्या. मनसे कार्यकर्ते हल्ले करत असल्याची छायाचित्रे अनेक वृत्तपत्रांत आणि दूरचित्रवाणीवरून दाखवण्यात आली. (सर्वसामान्यांमध्ये सर्वत्र दहशतीचे वातावरण असते तेव्हा – ‘राष्ट्रीय एकात्मतेची भावना नागरिकांमध्ये रुजविणे, शांतता प्रस्थापित करणे यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी महाराष्ट्र शासनाने जिल्हाधिकारी आणि पालकमंत्र्यांची नियुक्ती केलेली आहे.’ नागरिकांना प्राथमिक सेवासुविधा पुरविणे आणि त्यांच्या जीवितांचे रक्षण करणे यांची जबाबदारी अंतिमत: या दोघांवर येते.) परंतु त्या दहा-बारा दिवसांत महाराष्ट्रातील एकाही जिल्हाधिकाऱ्याने किंवा पालकमंत्र्याने रस्त्यावर येऊन शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने जनतेला जाहीर आवाहन केल्याचे दिसून आले नाही. आता तरी – ‘वृत्तपत्रांतील छायाचित्रांच्या आधारे त्या-त्या भागातील पोलिस स्टेशन्सनी संबंधित कार्यकर्त्यांचा शोध घेऊन त्यांना अटक करावी आणि त्यांच्यावर खटले दाखल करावेत’, असे आदेश त्यांनी तातडीने द्यावेत.

**२)** महाराष्ट्रात विविध ठिकाणी राहणाऱ्या परप्रांतीयांची झालेली एकूण नुकसानभरपाई आणि राष्ट्रीय संपत्तीची मनसेच्या कार्यकर्त्यांनी केलेली हानी यांचा प्राथमिक अहवाल तयार करावा. तेवढ्या रकमेचा दंड महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून सरकारजमा झाल्यानंतरच विविध जिल्ह्यांत अटक केलेल्या मनसेच्या कार्यकर्त्यांना जामीन मंजूर करावा.

**३)** कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने पोलिस खात्यास आदेश देण्याचे सर्वोच्च अधिकार ज्यांच्याकडे आहेत, अशा मंत्र्यांच्या आणि अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेचीही दखल न्याययंत्रणेने घ्यावी.

*आरोग्य सेनाप्रमुख डॉ. अभिजित वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली, १० फेब्रुवारी रोजी पुण्यातील एस.एम. जोशी सोशलिस्ट फाउंडेशन येथे ‘राज ठाकरे - अबू आझमी - परप्रांतीय आणि राष्ट्रीय एकात्मता’ या विषयावर ‘अदालत’ आयोजित करण्यात आली होती. ‘राज ठाकरे व अबू आझमी यांना तातडीने एकाच वेळी अटक करण्यात यावी आणि मुंबईचे पोलिस कमीशनर श्री. धनंजय जाधव यांना सेवेतून मुक्त करावे’ अशी मागणी यावेळी ‘आरोग्य सेने’तर्फे करण्यात आली होती. त्यानंतर नाट्यमय घटना घडल्या. तसेच – सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली येथे मनसेच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी परप्रांतीय दोन भय्यांना पळवून लावल्याचे छायाचित्र (दैनिक पुढारी - पुणे आवृत्ती, १३ फेब्रुवारी - पान नं. ११) प्रसिद्ध झाले होते. त्यानुसार आरोग्य सेनेने ‘कणकवली पोलिस स्टेशन’कडे पाठपुरावा केला. तेथील पोलिस अधिकारी श्री. कोळी यांनी मनसेच्या चार कार्यकर्त्यांना अटक केली.*

**– सत्यजित वैद्य** (राष्ट्रीय सरचिटणीस - आरोग्य सेना)
**website : www.arogyasena.org** Email – arogyasena@yahoo.co.in, satya100.vaidya@rediffmail.com

आंतरराष्ट्रीय राजकारण

# भारत-चीन संबंधातील पुढचे पाऊल

**डॉ. अशोक चौसाळकर**

**शांततेच्या दृष्टीने बहुकेंद्रीय जग बनणे गरजेचे आहे हे लक्षात घेऊन भारत सरकारने आपले धोरण आखले पाहिजे. अरुणाचल प्रदेश विशेषत: तावांगच्या बाबतीत चीनची बदलती भूमिका लक्षात घेऊन भारत सरकारने त्या भागाचा विकास करणे गरजेचे आहे. डॉ.सिंग यांनी १८००० कोटी रुपयांची विकासयोजना नुकतीच जाहीर केली. आर्थिक विकास व व्यापार या दृष्टीने या भागाचा विकास होणार आहे. थोडक्यात भारत-चीन संबंध नव्या आर्थिक पायावर स्थिर होताना आपणास दिसतात.**

१३ ते १५ जानेवारी २००८ या काळात भारताचे पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी चीनचा दौरा केला. भारत व चीन यांच्यातील संबंधांना नवी दिशा देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. अनेक दृष्टीने हा दौरा महत्त्वाचा ठरला. कारण गेल्या १५-१६ वर्षांत भारत व चीन या दोन्ही देशांत मोठ्या प्रमाणावर बदल झाले आहेत आणि इतिहासातील दुर्दैवी घटनांना मागे टाकून पुढे जाण्याचा निर्धार या दोन्ही देशांनी केला आहे.

सध्या भारत व चीन हे जगातील दोन विकसनशील देश असून, दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्था जलद गतीने वाढत आहेत. १९७८ साली चीनचे नेते डेंग झियाव पेंग यांनी 'चार आधुनिकीकरणांचा पुरस्कार करीत, नव्या आर्थिक सुधारणांना सुरुवात केली. या सुधारणांमुळे गेल्या ३० वर्षांत चीनची प्रचंड प्रगती झाली आहे. भारताने आर्थिक सुधारणा राबविण्यास १९९१ पासून सुरुवात केली. १९७८ साली चीन भारतापेक्षा जास्त विकसित होता, पण त्यात आतासारखा फरक नव्हता. भारत चीनपेक्षा १३ वर्षे मागे आहे त्यामुळे आज भारतापेक्षा चीनचे दरडोई उत्पन्न दुपटीपेक्षा जास्त आहे. गेली अनेक वर्षे चिनी अर्थव्यवस्था १० टक्के दराने वाढत आहे. गेल्या चार-पाच वर्षांपासून भारतीय अर्थव्यवस्था ८ ते ९ टक्के दराने वाढत आहे. त्यामुळे दोन मोठ्या देशांनी मैत्रीपूर्ण संबंध स्थापन करणे अत्यंत आवश्यक होते.

या प्रक्रियेस इ.स.२००३ सालच्या वाजपेयी यांच्या चीन भेटीपासून सुरुवात झाली. या भेटीत वाजपेयी व झियांग झेमिन यांनी शांतता आणि विकास यासाठी आवश्यक असणाऱ्या मार्गदर्शक तत्त्वांची मांडणी केली. २००५ साली चिनी पंतप्रधान वेन जियाबो यांच्या भारत भेटीत, भारत व चीन संबंधांच्या सुधारणेसाठी आवश्यक असणाऱ्या १० तत्त्वांची मांडणी करण्यात आली. इ.स.२००६ साली चीनचे राष्ट्रपती हु जिंताव यांनी भारतास भेट दिली. त्यांनी आपल्या भेटीत भारत व चीन संबंध सर्वच क्षेत्रात कसे पुढे नेता येतील याचे विवेचन केले.

भारत व चीन यांच्यातील संबंध सुधारत असले तरी ते पूर्णत: सुधारण्याच्या मार्गात काही अडचणी आहेत. त्या खालीलप्रमाणे...

१. १९६२ साली चीनने भारतावर अचानक हल्ला केल्यामुळे, भारत व चीनमध्ये अविश्वासाचे वातावरण कायम आहे. चीनच्या पाठिंब्यावरच पाकिस्तानने अण्वस्त्रे व प्रक्षेपणास्त्रे तयार केली याची भारतीयांना जाणीव आहे.

२. भारत-चीन संबंधात सीमाप्रश्नाची अडचण आहे. परवा-परवापर्यंत तज्ज्ञांची अशी समजूत होती की पश्चिमेकडील चीनची (अकसाई चीनबाबतची) भूमिका जर भारताने मान्य केली तर पूर्वेकडील मॅकमहोन रेषा चीन मान्य करील. २००५ च्या घोषणापत्रात ज्या भागात लोकांची वस्ती आहे, त्या भागांची अदलाबदल करता येणार नाही हे सूत्र उभय देशांनी मान्य केले होते, पण आता चीनने तावांग भागावर आपला अधिकार सांगितला आहे. तावांगचा हा भाग सधन असून, भारत-चीन यांच्यातील व्यापारात वाढ झाल्यानंतर त्याला असाधारण महत्त्व प्राप्त होणार आहे. म्हणून आता चीनने आपली भूमिका बदलली आहे. त्या भागात चीनने मोठ्या प्रमाणात रस्तेबांधकाम केले आहे. तिबेटशी हा भाग चांगल्या प्रकारे जोडण्यात आला आहे. चीनच्या या नव्या भूमिकेमुळे सीमाप्रश्न नजिकच्या काळात सुटण्याची शक्यता संपुष्टात आली आहे. भारत सरकार याप्रश्नी तडजोड करणार नाही.

३. भारत-चीन आर्थिक संबंधात विशेषत: व्यापारात चीनचा वरचष्मा असून, भारतीय उत्पादकांच्या उत्पादनांस त्यापासून धोका पोहोचत आहे. सध्या भारत-चीन यांच्यातील व्यापार २० अब्ज डॉलर्सचा असून, तो २०१० साली ४० अब्ज डॉलर्सपर्यंत जाणार आहे. थोडक्यात, या वाढत्या व्यापारात समतोल साधला जाणे गरजेचे आहे. सध्या चीनला त्यात मोठा नफा होत आहे.

'चिनी सामाजिक शास्त्रे अभ्यास अकादमी'समोर केलेल्या भाषणात डॉ.मनमोहन सिंग यांनी जागतिक राजकारणाच्या दृष्टीने दीर्घ पल्ल्याचा विचार करीत, याचा काय परिणाम होणार आहे याचे विवेचन केले. त्यात त्यांनी पुढील ३ मुद्दे मांडले.

१. इ.स.२००५ साली जागतिक राजकारणाचा व अर्थकारणाचा

गुरुत्वमध्य आशिया खंडाकडे सरकणार असून, जगातील ५० टक्के अर्थकारण आशियातून केले जाणार आहे.

२. या बदलत्या अर्थकारणात भारत व चीन हे देश दोन महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. कारण त्यांच्या अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहेत आणि जगातील एकूण लोकसंख्येच्या २/५ लोकसंख्या या दोन देशांत राहते. त्यामुळे त्यांच्याजवळ प्रचंड मनुष्यबळ असणार आहे.

३. जागतिक राजकारणात व अर्थकारणात आशियाचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन चीन आणि भारत यांनी मैत्रीचे व सौहार्दाचे संबंध स्थापन केले पाहिजेत. विशेषत: उभय देशांना उर्जेचा प्रश्न भेडसावणार असल्यामुळे, त्यांनी अणुऊर्जा व उर्जेचे अपारंपरिक स्रोत याबाबत विचार केला पाहिजे. अशा प्रकारे आपल्या भाषणात डॉ.सिंग यांनी जागतिक अर्थकारण व राजकारण यांच्या दृष्टीने भारत व चीन यांच्यातील परस्परसंबंधाचे महत्त्व सांगितले आहे.

डॉ.मनमोहन सिंग व चिनी नेत्यांमध्ये ज्या चर्चा झाल्या त्यांतून तीन महत्त्वाचे निर्णय झाले. भारताने तैवानचे स्वतंत्र अस्तित्व अमान्य करून तैवान हा चीनचाच भाग आहे हे मान्य केले. अर्थात भारताची ही जुनी भूमिका आहे आणि भारत-चीन संबंधात बिघाड झाला असतानाही भारताने ही भूमिका बदलली नव्हती, पण पुन्हा भारताकडून ही गोष्ट चीनने वदवून घेतली. दुसरी गोष्ट म्हणजे भारताच्या सुरक्षा परिषदेच्या सभासदत्वाला आतापर्यंत चीनचा विरोध होता. आता भारताच्या या मागणीस चीनने उघडउघड पाठिंबा दिलेला नाही, पण संयुक्त राष्ट्रांच्या व्यवहारात जास्त व्यापक भूमिका बजावण्याच्या भारताच्या आकांक्षांना पाठिंबा दिला आहे. चीनचे हे आश्वासन तसे अस्पष्ट आहे. त्यामुळे भारतीय वार्ताहरांनी याबाबत पाठविलेली बातमी अतिव्याप्त होती. भारताने तैवानबाबत भूमिका मांडल्यानंतर आडवळणाने चीनने अशा प्रकारचे विधान केले आहे.

भारत-अमेरिका अणुकराराचा प्रश्न महत्त्वाचा आहे. ‘उर्जानियामक मंडळा’च्या बैठकीत चीनची भूमिका महत्त्वाची असणार आहे. अणुऊर्जेबाबत भारतास मदत करण्याची तयारी चीनने दाखवली, पण ही मदत अणुऊर्जा नियंत्रक मंडळाच्या मान्यतेनंतरच करण्यात येईल, हे पण चीनने स्पष्ट केले आहे. त्यामुळे याबाबत वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेल्या बातम्या वस्तुस्थितीस धरून नव्हत्या.

डॉ.मनमोहन सिंग व चीनचे पंतप्रधान वेन जियाबो यांनी एकविसाव्या शतकासाठीचे जे घोषणापत्र जारी केले, त्यात दोन्ही देशांतील मैत्री ही जागतिक शांतता, सौहार्द आणि समृद्धी यांच्यासाठी कशी आवश्यक आहे याचे विवेचन केले आहे. संरक्षणाच्या बाबतीत हे दोन्ही देश सहकार्य करीत असून, दोन्ही सैन्यांचे संयुक्तपणे प्रायोगिक तत्त्वावर कार्यक्रम होणार आहेत. रस्तेबांधणी, रेल्वे, विमानवाहतूक, आरोग्य आणि कुटुंबकल्याण, शेती आणि पाटबंधारे या सर्वच क्षेत्रात दोन्ही देशांनी संपादित केलेल्या ज्ञानाची देवाणघेवाण झाली तर दोन्ही देशातील जनतेला त्याचा लाभ होईल.

भारत आणि चीन यांचे संबंध आता महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचले आहेत. सीमाप्रश्नावर जरी करार झाला नाही तर आर्थिक क्षेत्रातील सहकार्य मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताची जी वाढती ताकद आहे, तिची नोंद चीनने घेणे गरजेचे बनले आहे. चीनचे व्यवहारवादी राज्यकर्ते त्याबाबत सावध आहेत. चीनची वाटचाल जागतिक महासत्ता म्हणून होत आहे, म्हणून हे वास्तव लक्षात घ्यावे. जागतिक शांततेच्या दृष्टीने बहुकेंद्रीय जग बनणे गरजेचे आहे हे लक्षात घेऊन भारत सरकारने आपले धोरण आखले पाहिजे. अरुणाचल प्रदेश विशेषत: तावांगच्या बाबतीत चीनची बदलती भूमिका लक्षात घेऊन भारत सरकारने त्या भागाचा विकास करणे गरजेचे आहे. डॉ.सिंग यांनी १८००० कोटी रुपयांची विकासयोजना नुकतीच जाहीर केली. आर्थिक विकास व व्यापार या दृष्टीने या भागाचा विकास होणार आहे. थोडक्यात भारत-चीन संबंध नव्या आर्थिक पायावर स्थिर होताना आपणास दिसतात.


**अशोक चौसाळकर**

राज्यशास्त्र विभाग,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.




# म्हणून सूर्याची उपमा त्यांना साजेशी वाटते!

वसंत पळशीकर

बाबा आमटे यांचे व्यक्तिमत्त्व तळपत्या सूर्यासारखे होते. म्हणजे काय तर, ते स्वयंभू होते. त्यांनी आपल्या संगतीत येणाऱ्यांना भरभरून दिले. अनेक जण तेवढे घेऊ शकले नाहीत, पण याची त्यांना पर्वा नसे. काहींना ते सूर्यासारखे प्रखर, दाहक वाटले. त्यांच्या जवळ काही काळ जे राहिले, त्यांना असा अनुभव आला की त्यांची उष्णता आपल्याला सहन होण्यासारखी नाही. म्हणून त्यांच्याविषयी मनात आदर बाळगून, अनेकांनी स्वतःला दूर केलं आणि दूर राहून जेवढं काही घेता येईल तेवढं घेतलं.

त्यांच्याजवळ रहाण्याशिवाय गत्यंतर नव्हते असे काही लोक होते. आनंदवनामध्ये जे कुष्ठरोगी येऊन राहिले त्यांपैकी काहीजण तिथेच काम करू लागले. तसेच त्यांचे कुटुंबीयही त्यांना सोडून गेले नाहीत. त्यात मुख्य म्हणजे त्यांच्या पत्नी साधनाताई आणि त्यांची मुले – विकास, प्रकाश. बाबांनी आपली म्हटलेली तीन मुलंही कायम त्यांच्याजवळ राहिली. कामानिमित्त ते बाबांपासून स्वतंत्र झाले; पण साधनाताई झाल्या नाहीत. पुढे ही मुले आपल्या कर्तृत्वानुसार स्वतंत्र झाली. त्यांची कार्यक्षेत्रे, व्यक्तिमत्त्वे स्वतंत्र झाली. आपल्या आवडीप्रमाणे त्यांनी आनंदवनातच कामे निवडली. आपल्या कल्पनेनुसार नवे प्रकल्प हाती घेतले. त्यामुळे बाबांना बाहेरच्या कामांत लक्ष घालता आले. मुलांना आपली क्षेत्रे निवडता आली. पण साधनाताईंचे तसे झाले नाही. बाबांच्या तेजाचा दाह त्यांनी आपल्या वाट्याला घेतला. हे त्यांचे मोठेपण!

मी आमट्यांकडे गेलो तो काळ अगदी आरंभाचा. आनंदवन स्थापन झाले होते आणि हळूहळू वाढत होते. या दृष्टीने तो काळ आरंभकाळ मानता येतो. पण वास्तविक तो त्यांच्या आयुष्याचा दुसरा कालखंड. त्यावेळपर्यंतचे त्यांचे आयुष्य ही रामँटिक अशी कहाणी आहे. तिच्या खोलात जाण्याइतकी माहिती नाही. अधूनमधून काही ऐकलेले आहे तेवढेच. त्या पहिल्या टप्प्याच्या शेवटी-शेवटी बाबांना त्यांच्या आयुष्याची दिशा सापडली होती असे म्हणता येईल. ती दिशा होती कुष्ठरोग्यांसाठी आपले सारे व्यक्तित्व समर्पित करण्याची. वरोरा गावापासून दोन-अडीच मैल लांब आनंदवनाची वसाहत नुकतीच त्यांनी उभी केली होती. त्या वसाहतीत पहिल्यांदा मी अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांच्याबरोबर गेलो होतो, असे मला आठवते. त्या वेळेला प्रकाश व विकास ही दोन मुले अगदीच लहान होती. रिंगीतून (बैलगाडीतून) गावातल्या शाळेत जायचे, बाकी सगळा व्यवहार हा त्या कॉलनीतच व्हायचा. त्यांचे घर छोटेसेच पण अगत्यशील होते. कुष्ठरोग्यांची कॉलनी काही अंतरावर होती. कॉलनी म्हणजे झोपड्या. विनोबा तेथे येऊन गेले होते. भूदान पदयात्रेच्या आरंभीचा म्हणजे १९५१च्या आसपासचा तो काळ होता. बाबांचा पूर्णवेळ कुष्ठरोग्यांची वसाहत, त्यांचे औषधपाणी व त्यांची शेती बघण्यात जायचा. तसा बराच वेळ मोकळाच उरायचा. मग आमच्यासारख्यांच्या समवेत गप्पागोष्टींची बैठक रंगायची. म्हणजे बाबा बोलायचे व आम्ही ऐकायचो. सांगण्यासारखे त्यांच्याजवळ खूप असायचे. ते भरभरून सांगायचे. त्यांच्याबरोबर वसाहतीत जाणे, शेतीवर जाणे आणि चालता-बोलता त्यांचे ऐकणे यात वेळ कसा जायचा ते कळायचे नाही. आमचा मुक्काम त्यांच्या घरीच असायचा. साधनाताई सर्वांचं खाणं-पिणं करायच्या. (साधनाताईंना त्या काळी इंदू म्हणायचे – खुद्द बाबादेखील.)

त्यावेळेस त्यांच्या घरातल्या खोलीत दोन-चार फोटो असतील. त्यातला एक फोटो नॉर्मा शिअरर नावाच्या नटीचा होता. त्या नटीने त्यांना भेट म्हणून पाठवलेला. त्यांच्या पूर्वायुष्याची एक खूण असलेला. पण त्यांचे सर्व पूर्वायुष्य कोणालाही हेवा वाटावा असे गेले होते. ते किती वेगळे गेले असेल याची कल्पना त्या फोटोवरून येईल.

त्या काळात माझे वरोऱ्याला जाणे-येणे पुष्कळ घडले. कारण मी जवळच सेवाग्रामला अण्णासाहेबांबरोबर काम करीत असे. तिथे एक 'वर्क कँप' चाललेला होता. 'सर्व्हिस सिव्हिल इंटरनॅशनल' या स्वयंसेवी संस्थेचा कॅम्प होता. ही संघटना युरोपमध्ये काम करायची. त्यांच्याकडे काम करणाऱ्या मंडळींपैकी ६-८ माणसे ती भारतात वर्षासाठी पाठवायची. ही टोळी ठिकठिकाणी काम करायची. स्वयंसेवक म्हणून स्थानिकांनी सहभाग दिला तर ते आनंदाने स्वीकारायचे. मी सेवाग्रामला असताना त्यांच्यामध्ये सहभागी झालो. आमच्याकडचे – सेवाग्रामचे काम पाहिल्यावर तिथे – आनंदवनात आपल्याला एखादा कॅम्प घेता येईल असे माझ्या मनात आले. योगायोगाने सर्व जुळून येऊन चार महिन्यांचा कॅम्प

घेतला. आम्ही २५-२६ लोक होतो. दोन गवंडीही आमच्यामध्ये राहिले होते. आमच्या वसाहतीत कुष्ठरोगीही काम करायचे. दर शनिवार-रविवार गावातली मंडळीही यायची. नंतर प्रश्न आला, आम्ही जेवणार कुठे? आमच्या जेवणाची सोय आमट्यांच्या घरीच करायची ठरली. साधनाताईंच्या मदतीला कोणी-कोणी येऊन राहिले. त्यात माझ्या आईनेही वाटा उचलला. त्यामुळे शिबिरार्थींना घरचे उत्कृष्ट जेवण मिळाले. राहण्याची सोय निवासस्थाने उभे करून केली होती. चार महिने आमट्यांचे घर व शिबिरार्थींचे निवासस्थान हे जवळपास एकच होते. शिबिरामध्ये जेवणखाण जसे घरचे होते, तसेच भांडी घासणेही आम्हीच करत होतो. त्या चार महिन्यांत चार घरे व एक विहीर एवढे काम आमच्या शिबिराने पूर्ण केले.

यामुळे आमटे कुटुंबीयांची व माझी घसट वाढली. माझ्या घरचे सर्वजण आमट्यांच्या कुटुंबाशी परिचित झाले. त्यावेळेला आमट्यांचा परिचय महाराष्ट्रात नुकताच व्हायला लागला होता. 'साधना'मध्ये यदुनाथ थत्ते, गोपाळ शहा ही मंडळी त्यांच्या कामाबद्दल वारंवार लिहित. पुढे २-३ वर्षांनी लोकांचे बाबांकडे जाणे-येणे चालू झाले. हळूहळू बाबांचा परिचय महाराष्ट्र व देशभर झाला. पण ही सर्व नंतरची घडामोड. त्याची सुरुवात आमच्या शिबिराने झाली असे म्हणता येईल. 'सर्व्हिस सिव्हिल इंटरनॅशनल' या संस्थेचे कार्यकर्ते पीअर ओपलीगर, श्रीमती एथेलवीन बेस्ट हे दोघेही बरीच वर्षे आनंदवनमध्ये येत राहिले.

यदुनाथ थत्ते यांनी आनंदवनाची मोठी कदर केली. 'साधना'ने वर्षानुवर्षे बाबा आमटेंच्या कामाचे गुणगान केले. त्यांच्या लेखनाला प्रसिद्धीही दिली. 'ज्वाला व फुले' हे बाबा आमटेंचे पुस्तक 'साधना'तूनच प्रसिद्ध केले.

**त्यांच्याकडे असतानाचा एक प्रसंग आठवतो. नवीन ट्रॅक्टर घेतला होता. त्यावर बाबा स्वतः बसले. एक चक्कर मारली आणि पुढे कोणालाही कल्पना नसताना त्यांनी एका रुग्ण बाईला बोलावले. तिला बैस म्हटले. त्या बाईच्या लक्षात आले की आपल्याकडून ट्रॅक्टर चालवून घेणार. तिचे धाबे दणाणले. बाबा तिच्या शेजारी बसले आणि म्हणाले, 'मी सांगतो तसं करायचं' आणि तिच्याकडनं ट्रॅक्टरची एक चक्कर मारली. इथे बाबांची कल्पकता, त्यांचा सर्वसाधारण माणसांवरचा विश्वास प्रकर्षाने जाणवला. बाबांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये हा जो गुण होता त्यानं त्यांच्या कॉलनीतले सगळे लोक प्रभावित झाले होते. यामुळे त्यांची कॉलनी वेगळी उठून दिसायची.**

बाबांची किर्ती सर्वत्र पसरण्यामध्ये यदुनाथ थत्तेंचा फार मोठा हात आहे.

आनंदवनामध्ये पुढे श्रमसंस्कार शिबिरं पुष्कळ भरली. सेवादलातर्फे फार मोठी शिबिरेही भरवण्यात आली. यांपैकी एका शिबिराला मीही गेलो होतो. बाबांची त्यामागे जी कल्पना होती ती फारशी साकार होऊ शकली नाही. बाबांची पुढची सर्व स्वप्ने ही बरीचशी स्वप्नरंजनात्मक ठरली. यात बाबांचा दोष मला काही वाटत नाही. शिबिरं असोत किंवा भारत जोडोसारखी पदयात्रा असो किंवा नंतरचे त्यांनी घेतलेले प्रकल्प असोत (शेवटचा प्रकल्प नर्मदा बचाव आंदोलनाशी जोडलेला होता) त्यात सातत्य राहिले नाही. ते एकाकीच लढत राहिले. त्यांच्या मागे तरुणांची फौज जर उभी राहिली असती तर त्यांनी सुरू केलेली कामे देशाला काही मार्गदर्शन करू शकली असती. त्यांचे अपयश हे त्यांचे नसून आपल्या समाजाचे आहे. विशेष करून त्यांचा उदो-उदो करणाऱ्या लोकांचे आहे.

माझा त्यांच्या कामाशी असलेला संबंध व त्यांच्याकडचे जाणे-येणे हे पुढच्या काळात जवळपास झालेच नाही. पण त्यांचा, त्यांच्या मुलांचा व इंदुताईंचा संबंध मनात रुतून बसल्यासारखा सखोल राहिला. अधून-मधून जाणे झाले, पण तेवढेच. मी माझ्या निवडलेल्या कामात दंग होतो. त्यांचे व त्यांच्या मुलांचे काम याची दखल मात्र माझ्या मनात कायम होती.

९४ वर्षांचे आयुष्य म्हणजे काय कमी झाले? जवळपास ७० वर्षांचे आयुष्य त्यांनी कुष्ठरोग्यांच्या आणि भारताच्या नवरचनेमध्ये खर्च केले. एवढे दीर्घ आयुष्य सातत्याने लोकसेवेमध्ये खर्च करणे ही सोपी गोष्ट नाही. आतून प्रेरणा झाल्याशिवाय माणूस इतकी वर्षे काम करू शकत नाही. म्हणून सूर्याची उपमा त्यांना साजेशी वाटते.

**— वसंत पळशीकर**
२ साईराज अपार्टमेंट, विश्वास बँकेजवळ,
शारदानगर, सावरकरनगर, गंगापूर रस्ता,
नाशिक ४२२०१३.

■

**साधना वर्गणीदारांसाठी सूचना :**
**साधनासारख्या ध्येयवादी साप्ताहिकाचा प्रपंच असतो वर्गणीदारांच्या खंबीर पाठिंब्यावर. कृपया वर्गणीचे नूतनीकरण त्वरित मनीऑर्डर/ड्राफ्टद्वारा 'साधना साप्ताहिक' या नावाने पाठवून करावे.**
**वर्गणी पाठवताना आपला ग्राहक क्रमांक अवश्य कळवावा.**
**वार्षिक वर्गणी : व्यक्तींसाठी रु. ३००/-, संस्थांसाठी रु. ४००/-**

# बाबांचे मोठेपण बहिष्कृतांच्या मैत्रीत आणि प्रेमात आहे!

## कुमार शिराळकर

बाबांचं अफाट कर्तृत्व पाहून डोळे दिपतात, त्यांच्या धाडसामुळे थक्क व्हायला होतं. त्यामागील तपश्चर्या आणि तितिक्षा यांचा वेध घेतला तर काय दिसते? बाबांनी माणूस म्हणून जगायचा ध्यास घेतला होता. माणसाची मुख्यत: दोन वैशिष्ट्ये आहेत. एक म्हणजे माणूस श्रमातून वस्तूंची नवनिर्मिती करतो. दुसरे म्हणजे तो स्वत:च्या प्रतिभेतून भवितव्याला साकार करण्याचा प्रयत्न करतो. या दोन्ही वैशिष्ट्यांची पुरेपूर जोपासना बाबांनी केली. पण केवळ अशी आणि एवढीच जोपासना करून ‘बाबा’ होता आले नसते. या दोन्ही मानवी वैशिष्ट्यांची जोपासना करताना, आणखी एका उदात्त मानवी पैलूच्या अनाहूत स्पर्शाची नितांत आवश्यकता असते. हा पैलू गौतम बुद्धाने भारतीय जनमानसात रुजवण्याचा आटोकाट प्रयास केला. तो इथे किती राहू शकत नसे. तिला कृतिशीलतेचे पंख फुटत असत.

बाबांच्या जीवनातील एका प्रसंगाचे त्यांनीच केलेले कथन ज्यांनी ज्यांनी ऐकले असेल, त्यांना बाबा आमटे नावाच्या माणसात किती उदात्त चमत्कार भरलेला होता, याचा उत्कट प्रत्यय निश्चित आला आहे. जिचे शरीर नखशिखांत पसरलेल्या जखमांनी विद्ध आणि विद्रूप झाले आहे आणि जिच्या जखमांना असंख्य सूक्ष्म जीवजंतू-आळ्यांनी बरबटले आहे अशा स्त्रिया वेदना कितीतरी जणांनी पाहिल्या. कित्येक जण हळहळले, व्याकुळले, दूर पळाले. बाबांच्या मनात उत्पन्न झालेली करुणा या वेदनेपासून दूर हटण्यासाठी नव्हती. त्यांची करुणा कृतीकार्याची जननी होती. बाबांच्या बाहूंनी तो विकलांग, यातनांचे असह्य फुत्कार सोसणारा मानवी देह उचलला आणि कमालीच्या ममत्वाने त्या देहाची त्यांनी

> **बाबांनी सोमनाथला श्रमिक कार्यकर्ता विद्यापीठ काढले. या विद्यापीठाची माहिती ‘साधना’ साप्ताहिकात वाचून पहिल्या बॅचचे विद्यार्थी म्हणून प्रवेश घेण्याची संधी आम्हाला मिळाली. या विद्यापीठाने जे शिक्षण दिले तसे जगात दुसरीकडे कुठेही उपलब्ध असेल असे मला वाटत नाही. महारोग्यांच्या सान्निध्यात आणि श्रमसहकार्यात घालविलेला तारुण्यातील ऐन उमेदीचा तो छोटासा कालखंड खूप काही शिकवून गेला. तिथले संस्कार चिरंतन जपावे असे आहेत. श्रम आणि बुद्धीचा उपयोग समाजातील तळागाळातील सर्वहारांच्या मुक्तीसाठी करण्याचे बाळकडू महारोगी विद्यापीठातून मिळाले याचा मनस्वी अभिमान वाटतो.**

रुजला ते सर्वांना माहिती आहेच. किंबहुना तो फारच अभावाने रुजल्यामुळे त्याची महतीही खूप वाढली. बुद्धाने करुणेचे महत्त्व सांगितले. हीच करुणा बाबांच्या ध्येयवादाची अथक प्रेरणा बनली.

तसे पाहिले तर प्रत्येक माणसात करुणा कधी ना कधी उचंबळून येतच असते. करुणेचा आणि स्वत:ला भोगाव्या लागणाऱ्या दु:खाचा तसा काही संबंध नसतो. मात्र दुसऱ्याचे दु:ख पाहून माणूस हळहळतो तेव्हा त्याच्या मनात करुणा उत्पन्न होण्याची शक्यता असते. काही माणसे करुणेवर मात करून नामानिराळी होऊ शकतात. काहीजण करुणेने व्याकूळ होऊन स्वत:ला विव्हलतेच्या डोहात ढकलून देतात. बाबांच्या मनात दुसऱ्याचे दु:ख पाहून निर्माण झालेली करुणा विझत नसे. अशा करुणेवर मात करून त्या दु:खापासून स्वत:ला दूर खेचण्याइतके दुबळेपण त्यांच्यात नव्हते. करुणेच्या कचाट्यात गुरफटवून स्वत:चे माणूस म्हणून असणारे अस्तित्व हरवून टाकण्याएवढी भावनाविवशता बाबांना कधी शिवली नाही. त्यांच्या मनात उत्पन्न होणारी करुणा एका सर्जनशील साधकाची करुणा होती. त्यांची करुणा थबकत शुश्रूषा केली. कालांतराने त्या देहावरील जखमा भरून निघाल्या. बाबांची काव्यमय प्रतिभा उद्गारली. ‘‘जखमा समृद्ध झाल्या!’’ बाबांची करुणा अशी समृद्ध होत गेली.

महारोगी! समाजाने झिडकारलेले बहिष्कृत! भारतीय जातीव्यवस्थेने अस्पृश्य ठरविलेल्या माणसांना समाजाने झिडकारले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी याला ‘बहिष्कृत भारत’ म्हटले. महारोग्यांनादेखील समाज दूर लोटतो. तो अमुक एका जातीचा म्हणून नव्हे. तो कोणत्या जातीचा आहे वगैरे काही पाहिले जात नाही. अगदी जीवाभावाची नातीदेखील इथे संपवली जातात. बहिष्कृतता गृहीत धरून ज्यांना जीवनाचा रथ खेचायचा असतो, त्यांची मानसिकता घालमेलीने पूर्णपणे झाकोळून गेलेली असते. निराशा आणि वैफल्य यांनी थिजून गेलेल्या पराभूतांना जगण्याची ऊर्मी देण्याचा महान प्रकल्प बाबांनी उभारला. महारोग्यांची मनोभावे सेवा करण्याचे व्रत घेतलेल्या अनेक थोर व्यक्ती भारताने अनुभवल्या. बाबांनी सेवेची प्रांगणे ओलांडून पलीकडे जायचे ठरविले.




श्रमातून गरजेच्या वस्तूंची निर्मिती करणे हे वैशिष्ट्य बहिष्कृत माणसातून नष्ट झालेले नसते. महारोग्यांची बहिष्कृतता म्हणजे सामाजिक बधीरपणाची एक क्रूर परिणती असते. बाबांनी दोन गोष्टी एकाच वेळी साध्य केल्या. बहिष्कृत बधिर शरीरांना श्रम करण्याची संधी आणि ऊर्मी उपलब्ध करून देऊन त्यांना माणसात आणले. दुसरी गोष्ट जाणीवपूर्वक केली, ती म्हणजे सामाजिक बधिरतेवर कठोर प्रहार केले. बहिष्कृतांच्या शारीरिक विद्रूपते पलीकडील माणसात डोकावण्याएवढे बळ समाजाला दिले. 'आनंदवन', 'सोमनाथ', 'अशोकवन' आधुनिक तीर्थस्थाने झाली. झिडकारलेला आणि झिडकारणारा दोघांना माणूस बनविणे साधी-सोपी बाब नाही.

बाबांच्या पार्थिव देहावर पुष्पचक्रे अर्पण करण्यासाठी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी आनंदवनाला भेट दिली. हजारो माणसांचा जनसागर तिथे लोटला. समाजाच्या सर्व थरांतील, वयोगटातील आणि विविध क्षेत्रातील व्यक्तींनी बाबांना आदरांजली वाहिली. कोणत्याही महान माणसाच्या मृत्यूनंतर त्याचे अस्तित्त्व राखले जाते, त्याच्या कार्यकर्तृत्वाच्या स्मृती जागवण्यातून. प्रश्न आहे की बाबांची स्मृती कशी जागवायची? बाबांना काय अभिप्रेत होते आणि आपल्याला काय अभिप्रेत असले पाहिजे?

बाबांना वाटत असे देशातील तरुणांनीदेखील जगले पाहिजे ते स्वत: जगले तसे. अगदी तंतोतंत तसेच नाही. पण त्या आणि तशा जिद्दीने. स्वत:च्या वैयक्तिक सुख-दु:खाची पर्वा न करता. ते म्हणत, फिकीर करा दु:खितांची, स्वत:विषयी बेफिकीर रहा. रूळलेल्या वाटा सोडा. नव्या पायवाटा धुंडाळा. अंधारात उडी मारण्याचे सामर्थ्य कमवा. चाकोरीबद्ध घाण्याचे बैल बनू नका.

बाबांनी सोमनाथला 'श्रमिक कार्यकर्ता विद्यापीठ' काढले. या विद्यापीठाची माहिती 'साधना' साप्ताहिकात वाचून पहिल्या बॅचचे विद्यार्थी म्हणून प्रवेश घेण्याची संधी आम्हाला मिळाली. या विद्यापीठाने जे शिक्षण दिले तसे जगात दुसरीकडे कुठेही उपलब्ध असेल असे मला वाटत नाही. महारोग्यांच्या सान्निध्यात आणि श्रमसहकार्यात घालविलेला तारुण्यातील ऐन उमेदीचा तो छोटासा कालखंड खूप काही शिकवून गेला. तिथले संस्कार चिरंतन जपावे असे आहेत. श्रम आणि बुद्धीचा उपयोग समाजातील तळागाळातील सर्वहारांच्या मुक्तीसाठी करण्याचे बाळकडू महारोगी विद्यापीठातून मिळाले याचा मनस्वी अभिमान वाटतो. सोमनाथच्या विद्यापीठात दीक्षा घेतल्यावर बाबांनीच आम्हाला शहाद्यातील उद्दाम जमीनदार-मालदारांच्या विरोधातील आदिवासी-शेतमजुरांच्या लढाऊ चळवळीचे सैनिक बनण्याचा सल्ला दिला. सोमनाथहून शहाद्याला बाबांनी आम्हाला हाकलून लावले तेव्हा आम्हाला प्रवासाचे भाडे बाबांनी बांधलेल्या महारोगी समितीने दिले. देशातील कित्येक युवक-युवतींना बाबांनी झपाटून टाकले. बाबांच्यासारखे अतिथ्य कोण करू शकेल? पण बाबांचे मोठेपण बहिष्कृतांच्या मैत्रीत आणि प्रेमात आहे. बहिष्कृत महारोग्यांनी दिलेल्या मैत्री-प्रेमानेच बाबांचे जीवन उजळून निघाले. आणि याच बहिष्कृत महारोग्यांच्या श्रमांमधून निर्मिलेल्या संपत्तीतून आनंदवन-सोमनाथच्या परिसरातील अवीट अतिथ्याचा लाभ आज जे जे तिथे जातील त्याला मिळत आहे. बाबांची अविस्मरणीय स्मृती यातच साठवलेली आहे.

**कुमार शिराळकर**



कैफियत

राजन गवस

# आणि मग मी जवळ जवळ हाकललाच त्याला...

**आम्ही खूप पुढं आलो. नंतर शिक्षकाला सहज छेडलं. तर तो अजूनही रागातच. बडबडायला लागला, 'अहो, इथली पोरं भयंकर गावठी. कितीही समजून सांगा, समजतच नाही यांना. गेले महिनाभर मी प्रयत्न करतोय, मुलांनी 'गुरुजी' म्हणायचं बंद करावं यासाठी, पण यांच्या काही अंगवळणी पडायला तयार नाही. जग कुठल्या कुठं गेलंय. कॉम्प्युटरचा जमाना आलाय. तरी यांचं आपलं एकच– गुर्जी! सुधरायचे नाहीत साले. हे असेच मरायचे. कुजून मरणार. यांना दुसरी जागा नाही. हे इथंच सडणार.' असं बरंच काही.**

अलीकडेच जिल्हा परिषदेत प्राथमिक शिक्षक म्हणून रुजू झालेल्या एका शिक्षकासोबत, तो नोकरी करत असलेल्या गावातून फिरत होतो. गाव कोणकोणत्या बाबतीत पुढे गेलंय, हे तो तन्मयतेनं सांगत होता. गावात इतक्या राजकीय पार्ट्या आहेत, इतक्या संस्था आहेत, असं बरंच काही. त्याला ते सगळे बदल हवेहवेसे वाटणारे होते. बोलता बोलता तो प्राथमिक शिक्षकांचे हाल माझ्यासमोर ठेवत होता. प्राथमिक शिक्षकाने शाळेत शिकवूच नये, अशी व्यवस्था प्रशासनाने निर्माण केल्याचे त्याचे म्हणणे होते. 'सर्वशिक्षा अभियान, लेक वाचवा अभियान, शाहू अभियान' अशी नामावली तो उच्चारत होता. त्यात करावी लागणारी कागद भरण्याची कामं, केंद्र शाळेतले लोक, त्यांना हवे असणारे रिपोर्ट, त्यांची दादागिरी, गटशिक्षण अधिकारी, त्यांचा भ्रष्टाचार असं बरंच काय काय... एकूण त्याच्या बोलण्यावरून प्राथमिक शिक्षण पूर्ण कोलमडून गेलंय, असं जाणवत होतं.

मध्येच त्यानं 'प्राथमिक शिक्षणातील भ्रष्टाचार' याविषयी माझ्या ज्ञानात भर घालायला सुरुवात केली. एखाद्या केंद्रशाळेचा, शाळेचा मुख्याध्यापक आहारयोजना, सर्वशिक्षा मोहीम यात लाखभर रुपये कसे मिळवतो याचा वृत्तांत. या सगळ्या सांगण्यात तळमळ होती. पण या सगळ्यात आपल्या वाट्याला काहीच येत नाही, याची बोचही दिसत होती. आपल्याला फक्त पगारावर नोकरी करावी लागते हे त्याचे भळभळणारे दु:ख. त्यावर माझ्याकडे इलाज नव्हता. फक्त मान डोलवत ऐकणे, एवढंच मी करू शकत होतो. मला ते गाव, ती शाळा बघायची होती. कारण तिथं माझा एक जिवलग मित्र शिकलेला होता. त्याने शिक्षणाच्या क्षेत्रात बरीच कामगिरी केली होती. भारतीय शिक्षणाचा कायापालट करण्याचा ध्यास घेतलेला होता. युनेस्कोपर्यंत त्याचं नाव पोहोचलेलं होतं. जगातल्या काही देशांनी त्याचं शैक्षणिक धोरण स्वीकारून प्रगती केली होती. भारतातल्या राजकीय इच्छाशक्तीला मात्र तो माणूस (जे.पी.नाईक) पेलवलेला नव्हता. त्याचं बालपण या गावातलं. इंग्रज काळात या गावात शिक्षण असं नव्हतंच. इच्छाशक्ती आणि अथक परिश्रम यातून तो माणूस शिकत गेला. त्याचे दुडदुडणारे पाय ज्या गल्लीतून फिरले होते, त्या गावाच्या गल्लीतून मी हिंडत होतो. मनात श्रद्धाभाव, अंगभर पसरणारे त्या माणसाचे मोठेपण. मी ज्या कादंबरीची जुळवाजुळव करतोय त्यातले बरेच काही आणि माझ्याबरोबरच्या या प्राथमिक शिक्षकाने सुरू केलेले आजचे शिक्षण. काही विचित्र अनुभवत होतो मी. मध्येच त्या शिक्षकाने थांबवले. म्हणाला, 'ही इमारत केंद्र सरकारच्या अनुदानातून बांधली. बांधलेली त्या दिवसापासून ह्या इमारतीत शाळा भरत नाही. बांधकामातला सगळा पैसा आमक्या-तमक्यांनी खाल्ला. फक्त सांगाडा उभा केला', असं बरंच काही. त्यात मला कोणताच रस नव्हता. आपल्या रोमरोमात भिनलेला भ्रष्टाचार. त्याचं कौतुक तरी किती करायचं? मी त्याला थांबवून, या गावातून आजवर शिकलेल्या लोकांची यादी करण्याच्या प्रयत्नात होतो. काही इंजिनियर, काही प्राध्यापक अशी नावं तो माझ्यासमोर ठेवत होता. मध्येच 'आज शिकणाऱ्यांना नोकऱ्या कुठं आहेत', अशी एक नवी टेप त्यानं लावली. त्याच्याकडं मी लक्ष देत नाही, हे लक्षात आल्यावर त्यानं टकळी बंद केली. फक्त शांतपणे तो चालायला लागला.

गावातली एक एक गल्ली आम्ही पार करीत होतो. माझं बालपण माझ्यासमोर सहजपणे येत चाललं. चाळीस वर्षांपूर्वीच्या प्राथमिक शाळा. जीव ओतून शिकवणारे शिक्षक. चौथीत आमची घराबाहेर पडलेली वळकट, कंदिलाच्या प्रकाशात पुस्तक पगळून बसलेलं बालपण. आम्ही गल्लीतून जात होतो. गल्लीच्या शेवटच्या टोकाला लहान मुलांचा घोळका खेळत होता. आम्हाला बघितल्या बघितल्या तो मुलांचा घोळका, खेळ थांबवून आमच्याकडं सरकायला लागला. बहुतेक ती मुलं माझ्याबरोबर चालणाऱ्या शिक्षकाचे विद्यार्थी होते. कुतूहल, दबलेपण, मुलं आमच्याजवळ आली. निरागस, निर्विकार, नितळ. त्यांच्याशी माझा बोलण्याचा प्रयत्न, ती बुजलेली. आम्ही पुढं चाललो. काही मागं. त्यांची कुजबूज. थोडं अंतर गेल्यावर त्यांच्यातील एक ओरडला– 'ते आमचे गुर्जी.'

माझ्याबरोबरचा शिक्षक गर्रकन मागे वळला. पळत जाऊन त्या ओरडणाऱ्या विद्यार्थ्याला पकडलं. बकोट्याला गच्च धरलं आणि त्याच्या कानशिलात लगावली. पोरगं कळवळलं. तसा शिक्षक

ओरडला; ‘शाळेत काय सांगितलंय? गुरुजी नाही सर म्हणायचं!’

त्या मुलाला बोलताही येत नव्हतं आणि रडताही. बिचारं कसनुसा चेहरा करून थांबलं. या शिक्षकाला ‘गुर्जी’ म्हटल्याचा भयंकर राग आला. तो अजूनही रागानं फणफणलेला. त्याला एवढा राग का आला, हे मात्र मला कळत नव्हतं. पोरं दिसेनासी झाली. आम्ही खूप पुढं आलो. नंतर शिक्षकाला सहज छेडलं. तर तो अजूनही रागातच. बडबडायला लागला, ‘अहो, इथली पोरं भयंकर गावठी. कितीही समजून सांगा, समजतच नाही यांना. गेले महिनाभर मी प्रयत्न करतोय, मुलांनी ‘गुरुजी’ म्हणायचं बंद करावं यासाठी, पण यांच्या काही अंगवळणी पडायला तयार नाही. जग कुठल्या कुठं गेलंय. कॉम्प्युटरचा जमाना आलाय. तरी यांचं आपलं एकच– गुर्जी! सुधरायचे नाहीत साले. हे असेच मरायचे. कुजून मरणार. यांना दुसरी जागा नाही. हे इथंच सडणार.’ असं बरंच काही.

माझे मन एकदमच सुन्न, बोलायची इच्छाच संपलेली. त्या शिक्षकाची मात्र टकळी सुरूच, ‘ह्या मुलांच्या घरचेच लोक त्यांना गुर्जी म्हणायची सवय लावतात. त्यांच्याच डोक्यातून गुर्जी निघत नाहीत. तेच बरळतात गुर्जी. गुर्जी मग पोरं त्यांचंच उचलतात’ असं बरंच काही.

त्या सगळ्या प्रकाराने मी पार हादरलो होतो. त्या शिक्षकाने त्या मुलाच्या थोबाडीत मारली नव्हती, माझ्याच थोबाडीत हानली होती. इतका विव्हळ झालो. कळ मेंदूपर्यंत पोहोचलेली. गुरुजी माझं परमदैवत. मराठी शाळेतले गुरुजी, आज जरी रस्त्यात दिसले तरी लहान मूल होऊन मी नतमस्तक होतो. पुढे हायस्कूलात, कॉलेजात कैक शिक्षक भेटले. त्यांनी कैक गोष्टी शिकविल्या, यशाच्या पायऱ्या त्यांच्या आधारावरच चढत गेलो. पण लक्षात राहिले, मनावर कोरले गेले, ते प्राथमिक शाळेतले गुर्जीच. साध्या विजार-शर्टातले, काही धोतर-टोपीतले. हरिभाऊ आर्दाळकर नावाचे गुरुजी पंचा आणि काळा कोट घालत. शाळा चुकविली की पाच-सहा पोरं घेऊन घरी येत. असेल त्या अवस्थेतच पालखी करून शाळेत नेऊन टाकत. कधीकधी हातपाय दोरीने एकत्र बांधून शाळेतल्या खुंटीला अडकवून देत आणि प्रेमही तितकेच करत. एखादा मुलगा आजारी पडला, तर गुरुजी त्याच्या घरात हजर. गुरुजींची आणि आमची वळकट शाळेतच. विहिरीवर पोहायला घेऊन जाणारे, डोंगरावर वनस्पतींचे कुळजुळ सांगणारे, क्रीडांगणावर आमच्यासह रांगणारे आणि वर्गात ‘गायी पाण्यावर काय म्हणून आल्या.’ ही कविता शिकविताना डोळ्यातून घळघळा वाहणारे पाणी आवरण्याचा प्रयत्न करणारे. त्यांच्याशिवाय आज आठवतच नाही कुणाचा तास.



पुढे साने गुरुजींच्या पुस्तकांचा परिचय झाला. शाम सोबत वावरू लागला. मग गुरुजी घरंच करून बसले मनात. पुढल्या आयुष्यात फक्त ज्ञानी माणसालाच आम्ही ‘गुरुजी’ हा शब्द वापरला. आम्ही मित्र-मित्र आजही बोलायला लागलो की म्हणतो, ‘नेमाडे गुरुजींची मुलाखत वाचली का? पवार गुरुजींची भेट झाली होती.’ इतकी ‘गुरुजी’ ह्या शब्दावर आमची भक्ती, तोच शब्द या नव्या शिक्षकाला का डाचला असेल? या शब्दाचा तिरस्कार त्याच्या मनात कसा भरला असेल? माझ्या डोक्यात प्रश्नांची गुंतावळ. मला त्याच्यासोबत चालणेही नको वाटायला लागलं. त्याला मी मध्येच थांबवून. म्हटलं ‘मला एकट्याला इथं फिरायचं आहे, तुम्ही निघून जा.’ तो एकदम चक्रावलाच. गप्पगार उभा राहिला आणि मग मी जवळजवळ हाकललाच त्याला. तो दिसेनासा झाल्यावर मला थोडं मोकळं-मोकळं वाटू लागलं.


**राजन गवस**

मु.पो.गारगोटी, ता.गडहिंग्लज,

जि. कोल्हापूर.

मोबा. : ९४२२५८०५१७

वाचक चळवळ

# वाचन - जीवनरस!

## शुभदा जोशी

मला आठवतं, शालेय वयात मला अजिबात वाचनाची गोडी नव्हती. वाचन म्हणजे पाठ्यपुस्तकांचं तेही परीक्षेपुरतं, बाकी आयुष्याशी त्याचा काही संबंध नव्हता.

कुमारवयात रहस्यकथा, नंतर प्रेमकथा हातात पडल्या नि प्रसंगी अभ्यासाच्या पुस्तकांमध्ये ठेऊनही वाचायला लागले. तो एक झपाटा होता. पुस्तक सुरू करायचीही घाई नि संपवायचीही. पण ह्या करमणूकप्रधान वाचनातून लवकरच बाहेर पडले.

विशीनंतर 'अमृता प्रितम' भेटली नि वाचणं हा काही वेगळाच आतून हलवणारा अनुभव आहे, याचा प्रत्यय आला. त्याच सुमारास गौरी देशपांडे नि मेघना पेठे यांच्या लेखनातून मनातल्या स्त्रीवादाला आकार मिळाल्यागत वाटलं. 'स्वत:ला काय मिळवायचं आहे नि काय अजिबात चालवून घ्यायचं नाहीये' या विचाराला एक दिशा मिळाली.

माझं जगणं समृद्ध करणाऱ्या पुस्तकांबद्दल मनात अमर्याद प्रेम आहे. त्यामुळेच (खेळघरातल्या) माझ्या मुलांनाही तो आनंद, प्रत्यय लाभावा असं वाटायचं. जीवनात मला मिळालेले सगळे आनंद त्यांना मिळणार नव्हतेच, पण वाचन ही त्यांची आनंदाच्या पलीकडे गरज आहे. वाचन हे सरळ रेषेत त्यांच्या विचार करण्याशी आणि शालेय शिक्षणाशी जोडलेलं आहे. म्हणून त्यांच्या विकासात वाचनाचं फार महत्त्वाचं स्थान आहे, हे सारं समजत होतं. पण परिस्थिती मात्र अगदी विरुद्ध होती. खेळघरातल्या मुलांना वाचनातली गोडी वगैरे तर सोडाच, नीट वाचतादेखील येत नव्हतं. (अगदी सातवी-आठवीतल्या मुलांनाही) प्रयत्न करायचे तर अगदी मुळापासून करायला हवे होते. ते एकटीचं कामही नव्हतं. हळूहळू गट जमला. साथ मिळाली तसा हुरूपही वाढला. खेळघरात मुलांनी वाचावं,

> **पुस्तक वाचून झाल्यावर कधीही ताईने लगेच प्रश्न विचारायला सुरुवात करू नये किंवा स्वत:चं मतही सांगू नये. पुस्तकातला आशय प्रत्येकाला वेगळ्या पद्धतीनंही भिडू शकतो. मुलांना तो आशय आपल्या अनुभवांशी जोडून बघण्याचा अवकाश मिळायला हवा, आपण होऊन मुलं बोलायची वाट पहावी. फारतर 'काय वाटलं?' एवढंच विचारणं. मोठ्या माणसांना ताबडतोब त्यातनं निष्कर्ष काढून त्याचं बोधात रूपांतर करण्याची घाई असते. तो मोह आवरण्याचं पथ्य फार महत्त्वाचं असते, नाहीतर मुलं पुस्तकं ऐकायलाच थांबणार नाहीत.**

अर्थापर्यंत पोचावं, वाचलेलं स्वत:च्या अनुभवांशी जोडावं, त्याबद्दल बोलावं, यासाठी आम्ही खूप काम केलं. आमच्या कामातून, अनुभवांतून आम्हाला काय मिळालं ते सांगायचा प्रयत्न करते.

तिशीच्या पुढे पालकत्व आणि शिक्षण यांचा पठडीबाहेरचा विचार नि काम करणाऱ्या लोकांशी संपर्क आला. मग स्वत:च्या वाढीमध्ये वाचनाला असणाऱ्या अनन्यसाधारण महत्त्वाचा प्रत्यय आला. दिवास्वप्न, डायरी ऑफ ॲन फ्रॅंक, तोत्तोचान, टिचर, मुलांची भाषा आणि शिक्षक, राज समाज और सत्ता, व्होल्गासे गंगा... अशी यादी बरीच लांब जाईल. पण यातल्या प्रत्येक पुस्तकांचं नि माझं एक विशिष्ट नातं आहे. माझ्यातल्या बदलाचा एकेक टप्पा त्या त्या पुस्तकाशी संलग्न आहे. आजच्या माझ्या कामामध्ये (खरं तर माझ्या जगण्यामध्येच) पुस्तकांचा फार महत्त्वाचा वाटा आहे असं जाणवतं.

'पालकनीती' मासिकाचं काम करताना, आपण नि आपलं कुटुंब यांच्या पलीकडे जाऊन सामाजिक पालकत्वाच्या संकल्पनेचा सखोल विचार झाला. विचारांनी कृतीला दिशा दिली. झोपडवस्तीतल्या मुलांना आपलं दुसरं घरच वाटेल अशा खेळघराची सुरूवात झाली. मुलांना शिकण्यातला आनंद समजावा, शिकण्यासाठीच्या क्षमतांचा त्यांच्यात विकास व्हावा यासाठी काय करायला हवं, याचा शोध सुरू झाला.

खेळघरात आम्ही खेळ, कला आणि संवाद हे शिकवण्याचं माध्यम ठरवून आखणी करतो. त्यातूनच वैयक्तिक आणि गटाच्या पातळीवर जबाबदार वर्तनाकडे मुलांना न्यायचं असतं. सगळ्याच गोष्टींची आखणी मुलांबरोबरच्या चर्चेतूनच होते.

खेळायला, दंगा घालायला, हातानं काही करायला मुलांना खूप आवडतं. पण बसून काही बोलायला– ऐकायला त्यांचा विरोध असतो. वाचन तर पुढची पायरी. त्याआधी ऐकणं, बघणं नि बोलणं रसपूर्ण व्हायला हवं. त्यासाठी त्यांची-आमची मैत्री जमायला हवी.

मुलांचा विश्वास कमावणं, त्यांच्या भावविश्वात असलेल्या गोष्टींवर गप्पा मारणं, वळण/शिस्त यांचा बाऊ न करता आमच्याबरोबर कामांत त्यांचा सहभाग मिळवणं, मजेचे खेळ, अनुभव नि त्यावर बोलणं, सण-समारंभ-दिन अशा उत्सवांचं साजरीकरण

(लोकशाही पद्धतीनं त्यांची आखणी, कार्यवाही, मूल्यमापन) हे सारं करता करता हळूहळू आमचे नि त्यांचे बंध जुळले. संवाद साधू लागलो... ऐकणं नि बोलणं तर जमायला लागलं.

पण खरी कसोटी होती 'वाचनाच्या' संदर्भात. अगदी आजही मी असे म्हणू शकत नाही, की 'मुलांना वाचनाची छान गोडी लागलीय हं.' मुलांना वाचनाची आवड नव्हती, इच्छा नव्हती याची कारणंही तशीच होती.

शहरी झोपडवस्तीतील ही शिकणारी पहिली किंवा फार तर दुसरी पिढी. त्यांनी त्यांच्या घरी, वस्तीत, शाळेत कधी कुणाला वाचताना, अभ्यास करताना पाहिलंच नाही. घरात पुस्तकं सोडा, मासिकं, वर्तमानपत्रदेखील नाहीत. समजायला लागल्यापासून त्यांनी वाचणारी माणसं फारशी पाहिलीच नाहीत.

दुसरं म्हणजे कुटुंबाची गरज म्हणून मुलं लहानपणापासूनच काहींना– काही कामात गुंतलेली असतात. त्यामुळे हाताला कामाची सवय असते. पण डोक्याला विचारांची नसते. भावना नि त्यांच्या प्रभावाखाली डायरेक्ट कृती हेच ते आजूबाजूलाही पहात असतात. त्यामुळे जरा थांबणं, विचार करणं... हे कठीण जातं.

सर्वच जीवनावश्यक गोष्टींची वंचितता पाचवीला पूजलेली. करमणुकीसाठी पैसा, नि वेळ दोन्ही अभावानंच. त्यामुळे हातात दोन पैसे येतात तेव्हाच उधळले जातात. पुढचा विचार वगैरे परवडतच नाही.

कधीकधी मला वाटतं आपल्या सामाजिक/कौटुंबिक जीवनात माणसाला एकटेपणा मिळणं अवघडच जातं. स्वत:च्या विचारात असलेला माणूस आत्मकेंद्री गणला जातो. स्त्रियांना तर अशी मुभाच नाही. त्यांनी सगळ्यांशी जोडून-जमवून घ्यायलाच हवं. यातूनही स्वत:साठी स्वत:च्या विचारांसाठी... वाचनासाठी वेळ काढणं कठीणच.

मुलांच्या आयुष्यात पुस्तकं येतात ती शाळेच्या निमित्तानंच. शाळेत मिळणाऱ्या वागणुकीमुळे एकंदर शाळेबद्दलच नावड निर्माण होते. खेरीज ही पाठ्यपुस्तकंही संवादी, आयुष्याशी जोडलेली नसतात. 'कोरडं ज्ञान' देणारी ही पुस्तकं, यांच्याबद्दल गोडी निर्माण कशी व्हावी?

एवढ्यानंतरही समजा वाचावं वाटलंच तर जागा, प्रकाश, शांतता या साऱ्या गोष्टींचीही वानवाच. कारणं लक्षात येत होती तरीही त्यांनी वाचावं, त्यांना वाचनातला आनंद कळावा ही असोशीही कमी नव्हती. वाचणं, त्यातला आशय समजणं, तो आपल्या अनुभवांशी, जीवनाशी जोडून बघणं, त्यावर विचार करणं, विविध गोष्टींशी त्याची संगती लावून पाहणं, या विश्लेषणातून हाती लागलेल्या नवनीतावर आधारित कृतींना दिशा मिळणं एवढा व्यापक विचार मनात होता. प्रयत्न सुरू केले नि त्यातून नवंनवं सुचत, उलगडतही गेलं. पहिला अभ्यास! आपल्यापेक्षा वेगळ्या संस्कृतीत, परिस्थितीत वाढलेल्या मुलांसाठी भाषा शिक्षणात सिल्वीया ॲस्टन वॉर्नर यांनी केलेले प्रयोग, बालमनाचा सखोल विचार करणारे गिजुभाई बधेका. भाषेकडे पाठ्यपुस्तकाच्या बाहेर जाऊन जीवनशिक्षण म्हणून कसं बघायचं, हे सांगणारे कृष्णकुमार यांच्या पुस्तकांचा अभ्यास, पुण्याची 'अक्षरनंदन', बंगलोरच्या जेन साहींची 'सीता स्कूल' इथले प्रत्यक्ष अनुभव अशा कितीतरी गोष्टी. त्यातून सुरू झाले आमचे प्रयत्न.

मराठी आणि इंग्रजी दोन्ही भाषांची लिपी शिकविण्यासाठी आम्ही बघणं, नि त्यावर विचार करणं ह्याला महत्त्व देतो. मुलांच्या मनातल्या, जीवनातल्या शब्दांपासून सुरूवात केली, (आई, भूक, पापी इत्यादी) नंतर मुलांची नावं, वस्तूंची नावं यांसारख्या शब्दांचे अर्थ नि दृश्य प्रतिमा जोडीनं मुलांसमोर ठेवतो. यासाठी कार्डस्, तक्ते, वाचनपाठ, अनुभवकथा अशा अनेक प्रकारच्या साहित्याचा उपयोग करतो. मुलं प्रथम शब्द वाचायला शिकतात नि नंतर लिहायला.

या पद्धतीत चित्र वाचनाला अर्थातच खूप महत्त्व आहे. चित्र त्यातल्या वस्तूंची नावं, पुस्तकं, त्यांची मुखपृष्ठ, आतली चित्र ती वाचून कथेचा अंदाज करणं, मग कथा वाचून दाखवणं, पुन्हा पुन्हा वाचणं, पुस्तकाच्या प्रती प्रत्येक मुलांकडे असणं, ताईनं वाचताना त्यांची नजर त्या ओळींवरून फिरणं अशा कितीतरी गोष्टी.

मुलांच्या अनुभवातून गोष्टी तयार होणं, त्यातनं त्यांची स्वत:ची पुस्तकं बनणं, ती त्यांनी वारंवार वाचणं, वर्गातल्या गमतीजमतींचेच वाचन पाठ बनणं. ते पुन्हा पुन्हा वाचणं, अशा अनेक कृतींतून, अनुभवांतून मूल वाचायला लागतं. आपण जे वाचतोय ते आपलं आहे, आपल्याच अनुभवांतून आलंय, हे आपल्याला समजतंय, एवढंच नाहीतर लिहिण्यातून आपण हे दुसऱ्यांपर्यंत पोचवू शकतोय ही अनुभूती वाचन आणि आशय यांची जोड मनात पक्की व्हायला खूप मदत करते. नि मूल कोऱ्या-कोरड्या छापील शब्दांमध्ये डोकावून पाहू लागतं– अनुभवांशी जोडून घेऊ लागतं नि शिकण्याचं एक नवं दालन उघडतं.

एकदा खेळघरात आल्यानंतर तऱ्हेतऱ्हेचे वाचन अनुभव मुलांना उपलब्ध असतील. असा आमचा प्रयत्न असतो. इथे एक फळा विनोद आणि कोट्यांसाठीच असतो. मुलं– ताई त्यांवर विनोद लिहितात, ग्राफिटीसारख्या माध्यमांतून विनोद निवडायची चुरस लागते.

दुसरा फळा निरोप, सूचना, वगैरेंसाठी इथेही कल्पकतेला भरपूर वाव असतो. कात्रणं, चित्रं, मुलांची लिखाणं, जागोजागी पिनपबोर्डवर लावून ठेवलेली असतात. खेळघरातले नियम, वेळापत्रक, कामांच्या जबाबदाऱ्यांचे वाटप हेही भिंतीवर विराजमान. पुस्तकं कपाटात बंदिस्त न राहता रॅक्समधून साईड टेबलांवर सहज हाताला लागतील अशी ठेवलेली असतात.

पुस्तकांची निवड मुलांना आवडेल अशी असते. मग चांदोबा, चाचा चौधरी ही व्यर्ज नसतात. आकर्षक चित्र, मांडणी नि आशय असलेली पुस्तकं मुलं चटकन उचलतात. मोठ्यांनी मुलांना पुस्तकं

*(पृष्ठ २४ वर*




# 'कामातील प्रिय-अप्रिय'

**एक प्रयोग म्हणून एकदा मी संपूर्ण व्यवस्थेविरुद्ध पूर्ण ताकदीनिशी लढलो. त्यात मला अत्यंत मर्यादित यश आले, एवढेच नव्हे तर माझे हातही पोळले. या पार्श्वभूमीवर मॉस्कोतील माझी तटस्थ भूमिका म्हणजे आदर्शवादाचा नमुना नव्हता, पण त्या परिस्थितीला साजेसा स्वसंरक्षणार्थ घेतलेला निर्णय होता. पूर्णपणे सद्सदविवेक बुद्धीला पटणारा नव्हता, पण मूर्खपणाचा किंवा आततायी निर्णयही नव्हता. आयुष्य पुढे जात असते, त्यात कधी धोका पत्करायचा हा निर्णय नेहमीच आल्हादकारक नसतो. त्याक्षणी त्या निर्णयाचा मला पश्चात्ताप झाला नाही– त्यानंतरही झाला नाही; त्यामुळे मी ठीक केले असे मला आजही वाटते.**

रशिया १९९२ ते १९९५ या काळात अस्थिर भूमी होती. काही लोकांसाठी ही अस्थिरता शोकदायी होती, तर काही चालू लोकांसाठी ती वेगवेगळ्या अवैध गोष्टी करून पैसे कमावण्याची अपूर्व संधी होती. रशियात कार्यरत असणाऱ्या काही भारतीय कंपन्यासुद्धा ही संधी साधून, हात धुवून घेत होत्या. काही कंपन्या हे काम गुपचूप करत होत्या, तर काही राजरोस व निर्लज्जपणे करत होत्या. या भारतीय कंपन्यांवर कारवाई करण्याचा कोणताही प्रभावी मार्ग मला दिसला नाही आणि जिथे तो दिसला आणि मी काही कृती करण्याचा निर्णय घेतला तिथे तो फोल ठरला. अपयशी ठरला. मी तात्पुरता निराशही झालो, पण अशा गोष्टींना इलाज नसतो, आणि काही म्हटले तरी कितीही दावा केला तरी जग बदलण्याचे सामर्थ्य एका व्यक्तीकडे नसते.

दिल्लीच्या एका व्यापाऱ्याने भारत-सोव्हिएत राष्ट्रसंघ यांच्यातील रुपया-रुबल व्यापारातील त्रुटींचा फायदा घेऊन प्रचंड पैसा कमावला होता. त्याने व्यापाराबरोबरच कातड्याचा तसाच पादत्राणांचा मोठा कारभार उभारला होता. या पैशाने तो अक्षरश: मुजोर होऊन मॉस्कोमध्ये थैमान घालत होता. मॉस्कोत त्याने काही रेस्तोराँ सुरू केलेले होते, त्यात भारतीय रेस्तोराँबरोबरच चिनी व युरोपीय पद्धतीचे रेस्ताराँही होते. हे सगळे रेस्तोराँ चांगला व्यवसाय करत होते. रशियातील दुसऱ्या क्रमांकाचे शहर सेंट पीटसबुर्ग येथेही त्याची बरीच रेस्तोराँ होती. एकंदरीत एक व्यापारी म्हणून त्याने चांगलेच नाव कमावले होते.

मी त्याला पहिल्यांदा भेटलो, माझ्या वरिष्ठांच्या खोलीत. त्या पाचच मिनिटात माझ्या अनेक गोष्टी ध्यानात आल्या. त्या माणसाच्या देहबोलीत एक उद्दामपणा होता. चेहऱ्यावरचा असंस्कृतपणा फक्त ग्राम्य निरागसतेतून आलेला नव्हता तर त्या गृहस्थाने जाणीवपूर्वक वाढवलेला दुर्गुण असावा असे वाटत होते. समोरच्यावर जरब बसवण्यासाठी तो त्या असंस्कृतपणाचा मोठ्या सफाईदारपणे पद्धतीने वापर करत असावा. एक गोष्ट मात्र मला खटकली. माझे वरिष्ठ त्याच्याशी अदबीने वागताहेत हे मला जाणवले. त्या अदबीच्या पाठीमागे त्या माणसाचे काही छुपे गुणावगुण असणार असे वाटले. त्यांचा परिचय मला कालांतराने आपोआप झाला.

एकदा मी मॉस्कोची बिझनेस डायरेक्टरी पहात होतो. त्यात मॉस्कोतील वेगवेगळ्या कंपन्यांचे व्यवसाय, दूरध्वनी क्रमांक, फॅक्स वगैरेंची माहिती होती. वाचता वाचता अचानक माझे डोळे थबकले. ती एक जाहिरात होती, पण जाहिरात नेहमीपेक्षा एकदम वेगळी. विदेशी मुद्रेच्या खरेदी-विक्रीची. 'आम्ही कोणतीही विदेशी मुद्रा कितीही प्रमाणात जगभर कुठेही पुरवू, शिवाय भारतीय रुपये व रशियन रूबलही खरेदी करू किंवा विकू वगैरे वगैरे.' असा त्या जाहिरातीचा सूर होता. भारतीय कायद्याप्रमाणे अशा प्रकारे भारतीय मुद्रा विकता/खरेदी करता येत नाही, याची मला कल्पना होती. ही जाहिरात या बाबतीतील सगळ्या नियमांची पायमल्ली करणारी होती. रशियन कायदाही या गोष्टीला परवानगी देत नव्हता.

ही जाहिरात उपरोल्लेखित भारतीय कंपनीची होती, कारण त्या कंपनीचे नाव, संपर्कासाठीचे दूरध्वनी क्रमांक सगळे ठसठशीतपणे छापले गेले होते. मी ते वरिष्ठांना दाखवले. त्यांची प्रतिक्रिया काही खास नव्हती. त्यांना राग येईल आणि त्यातून ते काही मार्ग सुचवतील अशी आशा मला होती, पण तसे काहीच संकेत मिळाले नाहीत. काय करावे याचा मला अंदाज येईना. मी काही दिवस विचार केला. दिल्लीला या गोष्टीची खबर द्यावी असे मला वाटले. मी त्या जाहिरातीची प्रत व सोबत या कंपनीच्या विविध उपक्रमांची माहिती भारत सरकारच्या वित्त व वाणिज्य मंत्रालयाकडे पाठवली. काहीतरी कारवाई केली जावी, अशी शिफारस केली व दूतावासाने काय कारवाई करावी याबाबत मार्गदर्शन करण्याची विनंती केली.

बरेच महिने उत्तर आले नाही. मी काही स्मरणपत्रे पाठवली, साधी पोचही आली नाही. माझ्या दिल्लीतील सहकाऱ्यांना फोनवरती आठवण करून दिली. 'वाट पहा' असा प्रतिसाद मिळाला. मी वाट पाहिली, पहातच राहिलो.

हळूहळू त्या माणसाची रहस्ये उलगडत गेली आणि मी अधिकच बेचैन झालो.

भारतीय चर्मोद्योग संघाच्या वतीने एक प्रदर्शन व परिसंवादाचे आयोजन मॉस्कोत केले होते. भारतीय चर्मोद्योगाची उत्पादने रशियात पूर्वीप्रमाणे निर्यात व्हावीत, यासाठी आयोजित केलेला तो कार्यक्रम पाठिंबा द्यावा असाच होता, पण त्या कार्यक्रमाचा सूत्रधार तो व्यापारी होता. त्याने राजदूतांना या कार्यक्रमाच्या उद्‌घाटनला बोलावले होते. मलाही आमंत्रण होते, मी राजदूतांना भेटून या कार्यक्रमाला आपण जाऊ नये असे सांगितले. अशा माणसाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यामुळे त्या माणसाच्या सगळ्या उद्योगांना आपला पाठिंबा आहे, असा संदेश जाणे साहजिकच आहे. विशेषत: तो माणूस दूतावासाच्या पाठिंब्याचा दुरुपयोग करणार नाही याची कोणतीच खात्री नसल्याने आपण जाऊ नये असा सल्ला मी राजदूतांना दिला. कोणत्याही परिस्थितीत दूतावासाची उपस्थिती आवश्यक आहे असे वाटल्यास दूतावासातील माझ्या (आर्थिक) विभागातील सगळ्यात कनिष्ठ अधिकाऱ्याला पाठवता येईल असेही मी सुचवले. राजदूतांनी शांतपणे माझे म्हणणे ऐकले. त्यांचा चेहरा बुद्धासारखा होता. त्या स्मिताखाली काय दडले असावे, याचा मला अंदाज कधीच आला नाही.

तो समारंभ पार पडला. राजदूत स्वत:च त्याला उपस्थित राहिले. त्यांनी भाषण करून त्या गृहस्थाचे कौतुकही केले. मला काहीतरी चुकल्यासारखे वाटत राहिले, शेवटपर्यंत. स्वत:च्या फुगलेल्या महत्त्वाने पुलकित होऊन तो गृहस्थही, आपण जणू सगळे जग मुठीत ठेऊ शकतो अशा अविर्भावात वावरत होता.

नंतरही मी त्या गृहस्थाचे व त्याच्या व्यापारपद्धतीचे अध्ययन करीत राहिलो. त्याची रशियाभर कार्यालये होती. त्याच्या व्यवसायाचा काही भाग त्याचा मुलगा पाहायचा. हा मुलगा पाश्चात्त्य देशात शिकून आलेला होता. दिसायला बापासारखा भयानक नव्हता. चुणचुणीत, गोरापान, सुरेख इंग्रजी बोलणारा; पण बाप त्याच्याही रक्तात पूर्णपणे संचारलेला होता. बोलायला तोंड उघडताच आई-बहिणींवरून शिव्या देण्याचे संस्कार त्यानेही आत्मसात केले होते. त्याचा माझाही काही कारणाने चांगलाच परिचय झाला.

एकदा कार्यालयात बसलो असताना एक साधारण पंचावन्न वर्षांचा बऱ्यापैकी आर्थिक पार्श्वभूमीतून आलेला माणूस, आत रडतच आला. अशा गोष्टी विदेशात फारच कमी. झाल्या तरी बेकायदेशीररित्या विदेशात आलेल्या भारतीय मजुरांच्या बाबतीत होतात. मी त्या गृहस्थाला शांत केले. प्यायला पाणी दिले. चहा पाजवला व त्याला मदत करण्याचे आश्वासनही दिले.

त्याची कहाणी विदारक होती. त्याला या व्यापारी गृहस्थाच्या कंपनीने नोकरी देऊन मॉस्कोला बोलावले होते. तत्पूर्वी हा गृहस्थ दिल्लीतील भारत सरकारच्या स्टेट ट्रेडिंग कंपनी, या अत्यंत नावाजलेल्या कंपनीत ठीकठाक पदावर नोकरीला होता. त्याला अधिक पगाराचे आमिष दाखवून या व्यापाऱ्याने मॉस्कोला आणले. तिथे त्याला पगार ठीकठाक दिला नाही. त्याचा पासपोर्ट काढून घेतला, एवढेच नव्हे तर त्याने तक्रार केली तर त्याला एका खोलीत कोंडून टाकले. हे सगळे त्या व्यापाऱ्याच्या श्रीमंत पुत्राने केले. त्याला खायला-प्यायलाही देण्याचे साधे कर्तव्यही बजावले नाही. शेवटी हा माणूस खिडकीतून उडी मारून बाहेर पडला आणि दूतावासाच्या आश्रयाला आला.

मी त्या श्रीमंत पुत्राला फोन करून विनम्र भाषेत जाब विचारला. त्याचे हे कृत्य चांगले नाही, याची जाणीव करून दिली. त्याच्यावरती माझ्या बोलण्याचा कोणताच परिणाम झाला नाही, एवढेच नव्हे तर तो माझ्यावरती कडाडला. त्याने अर्वाच्य भाषाही वापरली. तरीही मी त्याच्याकडून त्या गृहस्थाचा पासपोर्ट मागितला आणि कुणाचाही पासपोर्ट अशा प्रकारे ठेऊन घेणे बेकायदेशीर आहे असे सांगितले. 'तुम्ही मला कायदा शिकवू नका. तो गृहस्थ माझा नोकर आहे, त्याला कसे वागवायचे ते मला ठरवू द्या. त्याचा पासपोर्ट मी देणार नाही.' त्याच्या बोलण्यातील उद्दामपणातील आत्मविश्वास होता 'माझे कुणीही वाकडे करू शकत नाही...'

मला खरं तर धक्का बसला. पण त्याच्याविरुद्ध तक्रार करण्याने काहीच फायदा होणार नव्हता. त्या गृहस्थाला खायला-प्यायला देऊन आम्ही त्याच्या पर्यायी पासपोर्टची व्यवस्था केली. त्याला कसेतरी करून भारतात पाठवले.

या कंपनीची मॉस्कोत कार्यालये होती, तशीच रशियाभर त्यांची उपस्थिती होती. मॉस्कोतील त्यांच्या कार्यालयाला मी भेट दिली. हे कार्यालय म्हणजे चित्रपटात गुंडाच्या प्रमुखाचे राहण्याचे ठिकाण असते तसे होते. प्रवेशद्वारापासून शस्त्रधारी. हे सगळे धट्टेकट्टे रशियन स्मार्ट व धारदार नजरेचे. कित्येक दरवाजे पार केल्यानंतर 'सिंह' नावाचा हा सिंह, आत विराजमान होता. एक मोठे टेबल, त्याच्या एका बाजूला त्याची भव्य खुर्ची व बाकीच्या छोट्या खुर्च्या. त्याच्या व्यवसायाबद्दल, कार्यपद्धतीबद्दल माहिती काढायचा माझा विचार होता. पण माझ्या हातात फारसे काही आले नाही. शेवटी मी विचारले, 'हा सगळा बंदोबस्त हे शस्त्र घेतलेले पहारेकरी याची गरज का आहे?'

## सर्व वर्गणीदारांना विनम्र आवाहन

साधना साप्ताहिकाच्या वर्गणीदारांशी वर्गणीच्या नूतनीकरणासाठी अधिक सुलभपणे संपर्क साधता यावा, म्हणून वर्गणीदारांच्या फोन नंबरची यादी तयार करण्याचे काम चालू आहे. तरी कृपया कार्डावर आपले लँडलाईन व मोबाईल नंबर, फोन नंबर, पूर्ण नाव, पत्ता व ग्राहक क्रमांक यांसह साधना कार्यालयाकडे पाठवून सहकार्य करावे ही विनंती.

**– संपादक, साधना**

‘हे नसेल तर रशियात व्यवसाय शक्य नाही. याच्या बळावर तर आम्ही व्यापार करतो. इथे माफियांचा त्रास आहे. गुंडगिरीच गुंडगिरीला रोखू शकते... लोक आम्हाला घाबरतात. इथे सरकार संरक्षण देऊ शकत नाही, स्वत:च स्वत:चे रक्षण करायचे.’

त्या कठोर वास्तवात सत्य होते. आणि तरीही एकंदरीतच काहीतरी चुकत असल्याचेही जाणवत होते. इतके असूनही या कंपनीचे व कंपनीच्या मालकाच्या प्रभावाचे गूढ काही कळत नव्हते. शेवटी ते कळाले. भारतीय प्रधानमंत्र्याच्या कार्यालयातील एका अधिकाऱ्याचा त्यांच्यावर वरदहस्त होता. अर्थातच प्रधानमंत्र्यांचा वरदहस्त होता की नाही, याबाबत कुणीच काही बोलले नाही. हा अधिकारी अत्यंत वरच्या पदावर तर होताच, पण त्याची व या कंपनीची जवळीक होती याची सर्वांना कल्पना होती.

ज्या काळात रशिया-भारत व्यापाराची मुख्य सूत्रं दोन्ही देशांतील प्रशासनाकडे होती, तेव्हा आश्रयदाते आणि याचकांचा सुकाळ होता. उत्तरेकडील व्यापाऱ्यांनी त्यात हात धुऊन घेतले. राज्यकर्त्यांच्याही नातलग व मित्रमंडळींचा फायदा झाला. अधिकाऱ्यांनीही जमेल तिथे आपापल्या लोकांची वर्णी लावली.

या कारभारात त्या कंपनीने प्रशासनात मैत्रीची नाती निर्माण करून आपले हात बळकट केले होते. त्यामुळे माझ्या विरोधाला किंमतही नव्हती आणि परिणाम होण्याची शक्यताही नव्हती. माझ्यासमोर चाललेला हा अनर्थ मी पाहिला, एवढंच नव्हे तर तो थांबवण्यासाठी लागणारा लढाही मी थांबवला. प्रत्येक लढाई आपण लढू शकत नाही. प्रत्येक अनर्थ आपण थांबवू शकत नाही. शिवाय ती लढाई न लढण्यात माझा स्वार्थ होता. नोकरी पणाला लावण्याचा तो क्षण होता, असे मला वाटले नाही. ते धाडस होते, पण इतर अनेक बाबतीत अनेकांना मदत करण्याची क्षमता माझ्या कामात/पदात असताना, या एका गोष्टीसाठी आपण सगळे सोडावे असे मला वाटले नाही. शिवाय एका माणसाच्या प्रतिकाराने किंवा नोकरी सोडण्याने यंत्रणेवर यत्किंचितही परिणाम होणार नाही याची मला स्पष्ट कल्पना होती.

माझ्या पुढच्या नोकरीत यापेक्षा अटीतटीचा संघर्ष आला. एक प्रयोग म्हणून एकदा मी संपूर्ण व्यवस्थेविरुद्ध पूर्ण ताकदीनिशी लढलो. त्यात मला अत्यंत मर्यादित यश आले, एवढेच नव्हे तर माझे हातही पोळले. या पार्श्वभूमीवर मॉस्कोतील माझी तटस्थ भूमिका म्हणजे आदर्शवादाचा नमुना नव्हता. पण त्या परिस्थितीला साजेसा स्वसंरक्षणार्थ घेतलेला निर्णय होता. पूर्णपणे सद्सदविवेक बुद्धीला पटणारा नव्हता, पण मूर्खपणाचा किंवा आततायी निर्णयही नव्हता. आयुष्य पुढे जात असते, त्यात कधी धोका पत्करायचा हा निर्णय नेहमीच आल्हादकारक नसतो. त्याक्षणी त्या निर्णयाचा मला पश्चात्ताप झाला नाही– त्यानंतरही झाला नाही. त्यामुळे मी ठीक केले असे मला आजही वाटते. पण ‘ठीक केले’ आणि ‘योग्य तेच केले’ या भावनेतल्या फरकाचीही मला पूर्ण कल्पना आहे.

(क्रमश:)

**ज्ञानेश्वर मुळे**

DII/178, West Kidwainagar,
New Delhi-23.
Email:dmulay@hotmail.com

---

# वाचन - जीवनरस!

*पृष्ठ २१ वरून)*

वाचून दाखवणं, आवडलेल्या पुस्तकाबद्दल प्रेमानं सांगणं, पुस्तकांमुळे झालेल्या बदलांबद्दल बोलणं हे सारं सहज जातायेता घडायला हवं.

आम्ही सुट्ट्यांमध्ये पुस्तकांचे कोपरे सजवतो, त्यांच्यासोबत वाचत बसतो. ‘मला आवडलेलं पुस्तक’ यांवर सादरीकरण ठेवतो. या तयारीसाठी मुलांना मदत करतो. पुस्तक खरेदीसाठी मुलांना बरोबर घेऊन जाणं, शाळा किंवा खेळघरासारख्या केंद्रात हे खरंतर अवघडच, पण शक्य असेल तर का नेऊ नये? गटागटाने का होईना, मुलांनी काय वाचायचं हे नेहमी आपणच का ठरवायचं? त्याला आवडलेलं पुस्तक विकत घेणं शक्य असणं, हे पुस्तक प्रेमात भर घालणारंच.

पुस्तक वाचून झाल्यावर कधीही ताईने लगेच प्रश्न विचारायला सुरुवात करू नये किंवा स्वत:चं मतही सांगू नये. पुस्तकातला आशय प्रत्येकाला वेगळ्या पद्धतीनंही भिडू शकतो. मुलांना तो आशय आपल्या अनुभवांशी जोडून बघण्याचा अवकाश मिळायला हवा, आपण होऊन मुलं बोलायची वाट पहावी. फारतर ‘काय वाटलं?’ एवढंच विचारणं. मोठ्या माणसांना ताबडतोब त्यातनं निष्कर्ष काढून त्याचं बोधात रूपांतर करण्याची घाई असते. तो मोह आवरण्याचं पथ्य फार महत्त्वाचं असते, नाहीतर मुलं पुस्तकं ऐकायलाच थांबणार नाहीत.

अनेक कल्पना, अनेक प्रयोग केले तरी ‘मुलं लागली बुवा वाचायला’ असं आम्हाला आजही ठामपणे म्हणता येत नाही. कारण ‘खेळघर’ हा त्यांच्या जीवनाचा एक छोटासा भाग आहे. प्रत्यक्ष जीवन फार फार वेगळं आहे. वंचितांनी व्यापलेलं आहे. हिंसक अनुभवांनी भरलेलं आहे. ते सारं बाजूला सारून या शब्दांच्या, अमूर्त दुनियेत शिरणं त्यांच्यासाठी सोपं नाही, ह्याची कल्पना आम्हाला आहे.

आमची एक मैत्रीण म्हणते, पुस्तकं नसतील तर जीवनात केवढा रखरखाट होईल. विहिरीत तिच्या तळातून झरे नसतील तर ती कोरडी पडणार नाही का? वाचनातनं असं काही तहान भागवणारं मिळतं, त्यानं मन तृप्त होतं, न्हाऊन निघतं. जगायला उभारी मिळते, हे मुलांना जर समजलं तर ती वाचनाकडे तर झुकतीलच पण एकूण जगण्यासाठी प्रगल्भतेनं विचार करायला लागतील.

**शुभदा जोशी**

रजिया सुलताना

# ‘सात घराच्या सात बांगड्या’ आणि ‘कुर्बानी के लिए बकरा’

समाजातील उपेक्षित घटकांकरिता कामे करीत असताना आमच्या मायभगिनी अनेक किस्से सांगतात. या महिन्यात मला दोन किस्से अनुभवायला मिळाले. पहिला किस्सा अपत्यप्रेमाचा....

समाजात एक बोंब उठवली गेली, ज्यांना केवळ एकच मुलगा आहे, त्यांच्याकरिता येणारे २००८ साल अतिशय वाईट आहे. यावर उपाय म्हणून सात घरचे सात रुपये जमा करायचे आणि त्याच्या काचेच्या बांगड्या मातेने हातात घालायच्या. फक्त त्या बांगड्यांचा रंग लाल किंवा हिरवा असावा. या अंधश्रद्धेतून आलेल्या विचाराचा परिणाम असा झाला : गोर-गरीब, श्रीमंत, निरक्षर, साक्षर अशा सर्वच मातांनी– ज्यांना एकच मुलगा आहे अशांनी हा प्रयोग केला. वैज्ञानिक भाषेत जरी आपण प्रयोग शब्द वापरत असलो तरी अंधश्रद्धेच्या व्यासपीठावर याला टुमका म्हणतात.

आपल्याला सहज असा प्रश्न पडतो; श्रीमंतांच्या बंगल्यात ही गोष्ट पोहोचली कशी? तर कामवालीच्या माध्यमातून. अपत्यप्रेमापोटी घरातील मंडळी असा विचार करतात की सात घराचे सात रुपये मागून बांगड्या घालण्याने फायदा जरी झाला नाही, तरी नुकसान मात्र काहीच होणार नाही आणि अंधश्रद्धेची ही जाहिरात फेस टू फेस अ‍ॅन्ड माऊथ टू माऊथ या प्रकारात मोडते. याचे समीकरण अगदी साधे आहे. सात घरचे सात रुपये जेव्हा महिला मागायला जाते, म्हणजे प्रत्येक घरचा एक रुपया तेव्हा त्या एक रुपयाची देवाण-घेवाण करताना लाल-हिरव्या बांगड्यांची जाहिरात सहज नि फुकटात होते. माझ्यासारखी चिकित्सक बाई अनेक प्रश्न विचारते, ‘त्या एकुलत्या एका बाळाला जन्मदात्री नसेल तर? किंवा जेथे एकटा मुलगा नाही; मात्र एकटी मुलगीच आहे, तेथेदेखील २००८ वर्ष बाळासाठी धोक्याचे आहे काय?’ या प्रश्नाचे उत्तर त्यांच्याकडे नसते.

यामागील वास्तव असे आहे, की सगळीकडेच फॅशनच्या बांगड्या घालण्याचे फॅड आलेले आहे. त्यामुळे प्लेन लाल-हिरव्या बांगड्या तशाच दुकानदाराकडे पडून आहेत. खूप दिवस पडून असलेल्या साड्यांचा जसा सेल लावला जातो; तसा लाल-हिरव्या बांगड्याचा या अफवेमुळे चांगलाच सेल होत आहे. कारण ही अफवा नातेवाईकांच्या माध्यमातून एका राज्यातून, दुसऱ्या राज्यात रातोरात पोहोचली आहे. कारण ज्यांना केवळ एकच मुलगा आहे, अशा दांपत्यांची संख्या भारतात करोडोंच्या वरती आहे.

हा अंधश्रद्धेचा विचार मांडणारे हेदेखील भान विसरतात, की आपण कुणासोबत नि कुणाशी बोलत आहोत, माझा नेहमी संपर्क मीडियाशी येतो. ती वृत्तपत्रे असोत अथवा केबल वाहिन्या. या अंधश्रद्धेच्या विचाराचे प्रचारकर्ते मला म्हणाले, ‘पेपरामंधी बी ही बातमी आली नि रजियाबाई टीव्हीमंधी बी दाखवलं.’ मी त्यांना म्हणाले, ‘कोणत्या पेपरात आले ते मला आणून दाखवा.’ अजूनपर्यंत या आशयाची बातमी मला कोणीच आणून दिली नाही. मात्र प्रचार इतका उघडपणे नि सफाईदारपणे केला जातो की, आता हिरव्या प्लेन बांगड्या संपून गेल्या आहेत. जाहिरात मात्र तशीच चालू आहे.

० ० ०

दुसरी एक अंधश्रद्धा म्हणजे बकरी ईदला विकल्या गेलेल्या साडेपाच कोटींच्या बकऱ्याची. बकरी ईद आली, की भारतात सर्वांत जास्त बकरे कुर्बानीकरिता विकले जातात. बकरे विकत घेणारे जरी मुस्लिम असले तरी त्यांना भरमसाठ पैशात विकणारे जास्त प्रमाणात हिंदू असतात. त्यांना मुस्लिमांची धार्मिक मानसिकता माहीत असते. त्यामुळे ते कुर्बानीला विकल्या जाणाऱ्या बोकडाच्या अंगावर कधी ‘अल्लाह’, तर कधी ‘महंमद’ तर कधी ‘पैगंबर’ असे कोरीव स्वरूपात उर्दू, अरबीत लिहितात. माणसांच्या अंगावर ज्याप्रमाणे गोंदले जाते, अगदी त्याचप्रमाणे जनावरांच्या कातडीवर केस सरकवून लिहिले जाते.

मुळातच उर्दू, अरबी भाषा ही कमी जागेत मावणारी आणि नक्षीदार आहे. आपण रांगोळी काढतो; त्याचप्रमाणे आडव्या-उभ्या रेषेत ही भाषा लिहिली जाते. शब्दाचा खूप पसारा यात नसतो. या बकरी ईदला मुंबईच्या महंमद फहीम यांनी आपला बकरा ५ कोटी ५१ लाख रुपयांना ७८६ रुपये देऊन विकत आणला. याचे खास वैशिष्ट्य म्हणजे बकऱ्याच्या अंगावर ‘प्रेषित’ हा शब्द कोरल्याची श्रद्धा फहीम यांच्या मनात आहे; तसेच त्याच्या कानाच्या खालच्या बाजूस ‘मक्का’ कोरलेले आहे, असे त्यांना वाटते. हा प्रकार श्रद्धेचा की अंधश्रद्धेचा, हा भाग सोडला तर बकरी ईदनिमित्ताने होणाऱ्या बकऱ्याच्या खरेदी-विक्री व्यवसायाला काही खास जनावरे लोक आपल्या हाताने धार्मिक आशयाचे वाक्य लिहून आणतात. दोन पैसे जास्त भेटावेत म्हणून ‘आयात’ आणि पैगंबराचा वापर चालू आहे. मात्र कोणीही या गैरप्रकाराकडे चिकित्सक दृष्टीने बघायला तयार नाही. जर हे सगळे अंगावरचे लिखाण सत्य आणि कुदरती असते तर त्याचा फार मोठा बागुलबुवा झाला असता. बकरी ईद आली रे आली की, अशी जनावरे फार मोठ्या प्रमाणात बाजारात येतात. एका रात्रीतून तर हे बकऱ्याच्या अंगावर कोरले जात नसेल? विकल्या जाणाऱ्या बकऱ्याचे वय हे ३ ते ५ वर्षांचे असते. पाच वर्षांत कोणतीही बातमी या बकऱ्यांसदर्भात कोठेच बघायला किंवा वाचायला मिळत नाही. मात्र गोवंडीच्या साडेपाच कोटींचा बकरा या बातमीने मीडियाचे संपूर्ण चॅनेल्स कव्हर केले होते. बऱ्याच वृत्तपत्राची ती हेडलाईन राहिली आहे.

देवा-धर्माच्या नावावर पैसा खर्च करण्याचे काहीच वाटत नाही. आपापल्या धार्मिक रूढी-परंपरेनुसार प्रत्येक व्यक्ती श्रद्धा जोपासत असते. श्रद्धा ही फार मोठी इबादत आहे. मानसिक सुख-समाधानाचे ते जीवनसत्त्व आहे, जे बाजारात किंवा मेडिकलमध्ये कोठेच विकत मिळत नाही. मात्र आपल्या श्रद्धेचे कोणी धार्मिक भांडवल करून समाजात अंधश्रद्धा पसरवीत असेल तर या गैरप्रकाराला वेळीच आळा घातला पाहिजे. कारण समाजात वाढत चाललेली अंधश्रद्धा ही मानवनिर्मित समस्या आहे. जगातील कोणतीही मानवनिर्मित समस्या कायद्याने किंवा शिक्षणाने सुटणारी नाही. त्यासाठी गरज आहे ती वैज्ञानिक दृष्टिकोनाची आणि सकारात्मक विचारशैलीची. समाजाला विकासाच्या प्रवाहात आणणे; समाजाची या गैरप्रकारातून मुक्तता करणे यासाठी प्रबोधन इबादतीपेक्षा कमी नाही.

उपक्रम

# शांतीयात्रा नागपुरात

## पन्नालाल सुराणा

'तरुण पिढीला हिंसाचार व भोगवाद यापासून वाचवा' हा मुद्दा घेऊन साने गुरुजी कथामालेने गेल्या ३० जानेवारीपासून 'जनजागरण अभियान' सुरू केले. वर्ध्याचे डॉ.गजानन कोटेवार मोठे कल्पक व उपक्रमशील कार्यकर्ते. ५ व ७ जानेवारीला कथामालेचे ४१ वे वार्षिक अधिवेशन त्यांनी म्हणजे त्यांच्या सहकारी मित्र-मैत्रिणींनी अतिशय उत्साही वातावरणात पार पाडले होते. तेथून लगेच त्यांनी प्राचार्य अमृत येऊलकरना घेऊन नागपुरात मोर्चेबांधणी केली. शिक्षण उपसंचालक श्री.नांदेडेसाहेब यांना भेटून 'या शांतीयात्रेला शाळांनी सहकार्य करायला हरकत नाही' असे पत्र घेतले. काही मुख्याध्यापकांना वाटत असते की, साने गुरुजींच्या शिकवणुकीनुसार चालणाऱ्या उपक्रमांना सहकार्य करायलासुद्धा अधिकृत शासकीय परवानगी असलेली बरी! गुरुजींचे नाव माहीत नाही असे विद्यार्थीच नव्हे तर शिक्षक व संस्थाचालक कुठे कुठे भेटतात. हा त्यांचा दोष नाही. आपण कुठे कमी पडतो आहोत याचा कार्यकर्त्यांनी विचार करायला हवा.

३० जानेवारीला धरमपेठेतील सर्वोदय आश्रमात प्रार्थना सभा झाल्यावर डॉ.कोटेवारांनी सजवलेला 'शांतीयात्रा रथ' निघाला. सदरमधील तिडके विद्यालयात हजाराच्यावर मुले-मुली जमली होती. प्रतिमेला पुष्पहार आधीच घालून ठेवला होता. उपचारात कमीतकमी वेळ जावा अशी सप्रेम विनंती सर्वत्र आधीच करण्यात आली होती. त्याचा सुपरिणाम अनुभवाला येत होता. प्राचार्य मेहतांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य येऊलकरांनी साने गुरुजींचा संक्षिप्त परिचय करून दिला. सुश्री मीनल रोहनकरनी 'सानी'ची गोष्ट सांगितली. गुडगाव, सतना व इगतपुरी येथे शाळकरी मुलांनी सोबत्यांचे खून केल्याच्या गेल्या महिनाभरातील घटनांचा व ३१ डिसेंबरच्या रात्री मुंबईतील काही तरुणांनी रस्त्यारस्त्यांवर हैदोस घालून एका तरुणीचा विनयभंग करून, नव्या वर्षाची सुरुवात केल्याचा उल्लेख करून मी मांडले की या भोगवादी व हिंसाचारी वृत्तीपासून निदान तरुण पिढीला तरी वाचवायला हवे. हे काम मुख्यत: लोकांनी म्हणजे पालक व शिक्षकांनी करायला हवे. उत्तान चित्रे वारंवार प्रदर्शित करण्याचे टीव्ही वाहिन्यांनी थांबवावे, वृत्तपत्रांनीही तशी चित्रे व बातम्या छापू नयेत यासाठी त्यांच्या कर्त्याधर्त्यांना पत्र पाठवावे, भेटून सांगावे आणि आजूबाजूला घाण असली तरी मुला-मुलींनी स्वत:ला वाचवावे. श्री.मा.म.गडकरी वकिलांनी छानसे गाणे म्हटले. थोड्या वेळानंतर जि.प.प्रशालेत तसाच कार्यक्रम झाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी अंजुमनच्या प्रांगणात पोहोचलो. तिची स्थापना १८८९ साली झाली होती. विस्तीर्ण मैदान, विखुरलेल्या इमारती, शिक्षक-शिक्षिकांची लगबग, सगळे प्रसन्न वातावरण होते. आमच्या कार्यक्रमानंतर अक्रम पठाण या शिक्षकांनी आभार मानताना 'ग्यानबाचे अर्थकारण'चा उल्लेख केला. भोगवाद व हिंसाचार वाढवायचे काम आपला नफा जास्तीतजास्त वाढवू इच्छिणारे उद्योगपती व व्यापारीच करीत आहेत, त्यांच्यावर लोकांनी दडपण आणले पाहिजे असे ते म्हणाले. नंतर कार्यालयात बसलो असताना एक तरुण बाई आल्या. म्हणाल्या, 'अनुशासन' शब्द ऐकून मी माझ्या इंजिनिअरिंग कॉलेजात जाण्याआधी इकडे वळले. नैतिक मूल्यांची शिकवण देण्याचे काम थांबले आहे, त्याला गती दिली पाहिजे. त्यांनी आपले नाव सांगितले लीना गहाणे.

सेंट उर्सूला विद्यालय (मुलींसाठी) ही संस्था तर १८५६ साली स्थापन झालेली. त्यावेळच्या मध्य भारतात अशा प्रकारच्या संस्था सुरू करणाऱ्या शिक्षणमहर्षींची दूरदृष्टी व चिकाटी यांना वंदन केले. सुश्री माया मॅडम आणि प्राचार्य रंजना सिंह यांनीही असे उपक्रम आम्ही शाळेत चालवूत असे म्हटले.

तिसऱ्या दिवशी प्रार्थनेच्या वेळी रेल्वे स्टेशनजवळचे मॉडेल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे कार्यक्रम झाला. नंतर सीताबर्डीवरील धीरन कन्या विद्यालय. दुपारी वेळ होता म्हणून धंतोलीतील टिळक विद्यालय. आदल्या रात्री डॉ.कुसुमताई वांकरना फोन केला होता. एवढ्या मध्यवस्तीतील ती शाळा १९२२ साली सुरू झाली होती. ब्रिटिशांच्या दडपशाहीमुळे बंद पडलेली, परत १९४८ साली सुरू झाली. मुला-मुलींचा प्रतिसाद उत्स्फूर्त होता. प्राथमिकच्या मुख्याध्यापिका जवारेबाईंना आपल्या बालपणातील आठवणी आल्या. 'आम्ही देवाचे मजूर, आम्ही देशाचे मजूर' हे गीत त्यांनी मुलांकडून म्हणवून घेतले. त्यांचा उत्साह अक्षरश: गगनात मावत नव्हता.

चौथ्या दिवशी अजनी पलीकडील पार्वतीनगरातील जीवन शिक्षण विद्यालय. तेथे येऊलकरांचे परिचित संस्थाचालक व शिक्षक भेटले. शाळेत गुरुजींचा फोटो यापुढे नीट लावून ठेवू असे म्हणाले. त्यानंतर भगवाननगरमधील सुधाकरराव झाडे विद्यालय– कोटेवारांनी दोन रुपयेवाली छोटी पुस्तिका डॉ.बाबासाहेब आंबेडकर व गाडगे महाराजांवरही काढली आहेत. ती तेथे खूप खपली.

२० फेब्रुवारीपर्यंत ही शांतीयात्रा चालत राहणार आहे.

**पन्नालाल सुराणा**
मु.पो. आसू, ता. परांडा.
जि. उस्मानाबाद

## अभिमानाच्या भावना जमा झाल्यात...

मी ‘साधना’चा पहिल्या अंकापासूनचा वाचक आहे. ‘साधना’ आर्थर रोड, मुंबईमध्ये असताना साधनाच्या आर्थिक व्यवहाराचे हिशेब पाहणारे स्व.वसंतराव वडके यांच्याबरोबर काही काळ साधनाच्या कार्यालयात काम करण्यात मी घालविली आहेत.

आजची साधना बहुरूपी, बहुश्रुत व बहुगुणी झाल्यासारखी वाटते. त्यामुळे साधनाबद्दल माझ्या मनात आदराच्या, कौतुकाच्या व अभिमानाच्या भावना जमा झाल्यात. स्वातंत्र्यानंतरच्या ६० वर्षांच्या काळात ‘मोस्ट बॅकवर्ड नेशन’ पासून सुरू झालेली भारतीय अर्थव्यवस्था आज जगाला स्वप्नवत वाटणाऱ्या वेगाने लोकशाहीच्या मार्गाने प्रगती करणारे ‘१२० कोटी लोकांचे राष्ट्र’ झाले आहे. आतापर्यंत साधनाने तरुणाईसाठी राबवलेल्या अनेक उपक्रमातून नवीन विचार ठेवले आहेत. यापुढील काळात भारतीय लोकशाही, अर्थव्यवस्था, समाजातील विविध घटक, धार्मिक सामंजस्य, देशांतर्गत सुव्यवस्था याबद्दलच्या चिंतनाचे पडसाद साधनाच्या भावी काळातील अंकातून उमटावेत ही इच्छा.

**श्री. दिनेश रघुनाथ पांगम**
१३ चंद्ररश्मी, माधवदास अमरसी रस्ता, अंधेरी (प.) मुंबई ५८.

## भेंडे यांचा लेख वाचल्यावर

२ फेब्रुवारीच्या अंकातील डॉ.सुभाष भेंडे यांचा कवी मनमोहन यांच्याविषयीचा माहितीपूर्ण ललित लेख आवडला. ‘कसा ग गडे झाला?’ आणि ‘ती पहा, बापूजींची प्राणज्योती’ ही दोन्ही गाणी आमच्या लहानपणी खूपच लोकप्रिय झाली होती. त्यापैकी पहिले गीत थोडे थिल्लर स्वरूपाचे आहे, अशी माझी (मुखड्यावरून) समजूत होती. परंतु भेंडे यांनी उद्‌धृत केलेल्या पुढच्या ओळी किती काव्यात्म आहेत!

एकदा आमच्या घरासमोरील छोटाणीवाडीत (ग्रँट रोड) सत्यनारायणाची सार्वजनिक पूजा होती. त्यावेळी आर.एन.पराडकर यांचे गाणे आयोजित केले होते. तेव्हा त्यांनी काही भावगीते म्हटली. (पुढे ते फक्त दत्ताची भजने गात असे ऐकले) त्यात त्यांनी ‘कसा ग गडे झाला?’ हे गीत प्रथम ऐकवले. मग ते म्हणाले, ‘या प्रश्नाला राधेचे उत्तर काय आहे, त्याविषयीचे गाणे आता ऐका.’ या दुसऱ्या गीताचे शब्द होते.

“जो तो रे मनमोहना, मला विचारीत सुटला
अंबाडा हो राधाबाई सैल कसा झाला?”

पुढच्या ओळी आठवत नाहीत, पण या ध्रुवपदाची चाल अजून लक्षात आहे. त्याची ध्वनिमुद्रिका निघाली नसावी. कारण पुढे ते कुठेच ऐकले नाही. परंतु आता भेंडे यांचा लेख वाचल्यावर वाटले की या दुसऱ्या गीतावरील ‘मनमोहना’ हे संबोधन मूळ गीताच्या कवीला उद्देशून होते की काय!

**साधना कामत**, ए/३, ‘आनंदाश्रम’, शामराव विठ्ठल मार्ग, मुंबई ४०००০७.

## मेमरी गार्डन

पुन्हा एकदा झाले
बुद्धदेवाचे आगमन
अन् महानिर्वाण
बाबा आमचे त्यांचे नाव...
सगळेच होत नाहीत बाबा
की घ्यावे त्यांचे नाव
नावेच ठेवावीत अशीच सारी
इथून तिथून गाव...
एक नाव अन् एक गाव
मात्र झाले बुद्ध देवाचे गाव
जे सडलेले म्हणून तुसडलेले
त्यांनाच निवडले
बाबा आमटे त्यांचे नाव...
विल्या म्हणतो नावात काय आले?
नावात तर सर्व काही आहे
गांधीबाबा, गाडगेबाबा
त्याच नावाचे झाले नामांतर
बाबा आमटे त्यांचे नाव
‘मेमरी गार्डन!’
ठाई ठाई तरीही
अंतोदयाचा अजूनही
ठावठिकाणा नाही!

**– चंद्रकांत बोराटे**
पुणे ४११०४२.

## शांताबाईंवरील कथा वाचा

९ फेब्रुवारीच्या ‘साधना’तील ‘कैफियत’मध्ये राजन गवस यांनी शांताबाईंविषयी (आणि सगळे गाव शांताबाईंच्या गुडघ्यावर डोके ठेवून दाढी-डोई करू लागले!) छान लिहिले आहे. पतीच्या निधनानंतर नाभिकी करून त्या स्वत:ला व कुटुंबाला सावरतात. कडुकरसाहेब त्यांना तो व्यवसाय करण्यास प्रोत्साहन देतात, लेख सकारात्मक दृष्टिकोन देतो. मात्र याच शांताबाईविषयी सीताराम सावंत यांनी ‘वस्तरा चालवणारी बाय’ या नावाने ‘शब्दालय’ (श्रीरामपूर)च्या २००७ च्या दिवाळी अंकात सुंदर कथा लिहिली आहे. मात्र शांताबाईंचे नाव बदलले आहे. तो व्यवसाय करताना त्यांना कोणकोणत्या संकटांना तोंड द्यावे लागले, हे त्यांनी अतिशय कलात्मकतेने

मांडले आहे. राजन गवस यांच्या लेखात आहे तो सर्व भाग त्यात आहे, शिवाय काही काल्पनिक भागही समाविष्ट करून त्यास कथास्वरूप दिले आहे. सत्य घटना व काही काल्पनिक भाग मिळून ती सुंदर कथा झाली आहे.

राजन गवस म्हणतात 'शांताबाईंकडे कोणीच लक्ष दिले नाही' पण तसे नव्हे, यापूर्वी शांताबाईविषयी सर्व दैनिकांमध्ये बातम्या आलेल्या आहेत. सीताराम सावंत यांनी कथा लिहून व 'शब्दालय'ने ती प्रकाशित करून वाचकांसमोर मांडलेली आहे. जिज्ञासूंनी ती कथा अवश्य वाचावी.

**प्रा. रमेश दिवटे,** कराड

## ते विधान विचार करण्यासारखे

प्रिय संजय जोशी,

२ फेब्रुवारीच्या 'साधना'त प्रसिद्ध झालेले (आपले मित्र) श्री.अवधूत परळकर यांना आपण लिहिलेले पत्र व त्यांचे उत्तर वाचले. श्री.परळकरांनी आपण निवृत्तीनंतर काय करावे हा मित्रत्वाचा दिलेला सल्ला लक्षात घेऊन, निदान त्यांच्या लेखनाचे परीक्षण करण्यात वेळ दवडू नये, असे मलाही वाटते. काहीही पुरावे न देता किंवा संदर्भ न देता, बेधडक विधाने करायची, राजकारण, अणुऊर्जा करार, अर्थशास्त्र, क्रिकेट किंवा वाङ्मय अशा कोणत्याही विषयावर बिनदिक्कत लिहायचे, हे परळकर यांचे तंत्र आहे. कोणीतरी, कुठेतरी, कधीतरी, केव्हातरी केलेले 'भाषा ही सत्य लपविण्याचे साधन म्हणून अधिक वापरली जाते, खास करून भाषाप्रभूंकडून' असे संदर्भरहित विधान परळकरच स्वत:चे म्हणून करू शकतात. व श्री.विजय तेंडुलकरांनाही त्या वादात ओढू शकतात. बंगाली सिनेमे जास्त पाहिल्याच्या जोरावर बंगाली साहित्यावर ते अधिकारवाणीने विधाने करतात. त्यामुळे तुम्हा-आम्हालासुद्धा अमिताभचे हिंदी सिनेमे बघून हिंदी साहित्याबाबत फुशारक्या मारण्यास हरकत नाही. पहिल्या परिच्छेदात काय लिहिलेले आहे, याचा विसर त्यांना दुसरा परिच्छेद लिहिण्याच्या वेळी पडलेला असतो.

श्री.अवधूत परळकरांची काही विधाने मात्र सत्य आहेत. प्रतिकूल मतप्रदर्शनाने अनेक थोर थोर लेखक बिथरतात, हे या थोर लेखकाने आपल्याला दिलेल्या उत्तरानेच सिद्ध होते. 'साधनाच्या संपादकांना बहुदा अभ्यासू माणसे मिळत नसावीत.' हे विधानही विचार करण्यासारखे आहे.

**रमेश पां. दोंदे,** १/५, मधुकुंज सोसायटी, जयानगर, दत्तपाडा, मुंबई ४०००६९.

## 'साधना'च्या वर्गणीत वाढ

प्रिय वाचकहो,

गेल्या पाच वर्षांत एक पैशाचीही वाढ झाली नाही, अशी एखादी गोष्ट आपणास आठवते का? नाहीच आठवणार, कारण सद्य:परिस्थितीत तसे काही नाहीच! परंतु एक अपवाद आहे, तो म्हणजे 'साधना' साप्ताहिकाचा.

साधना साप्ताहिकाची वार्षिक वर्गणी गेल्या पाच वर्षांत अजिबात वाढवलेली नाही. साधना साप्ताहिक दर आठवड्याला ३२ पानांचा अंक, असे वर्षभर (शिवाय ३ विशेषांक) अवघ्या रु.३००/- (व्यक्तीसाठी) व रु.४००/- (संस्थेसाठी) या दराने देते. वर्षभरात या सर्व अंकांची मिळून पृष्ठसंख्या होते : जवळपास १६००. साधना साप्ताहिकाच्या एका पानात, नेहमीच्या आकाराच्या पुस्तकाच्या दोन पानांइतका मजकूर असतो. याचा अर्थ पुस्तकाच्या ३२०० पानांचा मजकूर साधना साप्ताहिक दरवर्षी आपणास देते. सोपा हिशेब करावयाचा तर प्रत्येकी १०० पानांचे एक, अशी ३२ पुस्तकेच साधना आपणास घरपोच देते. अगदी कमी धरली तरी १०० पानी पुस्तकाची किंमत असते किमान रु.५०/-. म्हणजे अत्यंत किफायतशीर बाजारभावानेही साधना साप्ताहिक देत असलेल्या मजकुराचे आर्थिक मूल्य आहे रु.१६००/-.

ही प्रचंड तूट प्रतिवर्षी दिवाळी अंकातील जाहिरातींद्वारे भरून काढणे चालू आहे; परंतु त्यातील अडचणी सर्वजण जाणतातच. म्हणून १ एप्रिल २००८ पासून साधनाची वार्षिक वर्गणी व्यक्तीसाठी रु.४००/- व संस्थेसाठी रु.५००/- करण्यात येत आहे. साधनावरील लोभ यापुढेही असाच चालू ठेवावा ही विनंती.

**– संपादक 'साधना'**

पृष्ठ २ वरून]

इतकाच की सुबोधच्या प्रतिक्रिया नीतळ सुरेख असतात आणि माझ्या प्रदीर्घ प्रतिक्रिया समीक्षकीय होत गेल्या.)

मध्यंतरी एका पंजाबी मैत्रिणीच्या नादाने बऱ्याच हिंदी कविता केल्या. त्यातली एक कविताच मुळी – 'मै जश्न मनाता जाता!' अशी होती. तात्पर्य, वाचनाचे सुद्धा मी उत्सव करत आलो. त्या काळात केलेली, मला सर्वांत आवडणारी माझी हिंदी कविता होती –

*जख्म ऐसे न करो, केह ना सके,*
*सेह ना सके।*
*अश्क पलकोपे जो थे, पी ना सके,*
*बेह ना सके॥*

दुःखांबद्दल, जखमांबद्दल माझे मागणे नेहमी हेच होते. त्या अशा नसाव्यात की सांगताही येऊ नयेत, अन् सहनही करता येऊ नयेत. एका मैत्रिणीसाठी लिहिलेली एक कविता अशी होती –

*उरातल्या जखमांना शपथा*
*तरिही गाणे म्हणायच्या*
*मातीच्या वासात उमगल्या*
*कळा रुपेरी जगण्याच्या...*

मैत्रिणींचे उल्लेख आले म्हणून त्याबद्दल थोडे. मागच्या वर्षी 'पद्मगंधा'च्या दिवाळी अंकात मी एक कथा लिहिली – 'बिनपावसाचा गाव' – त्या कथेत स्त्री-पुरुषांतल्या मैत्रीसंबंधात माझे विचार आले. या बाबतीत माझ्या साहित्यिक मित्र-मैत्रिणींकडून माझी नेहमीच 'अतिनैतिकतावादी अन ओव्हरआयडियलॅस्टिक' म्हणून यथेच्छ चेष्टा केली जाते; पण या बाबतीत माझे विचार माझ्या जगण्यातून आले असल्याने मी तो माझा गौरवच मानत आलो. 'सोपे जगणे सुखी व्हायची शक्यता अधिक असते. भले ते कमी आनंदी असो', हे माझे आवडते तत्त्व. पती-पत्नींमधल्या प्रामाणिकपणाने हे सोपेपण प्राप्त होते आणि फसवाफसवीत वाया जाणारी ऊर्जा वाचून ती जगणे अधिक मौजेचे करायला कामी येते, असा माझा अनुभव आहे. त्यामुळे जिवाभावाच्या मैत्रिणी बायकोच्या सुद्धा मैत्रिणी व्हायचा योग नित्याचाच. लग्न हे न संपावेसे वाटणाऱ्या मधुर पुस्तकासारखे किंवा अनंत कडव्यांच्या मधुर भावगीतासारखे झाले की हे सहजी जमते. आणि मग बायकोवर लिहिलेली कविता मैत्रिणीला ई-मेल करताना भलतीच मौज येते. त्यामुळेच पहिले पुस्तक सुद्धा बायको आणि आईच्या बरोबरीने आयुष्यातल्या पहिल्या मैत्रिणीला, आदराने अर्पण केले होते. ठराविक अंतरावर भेटलेल्या मधुर सख्यांनी जगण्याचे श्रावण केले आणि ते श्रावण बायकोसह अंगावर घेताना लग्नात वैशाख कधी आला नाही. याचे श्रेय सगळ्यांनी बायकोलाच दिले, पण बायको हेच श्रेयस मानल्यावर असले हिशेब कोण पाहणार! एवढे सगळे अनुकूल असताना नोकरीत फुटकळ यश मिळवले आणि थोडी लेखनकामाठी केली तर त्याचे कौतुक ते काय!

मात्र यात नशीब वगैरे गोष्टींना मी महत्त्व देत आलो नाही. पहिल्या लेखात 'पत्रिकेतले उच्चीचे ग्रह' वगैरे लिहिले होते, पण ते केवळ गमतीनेच. भविष्य, पत्रिका वगैरे गोष्टींना एक बौद्धिक गंमत यापलीकडे कधी महत्त्व नाही दिले मी. एकूणच श्रद्धा या विषयात मी कायमच गोंधळलेला राहिलो. सुदैवाने म्हणा किंवा दुर्दैवाने म्हणा, पण कोणतीही टोकाची आक्रस्ताळी भूमिका न घेता मी अश्रद्ध जगत आलो. आवर्जून देवळात न जाणे वगैरे कधी करावेसे वाटले नाही, पण देवळात गेल्यावर, समजा देव वगैरे असेलच तर त्याला काय मागावे, हा प्रश्न मला नेहमीच त्रस्त करत आला. अगदी देवाशी एकास एक असे मनमोकळे बोलणे झाले तर मी काहीही मागितले तरी तो मला, 'अरे लेका, मग ते तूच मिळव की' असेच म्हणेल, असे स्वप्नरंजन मी बऱ्याचदा केले आहे. खरेच, बंडल नाही. माझ्या जगण्यात ईश्वराला असे कोणतेच काम नसल्याने त्याला रिटायर करायची गरज मला वाटत नाही. तो आपला आहे तसा छान असतो, मधून-मधून गप्पागोष्टी करायला. कारण तो माझ्यातच असतो. पण आजूबाजूला मात्र त्याच्या हातात जगण्याचे लगाम देणारे किंवा त्याला रिटायर करणारे अशी टोके मला अस्वस्थ करतात. बहुतेक जण त्याला ओळखतच नाहीत. त्यामुळे बरीचशी चांगली पुस्तके 'धार्मिक' म्हणून अंधपणे वाचली जातात, याची मला चीड आहे. यात गीता, ज्ञानेश्वरी वगैरे प्रामुख्याने. माझ्या बायकोच्या श्रद्धेचा मात्र मला अपमान करावासा वाटला नाही कधी. सुदैवाने श्रद्धेचे स्तोम तिनेही कधी माजवले नाही. पण आज समाजात श्रद्धेचे जे जबरदस्त व्यापारीकरण चालते, त्याची मात्र मला षंढ चीड आहे. फार मोठी इंडस्ट्री झालीय ती. श्रद्धेचे व्यापारीकरण इतकेच नव्हे, माध्यमांच्या निर्लज्जपणाबाबत आणि एकंदरच सांस्कृतिक असहिष्णुतेबाबतच्या माझ्या कृतिहीन षंढतेची मला शरम वाटते. कलावंताच्या स्वातंत्र्यावर हल्ले होतात तेव्हा मन पेटून उठले तरी मुठी वळत नाहीत, ही ती षंढता. पण आयुष्यात काही गाड्या चुकल्या की ते योग्य वळणावर मान्य करून दुसरी गाडी पकडावी असे माझे मत आहे. कारण उत्सवहीन निराश जगणे ही जीवनाशी केलेली कृतघ्नता असते. सामाजिक कार्यकर्त्याची कृतिशीलता ही अशीच एक माझी चुकलेली गाडी. आयुष्यात कशाचीच कमतरता दुसऱ्या कशाने भरून निघत नाही हे तर खरेच; पण हृदय आणि आयुष्य यांना अनंत विस्ताराच्या शक्यता असतात. त्यामुळे जगण्यात, लेखनात आणि प्रेमात अधिकाधिक सर्जनशील असणे मी पसंत करतो.

नवनव्या शक्यता शोधताना जे चांगले त्याला आत्मीयतेने पाणी घालणे आणि जे निंद्य त्यावर हातोडा घालणे मला आवडते. फक्त माझे पाणी शब्दांचे असते आणि हातोडे फक्त भाषिक असतात. त्याची खंत करण्यात अर्थ नाही. कारण बऱ्यावाईटाची परिमाणे वगळता लेखन ही समाजसेवा आहे, असे मला मनापासून वाटते. समीक्षा ही सुद्धा समाजसेवा आहे. या बाबतीतले गुरुस्थानी

असलेले माझे सन्मित्र द.भि. कुलकर्णी यांनी गेल्या काही वर्षांत दिलेला अमर्याद स्नेह मला मोलाचा वाटतो. द.भि. सर, मित्रवर्य श्याम मनोहर आणि नेमाडे यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळेच समीक्षक म्हणून वेगळी वाट शोधायची स्वप्ने मी पाहतो. 'कोसला' या नेमाड्यांच्या कादंबरीवर तर मी कित्येक वर्षे प्रेम केले. दोन वर्षांपूर्वी 'अंतर्नाद'मध्ये श्रेष्ठ पुस्तकांच्या समीक्षा मालेत मी कोसलावर लेख लिहिला. त्यावर स्वतः नेमाड्यांचे माझ्या लेखाचे कौतुक करणारे पत्र आले, तो अविस्मरणीय क्षण होता.

साहित्यिक वर्तुळात माझी फारच कमी ऊठबस असते. सुबोध जावडेकर, अवधूत परळकर, अण्णा भावे आणि आनंद जोशी या मित्रांबरोबरच्या दर तीन-चार महिन्यांनी होणाऱ्या आनंदसहली, द.भि., हातकणंगलेकर आणि नेमाड्यांशी फोनवरच्या गप्पा, सानिया बरोबरची कित्येक वर्षांची पत्र मैत्री, मोनिका आणि नीरजा या कथाकार मैत्रिणींचा स्नेह, कविता महाजनशी आलटून पालटून मैत्र आणि भांडण, अशा फारच थोड्या गोष्टी या बाबतीत सांगता येतील. मॅजेस्टिकचा लेखक म्हणवून घेणे, मला आनंदाचे वाटावे असा अशोक कोठावळे याचा स्नेह आहे. मला आठवते, १५ वर्षांपूर्वी मी पहिली कादंबरी लिहिली तेव्हा सर्वप्रथम अशोकला पत्र लिहिले होते, मॅजेस्टिकच्या पत्त्यावर. ते पत्र भलतेच अहंकारी होते. मी म्हटले होते, दिवाळी अंकात कसल्याकसल्या कादंबऱ्या छापता हो तुम्ही? एक उत्तम कादंबरी हवीय का? अशोक मुरलेला प्रकाशक. त्याने शांतपणे उत्तर पाठवले, 'तुमचे हस्तलिखित जरूर पाठवा. नवोदितांना वाव देण्याचे मॅजेस्टिकचे नेहमीच धोरण आहे.' हा स्नेह गेली कित्येक वर्षे आनंद देत आहे. मधूनमधून 'ललित' मासिकातले मानाचे पान लिहिणे मला आनंदाचे वाटते. आजवर मॅजेस्टिकचा लेखक असलो तरी राजहंसचे माजगावकर, पद्मगंधाचे जाखडे यांच्याशी सुरेख स्नेह आहे, हे मला आनंदाचे वाटते.

मात्र हल्ली साहित्य क्षेत्रात सकारात्मक, तत्वाधिष्ठित पण आक्रमक वादविवाद फारसे होत नाहीत, याचा मला खेद होतो. मुकुंद टाकसाळ्यांसारखे सन्मित्र सदरकार सुद्धा नको त्या वयात नोकरीच्या मागे लागल्याने, उत्तम खुमासदार सदरेही वाचायला मिळत नाहीत. त्यामुळे खुमखुमीने काही वाद करावेत अशी निमित्येही कमी मिळतात. अवधूतसारखे खंदे सदरकार त्याबाबत थोडेफार समाधान देतात खरे. साहित्यक्षेत्रात नको ते वाद माध्यमांच्या चतुराईने पेटवले आणि रंगवले जातात, ते मात्र नकोसे वाटते. साहित्य संमेलनाचा वाद त्यातलाच एक. योग्यता, उपलब्धता आणि क्षमता यांमध्ये समतोल हरवल्याने साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवडणूक साखर कारखान्याची निवडणूक झाल्यासारखे वाटते. कोट्यवधी मराठी भाषिकांच्या साहित्य संमेलनाचा अध्यक्ष सातआठशे जणांनी निवडावा, हा विनोद आहे. प्रकाशक मित्र अरुण जाखडे यांनी ती मतदारांची यादी सहज म्हणून मला दाखवली तेव्हा आश्चर्याचा धक्काच बसला. त्यात पुन्हा अरुण साधू, रा. ग. जाधव वगैरे अध्यक्षांनी आपला अध्यक्षपदाचा काळ संपल्यावर त्या सर्व प्रकारावर टीका केली, ते मनोरंजक वाटले. एकूणात हा सर्व प्रकार आपल्यासाठी नाही असेच अनेकांना वाटते, ते बरोबरच आहे असे वाटू लागले. या विषयावर निराळेच लिहायला हवे.

चांगले लोक राजकारणात येत नाहीत म्हणून राजकारण अधिकाधिक क्षुद्र होत जाते, आणि ते असे क्षुद्र झाल्याने चांगले लोक त्या वाटेला जात नाहीत, तसेच हळूहळू साहित्य संमेलनाचे होत जाईल अशाने. एकूणातच पर्यावरणात खटकणाऱ्याच नव्हे तर बोचणाऱ्या अनेक गोष्टी आहेत. पाच मिनिटे सुद्धा टीव्ही बघवत नाही, इतका मालिकांचा दर्जा खालावलाय. मनोरंजनाचे कार्यक्रम आणि बातम्यांसारखे कार्यक्रम यांच्यात निर्लज्जपणाची स्पर्धा चालू आहे. मध्यंतरी एका खास महिलांच्या कार्यक्रमात सूत्रसंचालक हातात नोटांची गड्डी घेऊन उभा होता आणि चाळीशीतल्या स्त्रीला प्रश्न विचारत होता, 'हं वहिनी आता तीन सम संख्या सांगा बरे... हं, वहिनी आता तुम्ही तीन विषम संख्या सांगा बरे.' आणि बरोबर उत्तराला नोटा देत होता. (त्यातही एकीने विषम संख्या म्हणून १४ सांगितले.) हे सारेच उबगवाणे आहे. कॉलेजातल्या मुलीला – 'हं, तुझे नाक दाखव, तुझे डोळे दाखव'... असले प्रश्न विचारून बरोबर उत्तराला बक्षिसे वाटण्यासारखे. एस.एम.एस. पाठवून भारताचा आदर्श ठरवण्यासारखेच.

तरीही मी निराशेच्या गर्तेत जात नाही. कारण उत्सव करावे असे क्षण येतात. मनाचे श्रावण व्हावेत असे क्षण येतात. बहुतेक वेळा आनंदाचे क्षण अपंग असतात, ते सहसा स्वतःच्या पायांनी येत नाहीत. आपणच त्यांना आणावे लागते किंवा त्यांच्याकडे जावे लागते. चांगल्या क्षणांची स्मारके करणाऱ्यांची जमात वाढवणे हा एकमेव मार्ग मला दिसतो. म्हणून मी भरपूर कष्ट घेऊन वाचकस्पर्धा घेतो. गाण्यांच्या नकला करणाऱ्यांना 'महागायक' ठरवणाऱ्या युगात जी.ए., नेमाडे, खानोलकर, गोनीदा, मिरासदार अशा लेखकांच्या साहित्यावर प्रश्न विचारत 'महावाचक' निवडायचे कार्यक्रम उत्साहाने साजरे करतो. आयुष्यात काही गाड्या चुकल्या तरी इतर बऱ्याच गाड्या असतातच. आणि सगळीच गावं काही बिनपावसाची नसतात. आणि चुकून पोचलोच बिनपावसाच्या गावाला तर 'थोडासा रूमानी हो जायेऽऽ' असं सुरेलपणे म्हणत बिनपावसाच्या गावातदेखील पाऊस पाडणारा 'बारीशकर उर्फ रेनमेकर' व्हायची उमेद बाळगून आहेच मी!

**– संजय भास्कर जोशी**

स्नेहसिंधू, ई-३ गजानन सोसायटी,
कृष्णा कॉलनी, 'वनाज'जवळ, पौड रोड,
पुणे ४११०२९. मोबाईल : ९८२२००३४११.
email : swaraart_swapne@yahoo.com

■

# एक वादळ माणसाळतं...

हरिकेन कॅटरिना, रिटा, जोन्स...
वादळांना आणि चक्रीवादळांनाही
हल्ली म्हणे नावं दिली जातात!
क्षणार्धात तिन्ही लोक व्यापणाऱ्या
अन् होत्याचं नव्हतं करून टाकणाऱ्या
प्रलयंकर चक्रीवादळांचं नामकरण करतात
०००
एक वादळ असंच भारतात आलं होतं
पण ते नव्हत्याचं आहे करणारं शुभंकर वादळ होतं
नापीक जमिनीला स्वप्नांचा गर्भ देणारं आणि
निद्रिस्त प्रेतांना नवा प्राण देणारं वादळ होतं ते
या वादळानं दिला असा जोरदार तडाखा
की मुळापासून उखडली गेली शक्तिशाली सिंहासनं
उन्मळून पडल्या जगण्याच्या जुनाट धारणा
नि स्वप्नांची मशागत करू लागली निर्जीव मनं
क्षण-प्रहर गेले, वर्षे-दशके लोटली
तरी हा झंझावात मात्र थांबला नाही
अंधाराच्या मस्तवाल सैनिकांना उद्ध्वस्त करत
काळोखातील रातकिड्यांना पायदळी कुस्करत
या वादळानं ध्वस्त केल्या निराशेच्या गर्ता
बकाल भुईनं पोटात घेतलेला हरेक झाला पेर्ता
दिमाखात उभे ठाकलेले चिरेबंदी वाडे कोसळले
काजव्यांनी प्रथमच मग शक्तिप्रदर्शन केले
मिणमिणणाऱ्या पणत्यांची तेव्हा मशाल झाली
रात्रीच्या गर्भातील पहाट अशी जन्मा आली!
०००
अचेतनावर सचेतनाचा आरोप करणाऱ्या
या चेतनगुणोक्तीनं साजरे केले सृजनाचे सोहळे
त्याच्या एका स्पर्शासरशी फुलले आनंदाचे मळे
पांगळ्यांना हात द्याया सरसावले बलदंड बाहू
निर्मितीच्या मुक्त गंगा लागल्या मातीत वाहू
बदलवून टाकला अवघा इतिहास या वादळानं
आणि फेरमांडणी करून नवा भूगोल जन्माला घातला
या वादळी हल्ल्याने भिंतींना पडले तडे
आणि नवे सेतू राहिले उभे
कोंडलेल्या वादळाच्या अनिवार लाटांमधून निघाल्या
नव्या वाटा... नव्या विटा
०००
अशी वादळं जन्माला येतात; पण
ती नाहीशी कधीच होत नसतात
कारण ती देतात जन्म नवनव्या वादळांना
ती देतात प्राण मनाच्या वस्तीतील स्वप्नांना
असं एक वादळ माणसाळलं अन्
भारतीयांनी त्याला नाव दिलं
बाबा आमटे!
महात्मा गांधी म्हणजे 'मिथ'
चर्चिल म्हणजे 'फिक्शन'
असं आज सांगणारी उगवती पिढी उद्या कदाचित म्हणेल
'बाबा आमटे, ए नेम गिव्हन टू द इंडियन सायक्लोन
विच क्रिएटेड ए न्यू सिव्हिलायजेशन!'
या उत्तराला परीक्षेत मार्क शून्य मिळतील;
पण खरं उत्तर तेच असेल.

**- संजय आवटे** sunjay.awate@gmail.com

## अभिनंदनीय अनुकरणीय

सांताक्रूझच्या साने गुरुजी मंदिरातील आम्ही शिक्षक दर 'शिक्षकदिनास' काही विधायक निर्णय घेत असतो.

१) २ ऑक्टोबर 'गांधी जयंती' व १४ एप्रिल 'डॉ.आंबेडकर जयंती' या दिवशी सुट्टी घ्यायची नाही, त्याबद्दल अन्य दिवशी रजा घ्यायच्या नाहीत.

२) २४ डिसेंबर 'शिपाईदिन' पाळणे, शिपायांना वर्गणी काढून भेटवस्तू देणे.

३) गांधीजयंतीच्या दिवशी 'आपत्ती निधी' देणे व योग्य ठिकाणी पाठवणे उदा. कच्छ व लातूर भूकंप, आंध्रचे वादळ, मुंबईतील पूरग्रस्त, त्सुनामीग्रस्त वगैरे....

साधनाने हीरक महोत्सवाच्या निमित्ताने ६० लाख रुपयांचा निधी जमवण्याचा निर्धार केला आहे. त्यातले एक हजारांश म्हणजे रु. ६ हजार वर्गणी जमा करून पाठवावी असे शिक्षकांनी ठरविले. त्याप्रमाणे त्या रकमेचा चेक आम्ही सोबत धाडत आहोत. साने गुरुजी परिवारातील १०० शाळांनी असा निधी पाठवला तर सहा लाख सहज उभे राहू शकतात. या वर्षात जास्तीत जास्त साधनाचे वर्गणीदार करावे असेही ठरवले आहे.

एन.डी.नं. आर.एन.आय.१६०१/५७
रजि.क्र. एल-२/आर.एन.पी./पी.एन.डब्ल्यू./डब्ल्यू/६८/२००६-२००८
तिकिटाशिवाय पाठवण्याचा परवाना नं. ७
पोस्टींग दर गुरुवारी मार्केट यार्ड पी.एस.ओ.सॉर्टींग ऑफिसमधून

बालसाधना

# कुरुपता...



आज मला माझी खूप लाज वाटली. लाज म्हणजे खरं तर ते अपराधी म्हणतात तसं वाटलं.

आमच्या वर्गात यावर्षी तीन नवीन मुलं आली, त्यात एक मुलगी आहे. ही मुलगी जरा विचित्रच आहे. विचित्र म्हणजे काळी, ठेंगणी, बारीक आणि दातसुद्धा विचित्र आहेत. आली त्या दिवसापासून हिने मुलींच्या रांगेतला शेवटचा बेंच पकडलाय, तिथेच बसलेली असते. फारशी कोणाशी बोलत नाही. एकदा तर गणिताच्या सरांनी तिच्याकडे बोट दाखवून तिला प्रश्न विचारला, तरी ही गप्प उभी. तसं काय आम्हीही बरेचजण स्वत:हून कधीच उत्तर देत नाही, पण उभं करून विचारलं तर सांगतो काय असेल ते. पण ही अशी मंदासारखी उभी. मागच्या परीक्षेतही हिला खूप कमी मार्क होते. तर एकंदरीत सगळं असं विचित्र होतं, आमच्या वर्गातल्यांना कधीतरी हसत बसायला एक नवीन विषय सापडला होता.

आणि त्यात पुन्हा ही आमच्या बाजूच्या बिल्डिंगमध्ये राहते, ते मला कळलं. म्हणजे मला ती दिसलीसुद्धा बऱ्याचवेळा आणि तिची आई ते 'घरगुती श्रीखंड' वगैरे विकते त्यामुळेही कळलं. एकदोनदा ती वाटेत दिसली आणि हसली माझ्याकडे बघून. मी हसलो तर नाहीच, पण अजिबातच ओळख नसल्यासारखं करून पुढे निघून गेलो. मग ती हसायची बंदच झाली.

एकदा ही तिच्या आई-बाबांबरोबर कुठेतरी बाहेर चालली होती, नवीन असल्यासारखा रंगीबेरंगी ड्रेस घालून. मी आपला आमच्या खिडकीत बसून होतो. मला वाटलं, 'आयला ही कशाला उगीच नवीन ड्रेस घालून मिरवत बसते? फुकटची नाटकं.'

तर असंच सगळं चालू होतं.

आणि एके दिवशी आईने मला 'घरगुती श्रीखंड' आणायला पाठवलं. मी जायला टंगळमंगळ करून पाहिली, पण ते काही जमलं नाही. मग गेलो डबा घेऊन त्यांच्याकडे. त्यांच्या दारावर बोर्ड होता– 'आमच्या येथे घरगुती श्रीखंड मिळेल' मी बेल दाबली. म्हटलं, 'या मुलीने दार उघडलं तर घोळ उगीच.' पण तिच्या आईने दार उघडलं.

मी सांगितलं– 'अर्धा किलो श्रीखंड पाहिजे होतं.' त्यांनी डबा घेतला आणि 'दहा मिनिटं बस.' असं सांगितलं; म्हणून बसलो तिथे खुर्चीवर. हिची आई काही अगदी कुरूप नव्हती. म्हणजे हिच्या आईच्या चेहऱ्यात आणि हिच्या चेहऱ्यात काही साम्य दिसत नाही. मग हीच कशी काय अशी दिसते? मी असं विचार करीत बसलो होतो. तेवढ्यात ही आली आतल्या खोलीतून आणि हसली. आता अगदी समोरच बसलो असल्यामुळे, मी पण हसून न हसल्यासारखं केलं.

ती म्हणाली– 'काय म्हणतोस? श्रीखंड न्यायला का?'

मी तिच्याकडे न पाहताच 'हो' म्हटलं.

ती म्हणाली– 'चल, मी तुला माझी खोली दाखवते.'

आयला म्हटलं उगीच नाटकं. पण तरी उठलो.

हॉलला लागून आतमध्ये हिची खोली होती. उजवीकडे किचन होतं. तिथेच तिची आई श्रीखंडाचं काम करीत होती. मग तिच्या खोलीत गेलो. मला उगीच अडकल्यासारखं वाटत होतंच, पण हिची खोली खूपच सुंदर होती. म्हणजे छोटी होती, पण व्यवस्थित लावलेली, कुठेही पसारा नव्हता. ती काय काय सांगत होती, 'मी इथे अभ्यासाला बसते.' वगैरे. मी आपला ऐकत होतो.

मग तिने तिथल्या रॅकवर ठेवलेला कागदाचा मोर काढला आणि माझ्या हातात देऊन म्हणाली– 'हा मी तयार केलाय'. मी बघितलं त्या मोराला. निळ्या कागदाचा, पिसारा फुललेला मोर. खूपच सुंदर होता. मग तिने अजून काय काय पक्षी, प्राणी दाखवले. वेगवेगळ्या रंगांच्या कागदांनी बनवलेले. आयला हे म्हणजे भारीच होतं. आम्हाला शाळेत काही हस्तकला विषय नव्हता, त्यामुळे तिथे हे काही कळणं शक्यच नव्हतं. मला ह्या मुलीची कमालच वाटली, आणि या हस्तकलेला 'ओरिगामी' म्हणतात, असं तिनेच सांगितलं. ते सगळे प्राणी, पक्षी खूप छान असल्याचं मी तिला सांगितलं. ती हसली आणि तो मोर परत माझ्याकडे देऊन म्हणाली– 'हा तू घेऊन जा.'

मी तो मोर आणि श्रीखंडाचा डबा घेऊन परत आलो.

आता मात्र माझी मलाच लाज वाटायला लागली. मी ह्या मुलीला कधीच ओळख न दाखवल्याची आणि एकंदरीतच सगळ्याची. ही मुलगी कुरूप नाहीच खरं तर. आपणच साले मनाने कुरूप आहोत, असा विचार करता करता दिवस संपला.

दुसऱ्या दिवशी शाळेत जाण्यासाठी मी चाललो, तेवढ्यात ही त्यांच्या बिल्डिंगमधून बाहेर आली. यावेळी मी स्वत: हसलो आणि विचारलं, 'शाळेत?' ती म्हणाली– 'हो'. मग मला जरा बरं वाटलं, माझी कुरूपता कमी झाल्यासारखं.

**अवधूत न. डोंगरे**
संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभाग, पुणे विद्यापीठ,
रानडे इन्स्टिट्यूट बिल्डिंग, फर्ग्युसन महाविद्यालय रस्ता, पुणे ४.
मोबाईल : ९४२१२२९२५१